# १अ

## मराठी भाषेचा उत्पत्तीकाल व कोरीव लेखांचे महत्त्व

**घटक रचना**

१अ.१ उद्देश
१अ.२ प्रस्तावना
१अ.३ मराठी संस्कृतीचा उदयकाळ
१अ.४ मराठी भाषाउत्पत्तीकाल
१अ.५ प्राचीन मराठी कोरीव लेखातील मराठी वाक्यरचना व शब्दरूपे
१अ.६ मुकुंदराज आणि त्यांचा विवेकसिंधू
१अ.७ समारोप
१अ.८ प्रश्नसंच
१अ.९ संदर्भ

### १अ.१ उद्देश

१. मध्ययुगीन कालखंडातील मराठी भाषेचे स्वरूप समजून घेता येईल.

२. मराठी भाषा निर्मितीचे महानुभाव संप्रदायाचे कार्य कर्तृत्व समजून घेता येईल.

३. महानुभाव संप्रदायाच्या वाङ्मय प्रकारची ओळख होईल.

४. मराठीच्या आद्य ग्रंथाविषयी जाणून घेता येईल.

५. महानुभाव पंथाचे तत्वज्ञान, टीकाग्रंथ आणि व्याकरण ग्रंथ यांचा परिचय होईल.

### १अ.२ प्रस्तावना

मराठी भाषेची व्याप्ती प्रारंभकाळी महाराष्ट्रापुरती मर्यादित होती. मराठी भाषेच्या उत्पत्तीबरोबरच क्षेत्र व्याप्ती ही महत्त्वाची आहे. महाराष्ट्र हे देशवाचक नाव. महाराष्ट्राचा पहिला महत्त्वाचा उल्लेख शकनृपत्ती श्रीधर वर्मा यांच्या त्यांच्या इ.स. ३६५ च्या एरण येथील स्तंभालेखात सापडतो. (मध्यप्रदेशातील सागर जिल्हयातील) त्यात त्याचा सेनापती सत्यनाग स्वतःला 'महाराष्ट्र' म्हणजे महाराष्ट्रीय म्हणवितो. हा लेख एरण येथे धारातीर्थी मरण पावलेच्या नाग सैनिकांच्या स्मरणार्थ उभारला आहे. महाराष्ट्रात प्राचीन काळी हटी किंवा हाट लोकांची वसती असल्यामुळे त्यांच्या या देषाला हट्टदेश नाव पडले व 'मरहट्ट' या शब्दातील 'हट्ट' या घटक पदाने वरील हट्टी लोक सूचित होत. या डॉ.रा. बा. जोशी यांच्या मतांचे खंडन एरण लेखातील वरील उल्लेखाने होते. त्यातील सेनापती सत्यनाग व ज्यांच्या स्मरणार्थ त्याने हा स्तंभलेख उभारला ते नाग सैनिक यांच्या उल्लेखाच्या आधारे प्राचीन

munotes.in

महाराष्ट्रात वसती हाटांची नव्हे, तर नागांची होती. हे डॉ.मिराशी यांनी समर्पकपणे दाखवून दिले आहे.

महाराष्ट्राचा दुसरा उल्लेख पुलकेशीच्या इ. स. ६३४ च्या ऐहोळ-लेखात मिळतो. त्यात पुलकेशीचे कर्तृत्व वर्णिताना तो 'महाराष्ट्राच्या अधिपती झाला, असे म्हटले आहे. ऐहोळ लेखातील ही त्रिधा महाराष्ट्राची कल्पना ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाची असून तिचं पुढे सोळाव्या शतकात 'तीन भाग मऱ्हाट' या शब्दात गुर्जर शिवबास या महानुभाव ग्रंथकाराने मांडली आहे.

महाराष्ट्र त्यांच्या नावाप्रमाणेच लहान लहान राष्ट्रांचे (खंडमंडळाचे मिळून झालेले असावे.) या डॉ.पा.वा. काणे यांनी मांडलेल्या उपपत्तीला तेराव्या शतकातील 'आचारपध्दती' या नावाच्या एका महानुभाव ग्रंथात आधार सापडतो. उदा. 'देश भणीजे खंडमंडळ: जैसे फलेठाणापासौनि दाक्षिणेसि: मऱ्हाटी भाषा जेतुला ठाइं वते तेतुलें एक मंडळ: तयसि उत्तरे बालेघाटाचा सेवट: ऐसे एक खंडमंडळ: मग उभे (उभय) गंगातीर तेहि एक खंडमंडळ: आणि तयापासौनि उभे मेघंकरघाट (मेहकर, जि. आकोला) तें एक खंडमंडळ: तयापासौनि आवघें वराड तें एक खंडमंडळ: परि आवघी मिळौनि महाराष्ट्राचे बोलिजे: किंचिंत् किंचित् भाषेचा पालट: भणौनि खंडमंडळे भणावीं.'' प्रा. र. य. भुसारी यांनी यादवकालीन कोरीव लेखांच्या आधारे महाराष्ट्राचा क्षेत्राविस्तार अजमावण्याचा प्रयत्न केला. विदर्भ देश आणि कोकण हे महाराष्ट्राचे तीन विभाग यादवकाल व चालुक्यकाळात देखील एकाच राष्ट्रात समाविष्ट होते. अस निष्कर्ष काढला आहे. (पृ.४६, मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १, संपा. डॉ.षं.गो. तुळपुळे)

१५ व्या शतकातील महानुभाव ग्रंथकार कवी डिंभ कृष्णमुनी याने महाराष्ट्राचा क्षेत्र विस्तार पुढीलप्रमाणे सांगितला आहे. 'विंध्याद्रीपासौनि दाक्षिण दिशेसी' कृष्णानदीपासौनि उत्तरेसी। झाडीमंडळापासौनि पश्चिमेशी । महाराष्ट्र बोलिजे ।।'' यादवकालीन ग्रंथ आणि कोरीव लेखांचा विचार करता बहुतेक सर्व ग्रंथ देशावर व त्यातही मुख्यात्वेकरून वऱ्हाडात व 'उभयगंगातिरी' म्हणजे सध्याच्या मराठवाडयात लिहिली गेली. पंढरपूरच्या संत मेळव्यातील संत नामदेवाची अभंगरचना यादवकालीन मराठी वाङ्मयाची जन्मभूमी उत्तर महाराष्ट्रच मानावी लागते. विवेकसिंधू (अंबेजोगाई), ज्ञानेश्वरी (नेवासा), लीळाचरित्र व बोरीकरांचे ग्रंथ (भागातिरी) भास्करभट्ट महानुभावीय कवी काही वऱ्हाडातून व गोदावरीतीरा वरील आहेत. श्रीचांगदेव पुणंताब्याचे म्हणजेच गोदाकाठाचे एकूणच यादवकालीन मराठी साहित्यात भाषा कानावर येते. पूर्वी मराठवाडा असा नव्हता, असे षं. गो. तुळपुळे यांनी मराठीचा जन्मकाळ आणि स्थलव्याप्ती ठरवताना नमूद केले आहे.

'उभेगंगातीर' म्हणजे गोदावरीच्या दोन्ही तीरांवरील प्रदेश उदा. 'ये साधे वराडींची की' (लीळा पुर्वार्थ १७६)' भीदुके, वराडासि जाति' (स्मृ. १७८), 'भटोबास गंगातीरा साखुरे गा.' (स्मृ. २४६) अषा प्रकारची देशभेद दाखविणारी वाक्ये त्या काळातील गद्य ग्रंथातून सापडतात. मराठी भाषेच्या दृष्टीने हे गंगातीर आणि वराड मिळून तिचे माहेर होय. (पृ.४७, मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १, संपा.डॉ.षं.गो. तुळपुळे)

'महावंश' नावाच्या बौद्ध ग्रंथात 'थैरो मध्धरखिता' या भोगलिपुत्र शिष्याने 'महरट्टा'स पाठविल्याचा उल्लेख आहे. हा ग्रंथ इ.स. ५०० च्या सुमाराचा आहे. महार आणि रट्ट या

दोन जतिनामांचा संयोग होऊन बनलेल्या लोकवाचक नामावरून 'महाराष्ट्र' हे देशवाचक नाम तयार झाले असावे. 'महारांचे राष्ट्र ते 'महाराष्ट्र' ही उत्पत्ती मोल्स्वर्थ, जे विल्सन यांनी सुचविलेली व डॉ. केतकरांनी पुरस्कारलेली आहे. ती लोकवाचक आहे.

## १अ.३ मराठी संस्कृतीचा उदयकाळ

साधारणपणे मराठी संस्कृतीचा काळ बाराव्या-तेराव्या शतकात झालेला दिसून येतो. मराठी भाषेतून झालेला वाङ्मयात्मक अविष्कार म्हणजे आधीच्या अनेक शतकातल्या महाराष्ट्र भूमीतल्या सांस्कृतिक जीवनातील टप्पा होय.

**प्रागैतिहासिक महाराष्ट्र:**

आदी पाषाणयुगापासून म्हणजे इ.स पूर्वी सुमारे ५ लक्ष वर्षापासून या महाराष्ट्र भूमीत मानव प्राणी नांदत आलेला आहे. नाशिक, गंगावाडी नान्दुर, मध्वेष्वर, निफाड व जींवे येथील उत्खननात मानवसंस्कृती या महाराष्ट्रात आदिपाषाण (इ.स.पू. सुमारे ५ लक्ष वर्षे ते ३० लक्ष वर्षे) मध्यपाषाणयुग (इ.स.पू. सुमारे ५ हजार वर्षे ते १० हजार वर्षे) व ताम्रपाषाणयुग (इ.स.पू. सुमारे १५०० वर्षे) या प्रागैतिहासिक अवस्थातून उत्क्रांत होत गेलेले पुरावे त्यांनी दिलेले आहे. मानव संस्कृती उत्खननातून प्रकट झाली. कोल्हापूर जवळील ब्रह्मगिरी येथील भूगर्भ दर्शनाने, तेथे सुमारे दोन हजार वर्षापूर्वी, सातवाहनांच्या काळात, एक भव्य व विशाल नगर अस्तित्वात होते. दोन हजार पूर्वीचा पूर्वज, तीन फूट पायव्याच्या, भाजलेल्या विटांच्या बळकट बांधणीच्या घरात तो राहत होता.

**पाच द्वारपाल:**

विंध्य पर्वताला वळसा घालून आर्य दक्षिण भारतात आले. या आर्यांचा विचार पंचमुखी आहे. आर्य, वेद, यज्ञ, ब्राह्मण आणि संस्कृत ही त्याची पाच मुखे आहेत. आपली विचार प्रक्रिया या पाच वस्तूंनी मोठया प्रमाणात प्रभावित झाली. आपली लौकिक आणि पारलौकिक सामाजिक तसाच पारमार्थिक विचार हा आर्यसापेक्ष, वेदसापेक्ष, यज्ञसापेक्ष आणि ब्राम्हणसापेक्ष होता. पंचमुखी संस्कृतीच्या कोंडीतून सामान्य जनतेला सोडवण्याच्या दृष्टींनी संतांनी कार्याला सुरूवात केली.

**द्विड संस्कृती:**

भारतीय संस्कृती केवळ आर्य संस्कृती नाही. हिंदू धर्माच्या दोन धारा आपल्याला दिसतात. वैदिक संस्कृती आणि अवैदिक संस्कृती, वैदिक संस्कृतीत कर्मकांड, होमहवण, यज्ञयागाला महत्त्व होते. अवैदिक संस्कृतीत भक्ती, योग, तंत्र याला महत्त्व होते.

**महाराष्ट्र नामधिमान उत्पत्ती:**

१) 'महाराष्ट्र' या देशनामाचा पहिला उल्लेख चौथे शतक एरण स्तंभलेख (इ.स.३६५)

२) वायुपुरणात महाराष्ट्राचा उल्लेख दंडकारण्य किंवा दक्षिणापथ.

३) महाभारताच्या सभापर्वात 'नरराष्ट्र'

४) मत्स्यपुराणात ‘नवराष्ट्र’

५) ल.रा. पागांरकरांच्या मते, सध्याचा महाराष्ट्र व कर्नाटक मिळून हा प्रदेश होत असावा.

६) डॉ. भांडारकरांच्या मते ‘महारठ्ठ’ पासून ‘मऱ्हाट’ किंवा ‘महाराष्ट्र’ हे देशनाम बनले.

७) द.बा. डिसकळकरांच्या मते,‘‘महारट्ट’ यांचे संस्कृतीकरण होऊन ‘महाराष्ट्र’ असे रूप बनले. महाराष्ट्रांचा म्हणजे महाराष्ट्र लोकांचा जो देश तो महाराष्ट्र होय.’’

८) वि.का. राजवाडे यांच्या मते ‘महाराज म्हणजे इंद्र किंवा महाराज संज्ञक भूपती. राजा ज्या भूमीवर राज्य करतो. त्या भूमिला राष्ट्र म्हणतात. महाराष्ट्र ज्यांच्या भक्तीचा विषय ते महाराष्ट्र होय.’’

९) रे. जॉन विल्सन यांच्या मते, ‘‘महार हेच या देशाचे मूळचे राहिवासी आहेत. अस सांगून महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र.’’

१०) डॉ. ओप्पर्ट यांच्या मते, ‘‘महाराष्ट्राचे जूने नाव ‘मल्लराष्ट्र ’ शब्द असावे ‘मल्ल’ आणि ‘मार’ हे एकच मार-म्हार-महार यावरून, महाराष्ट्र म्हणजे महारांचे राष्ट्र.’’

११) श्री. व्यं. केतकर यांच्या मते, महार्टट यात ‘महार’ आणि ‘रठ्ठ’ या दोन राष्ट्र जातींच्या नामांचा संयोग होऊन ‘महारठठ’ असे रूप तयार झाले आणि त्याचे पुढे ‘महारश्ठिक’, कालांतराने ‘महाराष्ट्र’ असे संस्कृतीकरण झाले.

१२) शं.बा.जोशी यांच्या मते, ‘‘या प्रदेशाचे नाव महाराष्ट्र असे नसून ‘मरहट्ट’ असे असावे. ‘मरहट्ट’ हा शब्द कानडी असून त्याचा अर्थ (मर=झाड, हट्ट=प्रदेश) झाडी मंडळ म्हणजे जंगलयुक्त प्रदेश असा आहे.

मरहट्ट-मरहाट-महारठ्ठ -महाराष्ट्र असे संस्कृत नामभिधान सिध्द झाले असावे. इ.स. २२४ च्या सुमारास लिहिलेल्या ‘थेरो’ महाधम्म राख्यिता’ या ग्रंथात ‘महारट्ट’ असा उल्लेख आढळतो. थोडक्यात महान राष्ट्र ते ‘महाराष्ट्र’ असा अर्थ रूढ झालेला आहे.

## १अ.४ मराठी भाषा उत्पत्तीकाल

मराठी भाषेचा उत्पत्तीकाल इ.स. ६८० (श. ६०२) पर्यंत नेता येतो. शिलालेख अशी (ता. अलिबाग, जि. कुलाबा) मराठी वाक्य मिश्र स्वरूपात प्रधावी (परिधावी) आधीकु (अधिक जेश्ठ) असे शब्द आढळतात. ‘श्रवणबेळगोळ इ.स. १११६-१७ (श. १०३८-३९) ‘श्री चावुण्डराजें करवियलें, श्रीगंगराजे सुत्ताले करवियलें’ हे पहिले मराठी लिखित वाक्य असल्याचा निर्वाळा वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासकांनी दिला आहेच. याचा अर्थ असा की, दहाव्या शतकापूर्वी मराठी बोलीच्या व लोकभाषेच्या स्वरूपात होती. ११ व्या शतकात तिचे शब्द भांडार वृद्धिंगत होत गेले. शके १०५० च्या सुमारास ती ग्रंथरूपात काही अशी अवतिर्ण झाली. उदा. ‘राजमतीप्रबोध’ या संस्कृत नाटकात महाराष्ट्रीय स्त्रीचे वर्णन मराठी भाषेतून आले आहे. ‘अभिलाषेतार्थ चिंतामणी’ या संस्कृत ग्रंथात रागतालांची माहिती देताना काही मराठी पदेही आली आहेत.

**संदर्भ:** प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - ल. रा. नसिराबादकर पृष्ठ क्र. २ (मराठी भाषा: उत्पत्तीकाल)

**मराठी भाषेचे अस्तित्व:**

दहाव्या अकराव्या शतकापर्यंत शब्द रूपान आढळते.

११ व्या शतकात शिलालेखांद्वारे वाक्यरूपाने आढळते.

१२ व्या शतकात ग्रंथरूपाने उदा. विवेकसिंधू (श. ११०९)

मराठी ग्रंथ कर्तृत्वाची सुरूवात मुकुंदराजांच्या विवेकसिंधू पासून झाली. महाराष्ट्र विषयीचा अभिमान प्रथम चक्रधर स्वामींनी आपल्या उक्तीतून (महाराष्ट्री असावे असे सांगितले.) विश्वनाथ बास बिडकर यांनी आचारस्थलात 'महंत राष्ट्र म्हणौनि महाराष्ट्र' असे महाराष्ट्राचा प्रदेश, संस्कृती, स्वभाव, प्रवृत्ती व मानसिकता यांचे विशेश सांगितले.

**गोरक्षनाथ:**

लोकभाषांचा पुरस्कार करणारे गोरक्षनाथ ते पहिले भारतीय पुरुश असावेत. त्यांनी तत्वज्ञानाच्या प्रासारासाठी लोकभाषांच्या माध्यामांचा पुरस्कार केला. महाराष्ट्रात महानुभाव व वारकरी या पंथाचा उदय होण्याच्या काळातील वातावरण नाथ पंथाच्या प्रभावाने भरलेले होते. संत ज्ञानदेव हे नाथपंथीय परंपरेतीलच (आदिनाथ - मत्स्येद्रनाथ - गोरक्षनाथ - गहिनीनाथ - निवृत्तीनाथ - ज्ञानदेव.)

**नाथसंप्रदायाचे ग्रंथ:**

'हटयोगप्रदीपिका' (स्वात्माराम)' 'सिध्दसिध्दान्त संग्रह' (प. गोपीनाथ कविराज) 'गोरखसिध्दांत संग्रह', विवेकदर्पण अर्थात गोरक्ष - अमरनाथ - संवाद' हे या संप्रदयातील आणखी काही उल्लेखनीय ग्रंथ होय. गोरक्षनाथांचे शिष्य गहिनीनाथांनी या संप्रदायाचा प्रसार केला.

**कोरीव लेखांचे महत्त्व:**

मराठी भाषेचा उगम शोधताना आपल्याला कोरीव लेखांचे महत्त्व लक्षात घ्यावे लागते. तिचे प्राचीन स्वरूप त्यावरून दिसते. यादवकालीन जवळजवळ ५० कोरीव लेखांपैकी साधारणपणे ३० लेख गोदाकाठाचा प्रदेश व व्हाड यातील आहेत. कोकणपट्टीत सुमारे २० लेख सापडतात. परंतु बहुसंख्य लेखांची भाषा बहुतांशी संस्कृत असून त्यातील मराठी भाग त्या मानाने फारच थोडा आहे. पंढरपूर व वेळापूर येथील लेख सोडल्यास मराठी भाषेच्या दृष्टीने महत्त्वाचे लेख उत्तर महाराष्ट्रातच मिळाले आहेत.

क्षेत्रव्याप्तीच्या दृष्टीने महाराष्ट्राबाहेरील काही कोरीव लेख सापडतात. उदा. म्हैसूर येथील श्रवण बेळगोळ येथील शिलालेख द्रविडी भाषेबरोबर मराठीतही आढळतो. मैलंगी येथील इ.स. १२९० चा शिलालेख त्यात कन्नड भाषिक होयसळांनी मैलंगी येथे एक पाठशाळा स्थापना करून तेथे नागर (संस्कृत), कन्नड, तिलगु (तेलगू) व आरे (आर्य किंवा मराठी) या

चार भाषांच्या अध्यापनाची सोय केल्याचे सांगितले आहे. राणेबेन्नुर (क्र.२८) विजापूर (क्र.५२) येथील शिलालेख.

**शब्दरूप व वाक्यरूप अविष्कार:**

**शिलालेख व ताम्रपट यामधून दिसणारी मराठी भाषा:**

**१) वाक्यरूप:**

शके ६०२ पर्यंतच्या ताम्रपटांतून साम्राज्य, कम्बल, वइरी, पन्नास, प्रिथिवी यासारखे मराठी वळणाचे, तुरळक शब्द आढळतात. त्यांच्या व्युत्पत्तीच्या दृष्टीने त्यांच्या अपभ्रंश प्राकृत या पूर्व भाषांशीच निकट संबंध जुळले. म्हणून या पुराव्यापेक्षा श्रवणबेळगोळया शिलालेखातील मराठीचा पहिला वाक्यरूप अविष्यकार म्हणून 'श्री चावुण्डराजे करवियले' हा मराठीच्या जन्मासंबंधीचा प्राचीन (इ.स.९८३) पुरावा मानला जाई. पण राइस यांनी अनुमानाने ठरविलेल्या या लेखाचा शके ९०५ (इ.स.९८३) हा काळ हुल्टझा यांनी अमान्य केला असून 'गंगराजे सुत्ताले करवियले' या ओळीबरोबरच पहिले वाक्य कोरले गेले. (शके १०३९) असे त्यांनी दाखवून दिले आहे. म्हणून शिलालेख इ.स. १११७ चा ठरतो. म्हणजे शिलालेख डॉ. शं. गो. तुळपुळेंच्या मताने शके ९३४ चा अक्षीचा शिलालेख हा पहिला ज्ञात मराठी लेख ठरतो. पण हा लेख दुसऱ्या केशिदेव शिलाहाराचा असल्याने त्याचा काळही इ.स. १०१२ नसुन तो इ.स. १२०९ (शके ११३१) आहे. डॉ. मिराशीचे मत आहे. (म. सा. पत्रिका, वर्ष ४३, अंके १६६) त्यामुळे अक्षीचा शिलालेख ही आद्य मराठी लेख नव्हे, तेव्हा पहिले पणाचा मान आहे. शके ९४० च्या कुडळ (जि. सोलापूर) येथील शिलालेखाकडे जातो. हा लेख केवळ तीन ओळींचा असून शेवटची ओळ तेवढी मराठीत आहे. ती अशी ९३ वछि (चि.) तो विजेंचा तो विजेयां होइ वा' कुडल येथील संगमेश्वराच्या देवळातील या लेखावरून मराठीचा पहिला ज्ञान असा वाक्यरूप अविष्कार इ.स. १०१८ ठरतो.

**२. शब्दरूप अविष्कार (ताम्रपट):**

**१) भोज शके ४१० मधील एक ताम्रपट:**

या ताम्रपटाचा काळ भोजराजाचा शके ४१०, म्हणजे षालिवाहन शके ११२६ असे संपादक मानतात. या लेखात 'राथेबाग' हे ग्रामनाम आहे. त्यातील 'बाग' हा फारसी शब्द संशय उत्पन्न करतो. लेखाची भाषा अशुध्द आहे. 'सानारा' (सोनारे) सोमणचं (सामण्णाचे) हसतकी (हस्तकी) पत्र घडवीला यासी असता (असत्य) मनिती तर लक्षी (लक्ष), पातकी होती। चंद्र सुरीया झा (क्ष) दरतरी (धरित्री) पहिजे.

**२) शके ११२६ तील मराठी ताम्रपट:**

या ताम्रपटावर ४१० शके असला तरी अभ्यासक हे ताम्रपट पन्हाळगडाच्या शिलाहार वंशीय दुसऱ्या भोजराजाच्या वेळेच आहेत. इतकेच नव्हे, तर त्यावरून शके ७१६, शिलाहार मराठी भाषा बोलत व लिहित 'असे' अनुमान काढले आहे. भाषा अशुध्द आहे.

उदा. ''भोजा रायसि भेटल मग राय सनमानु देवनु वईसवील मग दोगानी रायासी विनवील जी अमुच काय पाटाआर, कचनपत्रासी (कांचन) नोरोप द्यावा...

**३) मंगळवेढे ताम्रपट: शके ४१०:**

अभ्यासकांनी हा ताम्रपट बनावट असल्याचे म्हटले आहे.

**४) चिकुर्डे, मरमुरी, मिरज:**

या तीन ताम्रपटाविषयी खात्री देता येत नाही असे अभ्यासकांचे मत आहे. डॉ. गुणे यांनी कलमवार टीका केली आहे. यात तिन्ही ताम्रपटात दानप्रसंग सारखेच असून (दक्षिण दिसावरे दिगुविजयात्रे विजय करवुन) स्थळे मात्र निरनिरळी आहेत. उदा.

**चिकुर्डे:** 'करहाट कंबले स्वरदेवा संनिधी' (ओ 16)

**मुरमुरी:** 'कपडिसंगमे संगमेष्वर संनिधौ' (ओ. 16-17)

**मिरज:** 'कोपेस्वर देवासंनिधा' (ओ 16)

चतुःसीमा सांगण्याची पद्धति तिन्ही ताम्रपटातून सारखे आहे. 'स्वदतं परदत वा' हे शापवचन सर्व लेखांत एकचं आहे. अशुद्ध रूपे सारखीच आहे.

उदा. चिकुर्डे मरमुरी मिरज

प्रिथ्वी प्रीथ्वी प्रिथ्वी

नैरित्य नैरित्य नैरित्य

**३. शब्दरूप अविष्कार:**

- **शके १०४९ शिलाहार ताम्रपट:** सकु, संवतु, घोरपड, वडवली, ऊसर, मोर, मोब्वली, गॉर्डमार्ग, वावर, छेपाटी.
- **शके ६२१:** चालुक्याचा शिलालेख: सुंक, बादावी, हित.

**ताम्रपटातील शब्दरूप:**

- **शके १०१६ ताम्रपट:** कोकण, रिशी, सोमण, संवतु, छेपाटी, भामण (बाबण), नोर, राय, अनंतदेव.
- **शके १००१ भोर ताम्रपट:** धणम, अमात्यु, देणे, प्रधानु, मामलु, वरिल.
- **शके ९२२ शिलालेख:** करणिक, थीर.
- **शके ९०० ताम्रपट:** सांब्राज्य
- **शके ८९६ मर्सुरीचा ताम्रपट:** करवुन, मानवून.
- **शके ८३२ ताम्रपट:** वइरि (वैरी), निशेश, सिंध.

- **शके ८१०:** राष्ट्रकुटांचा ताम्रपट: न्हा, पुन्य, जो (सर्वनाम) सिंध (सिंह), दह (दश), थिति (स्थिति) रिपू.
- **शके ७५७:** ताम्रपट: येज्ञ (यज्ञ)
- **शके ७३५:** ताम्रपट: खळखळ
- **शके ७३८:** ताम्रपट: वारिखेड (सध्याचे वारखेड)
- **शके ६८०:** ताम्रपट: दोसिराज (जोशीराज), भंडारगविठ्ठगे (भांडारकवठे).
- **शके ६७५:** सामानगड ताम्रपट: देऊळवाडे, पारगाव आईतवाडे
- **शके ६०२:** ताम्रपट: पन्नास, प्रिथिवी.

**शिलालेखावर कोरलेल्या राजवटी:**

पाटण शके ११२० 'षास्ता भुव': सिंघण' (ओ.6)

आंबेगाव शके ११५० 'श्री सिंघण' श्रीणिप:'

आंबेगाव शके ११६२ 'सिंहे यादव चक्रवर्तिनि'

फुलंबरी शके ११६४ 'श्रीमतप्रौढ प्रतापचक्रवर्ती श्रीसिंघणदेव'

तासगांव शके ११७२ 'तस्मिन्कृशणनरेषेषासति:

नांदगांव शके ११७ 'श्रीमत्प्रौढप्रताप चक्रवर्ति श्री कान्हिरदेव

उन्हकदेव शके १२०१ 'महाप्रौढप्रतापचक्रवार्ति स्त्री रामचंद्देव

सावरगांव शके: १२१५ 'श्रीमप्रौढप्रतापचक्रवर्ती श्रीरामचंद्देव

भिंतीतून घातलेल्या शीळा उदा. पाटण, पंढरपूर उन्हळदेव यावरील लेख सुट्या शिलालेखांवर कोरलेले व नंतर भिंतीत बसविले आहे. पंढरपूरचा चैऱ्यायशीचा लेख इत्यादी

देवळातील खांबावरील लेख उदा. पळसदेव, सावरगांव, हातनुर, विजापूर इत्यादी

दिवे आगर ताम्रपट - इ.स.१०६० सातावींसे सत सुवण्ण: दावोदर: पासि ठेवियले

श्रवणबेळगोळ शिलालेख - इ.स.१११८

आंबेजोगाई शिलालेख - इ.स.११४४

रांजली शिलालेख - इ.स.११४८

चिंपळूण शिलालेख - इ.स.११५६

तेर शिलालेख - इ.स.११६३

सावरगांव शिलालेख - इ.स.११६४

परळ शिलालेख - इ.स.११८६

पाटणा शिलालेख - इ.स.१२०६

नेवासे शिलालेख - इ.स.१२३९

तासगांव ताम्रपट - इ.स.१२५०

कळेशी ताम्रपट - इ.स.१२७९

वेळापूर शिलालेख - इ.स.१३००

इत्यादी शिलालेख व ताम्रपटावरून मराठी भाषेचे शब्दरूप वाक्यरूप व परिच्छेद रूप दिसते. शिलालेख व ताम्रपटातून दिसणारे मराठी भाषेचे अशुद्ध रूप दिसते. यावरून मराठी ८ व ९ व्या शतकातून लिहिली जाऊ लागली. दहाव्या व अकराव्या शतकात लोकभाषा म्हणून ती महाराष्ट्रात रूढ झाली असा निष्कर्ष निघतो.

**परिच्छेद रूप व ग्रंथरूप अविष्कार:**

मानसोल्लास: मराठी संबंधीचे ग्रांथिक पुरावे बाराव्या शतकात दिसतात. उदा. 'मानसोल्लास उर्फे अभिलशितार्थ चिंतामणी 'ग्रंथ चालुक्य कुळातील दुसऱ्या विक्रमादित्याचा मुलगा सोमेश्वर याने लिहिला आहे. तो संस्कृतात असून 'महाराष्ट्रीय स्त्रिया दळता कांडताना ओव्या म्हणतात, 'अशी माहिती यात आहे. त्यातील एका भागात रागतालाची महिती देताना मराठी पदे दिली आहेत. उदा.

''जेणे रसातलउणु मत्स्यरूपें वेद आणियेले।

मनुशिवक वणियले।

तो संसारसायरतारण।

मोहंतो रावों नारायणु।

जो गीची (वी) जाणे गाइजे

**२. 'राजीमतिप्रबोध' (इ.स.११२८):**

जैन पंडित यशश्र्चंदाच्या या संस्कृत नाटकातील मराठी उतारा. या नाटकातील नायिका राजीमती हिचे उपवर्णन एक 'महाराष्ट्रीक' करतो ते असे.'

**३.** ''महाराष्ट्रीकमुखमीक्षते राजा (अथ महाराष्ट्रीकः।) देव। चतुरांगुलाची जीहा। मी कांइ सांघओं। गोमटी; मुह फाफट, निलाड चापटू। आखंड याली ताहीची। वीणी काली। न छोटी न मोटी। ... बोलती महूरवाणी चालती सुजाणी... ॥''

**४.** 'पंडित आराध्यचरित' या तेलुगू काव्याचे मऱ्हाठी यात्रेकरूचे मऱ्हाठी पद (पृ. २२९, प्राचीन म.वा.इ भाग १ संपा. अ. ना. देशपांडे) हे पुरावे बाराव्या शतकाच्या पुर्वार्धातील मराठीची आलिखित वाङ्मयाची अवस्था सिध्द करतात. उलट अलिकडच्या काळात उपलब्ध झालेल्या 'भविसयत्तकहा, 'णायकुमारचरिउ', 'जसहरचरिउ; 'महापुराण' वगैरे अपभ्रंश ग्रंथावरून अकराव्य शतकाच्या मध्यापर्यंत अपभ्रंश भाषा जिंवत होत्या, असे ठरते.

## १अ.५ प्राचीन मराठी कोरीव लेखातील मराठी वाक्यरचना व शब्दरूपे

**दिवेआगर ताम्रपट (शके ९८२):**

सातावीसें सत सुवर्ण दावोदर: पस् हेविवले ।

(सातवीसे सत म्हणजे १२७ सुवर्ण गद्याणक दामोदरापाशी ठेविले)

श्रवण बेळगोळ शिलालेख (१०३७-३९)

'श्रीचावुण्डराजें करवियलें'

श्रीचावुण्डराजाने (हे शिल्प कराविले. श्री. गंगराजाने भोवतालची भिंत करविली.)

महामंडलेष्वर उदयादित्यदेव यांच्या वेळचा आंबे शिलालेख (शके १०६६)

'जो फेडी लोपी तेआ योगिनींचा वज्रदंडु पडे... ।'

(हे शासन) जो कोणी नष्ट वा लुप्त करील त्यावर योगिनींचा वज्र दंड पडेल)

**२. भादंक शिलालेख (शके १०६८):**

''रेवती नक्षत्र व्रीस्चीक लग्न: श्री नारायण: प्रतिष्ठा: चांगनाका सुर्ते: तीज्या जाषनाकु: तेणे प्रतिस्ठा केलि: धर्माचे राए पवार: .....कीर्तन: जीर्णोध्दारु: त्रिनीत्रः मुषी केली: लोणार मेहेकर: तेथचे आधीस्ठाते: जनार्दन पंडिताचा सुतु: गोपिनाथ पंडितु: अणुमति केळे: तिची ए आस्थानाचा अभिमानु समस्ता नगरासी: अणिक मुष्य नायेका आधीकारीयांसी: हे धर्मकीर्तन: प्रतीपाळु जो करीते आसि भले हो देवा: वाचि तो विजैया हो देवा:''(रेवती नक्षत्र वृश्चिक लग्न असताना चांगनायकाचा तिसरा मुलगा जाशनायक याने श्रीनारायणाची प्रतिष्ठापना केली. धर्माचे राऐ म्हणजे धर्मराज किंवा धर्माचे पोषिंदे, पवार यांनी कीर्तनाचा म्हणजे देवळाचा जीर्णोध्दार करून (मुर्ती) त्रिनेत्रमुखी केली व हे सर्व लोणार-मेहेकर येथील अधिष्ठात जनार्दन पंडित यांचा पुत्र गोपीनाथ पंडित यांच्या अनुमतीने केले. या 'त्रिनीत्रमुशी' म्हणजे त्रिनेत्रमुखीच्या आस्थानाचा म्हणजे सभामंडपाचा अभिमान समस्त नगरास व तेथील मुख्य नायक अधिकाऱ्यांस आहे. हे धर्मकीर्तन (धर्मासाठी बांधलेले देऊळ) आहे व या शासनाचा जो प्रतिपाळ करीत त्याचे भले होवो व ते जो कोणी वाचिल तो विजयी होवो.)

**३. पळसदेव शिलालेख (शके १०७९):**

'श्री. चंगदेव दंडनाकें विष्णुगृह केलें ।'

(श्री. चंगदेव दंडनायकाने विष्णुग्रह म्हणजे विष्णुचे देवालय शिलालेख केले.)



munotes.in

**४. सावरगांव शिलालेख (शके १०८६):**

माधवनायके लाहियनायके मासप्राति द्राम २ दत्त फेडीतो स्वान गाढवु चांडालु

(माधवनायक व लाहियनायके यांनी २ द्राम दिले. हे (दानपत्र) जो नष्ट करील तो ष्वान, गाढव व चांडाळ (होय)

**५. नेवासे शिलालेख (शके ११६१):**

हे भूमि देवे पुरुषेण जीवणा दिवली.

(ही भूमि देवपुरुषाने जीवणास (जीवण नावाच्या माणसास दिली.)

**६. खाटेग्राम ताम्रपट (शके १२७१):**

तुझी आमचे जतिसमंधाचा कारियाती उपगा आले ते कवण काय़्य म्हणाल, तरि आमसिं आणि सोनांरासि सवादा होउनु हाणमारि जाले समधिं तुमि वेरेंकार अमचेया वाणियाचे समायाचे संमविरिधिसि तुमि वाणि समयासि यउनु मानु समेचा राकिला.

(तुम्ही आमच्या जतिसंबंधाच्या कार्यास उपयोगी पडला. ते कोणते कार्य म्हणाल तर आमच्यात आणि सोनारात वाद होऊन हाणामारी झाली. त्या समयी तुम्ही वेरेंकार आम्हा वाण्यांचे हितसंबंध व संवृध्दि (जाणून) समयास येऊन समयाचा प्रसंगाचा मान राखला)

## १अ.६ मुकुंदराज आणि त्यांचा विवेकसिंधू

'विवकेंसिंधू' हा आद्यग्रंथ म्हणून मुकुंदराजांना आद्यकवी म्हणतात. आपल्या ग्रंथकर्तृत्वाविषयी ते म्हणतात नृसिंहाचा बल्लाळू । तेयाचा कुमरू-जैतपाळू । तेणे करविला हा रोळू । ग्रंथ रचनेचा ॥ स्वतः मुकुंदराजांनी 'शके अकरा दाहोत्तरू । साधारण संवत्सरू । राजा शारंगधरु । राज्य करी' विवेकंसिंधूकार मुकुंदराज यांना आद्य ग्रंथकार म्हणून परंपरने मानण्यात येते. त्यांच्या आद्यत्वाबाबत ही संशोधकांमध्ये बरेच मतभेद आहेत. 'विवेकसिंधूची' भाषा ज्ञानेश्वरीपेक्षा सोपी व बरीच अर्वाचीन वाटते.

विवेकसिंधूकार मुंकुदराज यांना आद्य ग्रंथकार म्हणून पंरपरंने मानण्यात येते. परंतु त्यांच्या स्थल काल निश्चितीबरोबर त्यांच्या आद्यत्वाबद्दल ही संशोधकांना बरेच मतभेद आहेत. विवेकसिंधूची भाषा ज्ञानेश्वरीपेक्षा सोपी व बरीच अर्वाचीन वाटते. विवेकसिंधूचे तत्वज्ञान मात्र शांकर अव्दैताचे आहे. त्यामध्ये वेदशास्त्राचा मतितार्थ असून त्या 'रहाटी' उपनिषधांची आहे. उदा. 'शांकरोक्तीवरीमियां बोलिलो हे वैखरी' असे स्पष्टच मुंकुदराज सांगतात.

'पवनविजय', 'मूळस्तंभ', 'पंचीकरण' इत्यादी वेदांत्ती प्रकरणे व काही पदे, अभंग ही रचना जरी मुंकुदराजाच्या नावावर मोडते तरी विषय भाषा या दृष्टीने ती अगदी सामान्य आहे. मुंकुदराजांची ती नाही. हे अंतःप्रमाणावरूनच स्पष्ट होते. 'विवेकासिंधू' (पृ.१८, ओव्या १६७१) आणि परमामृत (पृ.१४, ओव्या ३०३) हेच त्यांचे प्रमाणभूत व महत्त्वाचे ओवीबध्द ग्रंथ होत. वासुदेव सरस्वतींच्या मते 'परमाभूत' ग्रंथ ही सिध्दान्त रचनापध्दती, गुरूपरंपरा उल्लेख या दृष्टीने विवेकसिंधू कर्त्यांचा ठरत नाही. विवकेसिंधूचे संस्कृत रूपांतर ही मुकुंदराजे कृतच असावे. असे वि. का. राजवाडे यांचे मत आहे. त्याला विवेकासिंधूबरोबर

विवेकार्णव महाभाष्य, परमार्थबोध अशीही नावे आहेत. विषय विवेचनाच्या दृष्टीने या तिन्ही ग्रंथाचे स्वरूप सारखे आहे. तिन्ही ग्रंथात अव्दैतबोध योगानुभव व सगुणोपासना हीच वर्णिली आहे.

**आद्य ग्रंथाविषयी संशोधकांची मतमंतातरे:**

प्राचीन मराठी वाङ्मयाच्या प्रथम कालखंडात रिधपूर, पैठण, नेवासे आणि पंढरपूर ही सहित्यनिर्मितीची केंद्रे होती. रिधपूर प्रवरातिरी येथे 'लीळाचरित्र' हा मराठी भाषेतील ग्रंथ निर्माण झाला. ज्ञानेश्वरी प्रवरातिरी नेवासे येथे लिहिल्या गेली. पहिला मराठी ग्रंथ या नावाच्या पदासाठी 'ज्योतिशरत्नमाला', 'विवेकसिंधू', 'धवळे' आणि 'लीळाचरित्र' या चार ग्रंथाची चर्चा वाङ्मयेतिहासात दिसते. विवेकसिंधू आणि 'ज्ञानेश्वरी' च्या अगोदर धवळे आणि लीळाचरित्रा ची निर्मिती झाली आहे. महदंबेला आद्य मराठी कवयित्रीचा मान दिला जातो. त्यामुळे महदंबा ही केवळ आद्यकवियत्री की आद्य ग्रंथकार ते स्पष्ट होत नाही. इ. स. १२७८ हा लीळाचरित्राचा रचनाकाळ म्हणून बहुतेकांना मान्य आहे. याचा अर्थ तो आद्य मराठी ग्रंथ ठरतो व पहिला परंतु मराठी ग्रंथकार म्हणवून घेण्याचा मान म्हांइभटाकडे जातो. परंतु चक्रधरस्वामी आद्य मराठी ग्रंथकार म्हणून चर्चा झाली. डॉ. द. भि. कुलकर्णी चक्रधर स्वामीनांच आद्य ग्रंथकार म्हणतात. (मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ ला, पृ.६०)

डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी कालानुक्रमे मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड पहिला) संपादित केला आहे. त्यात त्यांनी मुंकुदराजांच्या सहित्याची भाषा उत्तरकालीन म्हणजे चौदाव्या किंवा पंधराव्या शतकातील आहे असे मानल्यामुळे त्यांनी रूढ क्रम निर्धाराने बदलला आहे. मुंकुदराजांच्या 'विवेकसिंधू' चा पहिलेपणाचा मान हिरावून घेऊन तो मान म्हाइंभटांच्या 'लीळाचरित्र' ला देण्यात आला आहे.

डॉ. तुळपुळे पुढील गोष्टीचा आधार देतात. एक विवेकसिंधू शके १२८५ च्या सुमारास रचला असावा. त्या शकवर्षात खोदलेल्या खेडल्याचा शिलालेख उपलब्ध असून त्यात ज्याच्या प्रेरणेने 'विवेकसिंधू' ची रचना झाली त्या जैतपाळ राजाचा उल्लेख आहे. ग्रंथरचनेच्या वेळी मुंकुदराज वयोवृद्ध होते हे त्यांच्याच 'मजष्वासोन्मेशाचाहि श्रमु तेथ काइसा ग्रंथाचा उद्यमु'' या उद्गारावरून दिसते. (वि ७.१५४) चक्रधरांचा प्रयाण शक ११८४ किंवा ११८६ आहे. रामदेव किंवा दादोस याचा निधनकाळ ठाऊक नाही पण त्यांच्या देहावसानाचा वृत्तान्त 'स्मृातिस्थळा'च्या शेवटी २२१ व्या स्मृतीत येतो. त्या अर्थी तो नागदेवाचार्याच्या थोडा आधी मरण पावला असणार नागदेवाचार्याचा निधनकाळ शक १२३२ ते १२३४ च्या दरम्यान आहे. म्हणजे रामदेव त्यापूर्वी शक १२३० च्या सुमारांस निधन पावला. त्याचा शिष्य मुंकुदराज त्याने शके १२७५-८५ च्या सुमारास आपल्या वृध्दावस्थेत ग्रंथरचना करणे ही गोष्ट शक्य कोटीतील आहे. त्यात कालाची विसंगती नाही. (पृ.३९३, मराठी वाङ्मयाचा इतिहास संपा. डॉ.तुळपुळे)

**मराठीतील आलिखित वाङ्मय:**

मराठी बोलीला ग्रंथिक भाषेचा दर्जा प्राप्त होण्याआधी मराठीत मौखिक वाङ्मय असावे. उदा. कथा, कहाण्या, स्त्रीगीते व शकुनापशकुनांचे समज, भुतभविष्यासंबंधी कल्पना, वनौषधी, हिशोब टाचणे इत्यादी. शेतकरी, विणकरी, कोळी इत्यादींचे लोकगीते कहाण्या इत्यादी मौखिक वाङ्मय होते.

## १अ.७ समारोप

मराठी भाषेचा उत्पत्तिकाळ शिलालेख, ताम्रपट, ग्रंथ रूप मराठी, अशा प्राचीन ग्रंथावरून पाहता इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी या प्रश्नाची मीमांसा करताना आधारभूत म्हणून मानलेला चिकुर्डे येथील ताम्रपट व मंगळवेढे येथील शिलालेख हे बऱ्याच पुढील काळातील ठरल्याने आणि नारदस्मृती (पाचवे शतक), हर्शचरित (७००) व कुवलयमाला (इ.स. ७७८) यातील 'देशभाषा' शब्द अनिश्चितार्थी असल्याने मराठीचा जन्मकाळ त्यांच्या कल्पनेप्रमाणे (राजवाडे संपा. ज्ञानेश्वरी प्रस्तावना पृ.१८) पाचव्या शतकापर्यंत मागे जाऊ शकत नाही. तसेच बौद्ध धर्माचा ऱ्हास व हिंदू धर्माचे पुनरूज्जीवन यामुळे घडून आलेली अंतःस्थ विचारक्रांती' हे भारताचार्य चि. वि. वैद्य यांनी दिलेले कारण ही भाषोत्पतीस पुरेसे नाही. म्हणून सातवे शतक हा मराठीचा उत्पत्तिकाल इतर पुराव्यांच्या अभावी ग्राहय धरता येत नाही. शके ६०२ पर्यंतच्या ताम्रपटातून 'साम्राज्य', 'कम्बल' 'वइरी' 'पन्नास', 'प्रिथिवी' यांसारखे मराठी वळणाचे तुरळक शब्द आढळत असले, तरी त्यांच्या व्युपत्तीच्या दृष्टीने त्यांचा अपभ्रंश, प्राकृत या पूर्व भाषांशीच निकट संबंध जुळतो.

## १अ.८ प्रश्नसंच

**अ) दिर्घोत्तरी प्रश्न**.

१. मराठी भाषेचा उत्पत्तीकाल कोरीव लेखांचे महत्त्व थोडक्यात स्पष्ट करा.

२. मध्ययुगीन मराठीतील उपलब्ध पुराव्यांच्या आधारे मराठीचा उत्पत्ती काल विशद करा.

**ब) टीपा लिहा.**

१. मुकुंदराज व विवेकसिंधु

२. कोरीव लेखांचे महत्त्व

३. शिलालेख व ताम्रपट्यामधून दिसणारी मराठी भाषा

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. मराठी संस्कृतीचा उदयकाळ साधारणतः कोणत्या शतकात झालेला दिसून येतो?

२. गोरक्षनाथ यांच्या शिष्याचे नाव सांगा?

३. मुकुंदराजाचा आद्य ग्रंथ कोणता?

## १अ.९ संदर्भ


- संपा. डॉ. तुळपुळे. शं. गो. – मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १.


*****

munotes.in

# १ब

## महानुभावपंथाची साहित्य संपदा पद्य वाङ्मय व टीकाग्रंथ

**मूर्तिप्रकाश:**

केसोबासांनी हा ग्रंथ शके १२११ मध्ये लिहिला. या ग्रंथाची ओवीसंस्था ३०५१ असून यात श्रीचक्रधरमूर्तीचे वर्णन आले आहे. बालपणापासून केसोबासांना श्रीचक्रधरांचे सान्निध्य लाभले होते. श्रीचक्रधरांचे उत्तरापंथे गमन झाल्यानंतर नागदेवाचार्यांच्या शोकाकुल परिस्थितीचे वर्णन भावोत्कट आले आहे. केशिराजांच्या 'मूर्तिप्रकाश' या ग्रंथाची ओवी संख्या तीन सहस्त्रांवर आहे. श्रीचक्रधरांची मूर्ती हा यातील वर्ण्य विषय आहे. हे मूर्तिवर्णन डोमेग्राम पूजावसराच्या प्रसंगाच्या आधारे केले आहे. डोमेग्रामचे वर्णनही आले आहे. केशिराज मूर्तिप्रकाशच्या शेवटी म्हणतात. "हा ज्ञानभक्तिवैराग्याचा आवांका: मीयां बोलिला सप्रेमळा वाणी देखा: आइकतां पाविजे परमसुखा: परब्रह्मांते ॥" "मूर्तिप्रकाश हे केशिराजबासांच्या काव्यवैजयंती मधील अत्यंत प्रकाशमान असे रत्न होय." असे डॉ. कोलते यांनी म्हटले आहे.

**आद्य मराठी कवयित्री महदंबा:**

महदंबेचे धवळे आणि मातृकी रूक्मिणीस्वयंवर ही मराठीतील पहिला कथाकाव्ये होत. ही भारतीय भाषांतील ही श्रीकृष्णचरित्रावरील सर्वप्रथम रचना होय. महदंबा अतिशय विदुषी आणि कलासंपन्न होती. श्रीचक्रधरस्वामीनी 'म्हातारी जीज्ञासकः म्हातारी चर्चक म्हातारी एथ काही पुसतचि असे' अशी तिची स्तुती केली आहे. नागदेवाचार्यांनी 'म्हातारी धर्मरक्षक, प्रीतिरक्षक: सुहदत्वे दुःखनिर्वेदुः' अशा शब्दात तिचे गुणवर्णन केले.

**धवळे:**

महदंबेने इ. स. १२८७ (शके १२०९) पूर्वी केव्हा तरी हे धावले लिहिले असावेत. एक दिवस भिक्षेस जात असता रस्त्यात तिला बाशिंग घेऊन जाणारी एक तेलीण दिसली. महदंबेने गोविंदप्रभुंसाठी एक बाशिंग मागितले व ते आणून 'गोसावियांचीया श्रीमुगुटी बांधले.' कांकण बांधले. तुरे वाजविले, 'आओ मेली जाए गाए गाए   म्हणे ..... कृष्णरुक्मिणी गाय म्हणे, तुरया थाट गाय म्हणे' आणि मग ती लागली. धवळ्यांच्या निर्मितीची कथा ही अशी आहे.

**धवळयाची वैशिष्ट्ये:**

१) ज्ञानेश्वरीच्या प्रभावापासून संपूर्णपणे अलिप्त असणारे एकमेव कथाकाव्य हया दृष्टीने धवळे महत्त्वाचे आहेत.

२) भागवतातील रूक्मिणीहरण प्रसंगास स्वतंत्र काव्याचे रूप देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य धवळयांच्या निर्मितीनेच केले.

३) धवळे आपल्या या चैतन्यपूर्ण स्वरूपामुळे कलात्मकतेच्या पातळीवर गेले.



munotes.in

४) धवळयातील निवेदन कथारूप पावूनच येतं; कथेच्या प्रवाहाशी प्रकृतीशी व आशयाशी ते एकनिष्ठ असते. ६८ पासून ८३ पर्यंतच्या ओव्या अखंड निवेदनात्मक आहे.

५) धवळयांची ओवी कोणत्याही छंदशास्त्रात न बसणारी मुक्त ओवी आहे.

६) 'धवळयांतील नाटय उदा. कुमरौ लावण्यनीधान इए वरू होए व्दारके नाथु'' असा प्रधानाने सल्ला देताच 'गोळिया घरी रूक्मिणी कैसेनि दीजे' असा रूक्मीणी त्यास आक्षेप घेणे यातील नाटय टिपण्याचा तिचा प्रयत्न लक्षणीय आहे.

७) आशयवाही रचना हा धवळयांचा एक विशेष आहे. आशय व अभिव्यक्ती ह्यांच्या धवळयांतील अव्दैताचे मूळ महदंबेच्या बोलीभाषेत सापडते.

८) साधी व अनलंकृत भाषा, अल्पाक्षरत्व, प्रवाही भाषा तेराव्या शतकातील ही बोली भाषा आहे.

**मातृकी रूक्मिणीस्वयंवर:**

महदंबेचे दुसरे काव्य १०९ ओव्यांचे असून ते मातृकांत त्याची रचना आहे. १ ते ८२ ओव्यांत 'क' ते 'क्ष' पर्यंत मातृका आहेत. ८३ ते १०१ ओव्यांत 'अ' पासून 'उ' पर्यंत व नंतर भ-ट-च-द-व-म-न-व सा अक्षरक्रम आहे. श्रीकृष्णवर्णन आहे. महदंबेच्या नावावर 'गर्भकांड ओव्या' हे एक प्रकरण आहे व एक आरती इतकी साहित्यरचना दिसते.

**पद्यग्रंथ (सातीग्रंथ):**

**रूक्मिणीस्वयंवर (श १२१४):**

रामदेवरायाच्या दरबारातील कवी नरेंद्राने हे रूक्मिणीस्वयंवर रचले आहे. नरेंद्राचे दोघे बंधू साल आणि नृसिंह हे कवी होते. त्यांच्या आवाहनावरून नरेंद्राने १८०० ओव्यांचा रूक्मिणीस्वयंवर ग्रंथ रचला. रामदेवाने पैशाचे अमीश दाखवून हा ग्रंथ आपणास द्यावा असे नरेंद्रास सांगितले. परंतु त्याने ते नाकारले आणि महानुभाव संप्रदायाकडे भेटोबासापाशी आला व पंथाची दिक्षा घेतली. त्यावेळी ९०० ओव्या लिहून झाल्या होत्या. रूक्मिणीस्वयंवराच्या प्रारंभी नरेंद्राने श्रीगणेश व शारदा यांना वंदन केले आहे. या काव्याची कथा भागवतातील दहाव्या स्कंधातील असल्याचे कवी म्हणतो.

**उदा.** 'तो पुराणांतुन आनंद समुद्रुः

तेथ दषमस्कंदु तोच चंद्रु

ते चांदणे सांधैन म्हणे नरींदु

रूक्मिणी स्वैवर ॥४९॥

या कथेत कल्याणकिर्ती भाट वा किन्नर हा नवीन भाग टाकला आहे. मूळ भागवतात तो नाही. 'रूक्मिणीस्वयंवर' हे महाकाव्यसदृश्य काव्य आहे.

**शिशुपालवध (श. १२३५):**

'शिशुपालवध' हा भास्करभट्ट बोरीकरांचा ग्रंथ आहे. यात १०८७ ओव्या आहेत. शिशुपालवधासाठी फक्त १०० ओव्या वापरल्या आहेत. उरलेल्या सर्व ओव्या श्रीकृष्णरूक्मिणी यांच्या विरह आणि प्रणय यांच्या वर्णनासाठी आल्या आहेत. हा ग्रंथ पाहताच प्रवृत्ताजोगा जाला असे". बाईदेवबास म्हणाले, ' ग्रंथु निका जाला असे: परि निवृत्ता जोगा नव्हेचि हा शृंगारिया' प्राधान्य मिळाले आहे.

**उध्दवगीता (श. १२३६):**

शिशुपालवधाच्या ग्रंथाचा बाईदेव्यासांनी दिलेल्या अभिप्रायामुळे पूर्णपणे निवृत्तिपर ग्रंथ लिहिण्याचे भास्करभट्ट बोरीकरांनी ठरविले. त्यातून उद्धवगीतेचा जन्म झाला. व्यासांनी रचलेल्या भागवताच्या एकादशस्कंधावरील भास्करभट्ट बोरीकरांनी ही मराठी टिका लिहिली. एकादशस्कंधावरील हे पहिले भाष्य असून या स्कंधात श्रीकृष्णाने उध्द्वास केलेला उपदेष ८२७ ओव्यांमधून सांगितला आहे. हा तत्वज्ञानपर ग्रंथ होय. यात प्रामुख्याने भक्ती रसाला प्राधान्य आहे.

**वछाहरण (श.१२३८):**

दामोदर पंडिताचा हा काव्यग्रंथ होय. भागवताच्या दशमस्कंधतील १२, १३ व १४ अध्यायांत अघा सुरवधाची वत्सहरणाची कथा आली आहे. त्या कथेच्या आधारे दामोदरपंडितानी ५०३ ओव्यांचे काव्य लिहिले. श्रीकृष्णाच्या गायी ब्रह्मदेवाने पळवल्यानंतर श्रीषणाने ब्रह्मदेवाचे केलेले गर्वहरण ही कथा यात गुंफलेली आहे. या काव्यातून श्रीचक्रधरोक्त तत्वज्ञान सामान्य जनांसाठी सांगितले आहे. भागवताच्या दशमस्कंधावरील मराठीतील हे पहिले काव्य मानले जाते.

**ज्ञानप्रबोध (श.१२५३):**

पंडित विश्वनाथ बाळापूरकर यांनी ज्ञानप्रबोध रचना केली आहे. गीतेतील तेराव्या अध्यायामधील ज्ञानलक्ष्मणे सांगणाऱ्या श्लोकांवरील (७ ते ११) हे भाष्य आहे. १२०४ ओव्या आहेत. यात प्रामुख्याने विरक्ती आणि ईश्वरभक्ती यांचे रहस्य समजावून सांगितले आहे. हा तत्वज्ञानावर आधारलेला ग्रंथ आहे.

**सह्याद्रिवर्णन (श.१२५५):**

रवळोबासांनी सहयाद्रिर्णन लिहिले. महानुभावांनी श्रीकृष्णाप्रमाणेच श्रीदत्तात्रेयालाही (एकमुखी दत्त) पुर्णावतार मानले आहे. माहुरच्या सह्याद्रिपर्वतावरील श्रीदत्तात्रेयप्रभूच्या लीळांचे वर्णन यात आले आहे. माहूरला 'मातापूर' असे म्हटले आहे. ५१७ ओव्यांच्या काव्यात श्रीदत्तात्रेयाचे चरित्र १६० ओव्यात आले आहे. १०५ ओव्यामध्ये श्रीदतात्रयाचे मूर्तिवर्णन असून शेवटच्या ५५ ओव्यात दत्तचरित्र आले आहे. उरलेल्या सर्व ३५७ ओव्यात श्रीचक्रधरस्वामीचे चरित्र आले आहे. ज्ञानेश्वरीच्यानंतर सुमारे ६०-७० वर्षानंतरच्या मराठी भाषेचे स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ उपयोगी ठरतो.

**श्रीऋध्दिपूरवर्णन (श. १२७५):**

नारायणबास बहाळिये यांनी या ग्रंथाची निर्मिती केली आहे. ६४१ ओवीसंख्या आहे. सुरुवातीला श्रीनागांबिका, श्रीनागदेवाचार्य यांचे महत्त्व स्पष्ट करून कवीने त्यांना वंदन केले आहे. 'अहींसु नीसंगु नीवृत्त भक्तियोगु' अशी आपल्या परमार्गाची तत्त्वे सांगितली आहेत. ऋध्दिपूर हे महानुभावीयांचे पवित्र धर्मक्षेत्र आणि तीर्थक्षेत्र होय. येथे श्रीगोविंदप्रभूचे वास्तव होते. पंथ स्थापना ही येथे झाली होती. श्रीगोविंदप्रभू आणि श्रीचक्रधर यांच्या चरण स्पर्शाने पुनीत झालेली ही भूमी आहे. श्रीगोविंदप्रभूचे भक्तिपरचरित्र काव्यबध्द केल्याने आपल्या पापांचे क्षालन होईल या भुमिकेतून नारायणबासांनी या काव्याची निर्मिती केली.

**महानुभाव वाङ्मयाची वैशिष्टये:**

१) महानुभावीय वाङ्मय पंथनिष्ठेवर आधारलेले आहे. तिच त्यांची प्रेरणा होय.

२) पंथाच्या प्रवर्तकांची चरित्रे, लीळा, वचने, आख्यायिका, पंथीय तत्वज्ञान आणि आचारधर्म यांचे जतन करणे, त्यांचे दर्शन घडविणे आणि त्यांचा प्रसार करणे ही भूमिका आहे.

३) गद्य व पद्य या दोन्ही माध्यमातून जाणीवपूर्वक निर्मिती केली.

४) मराठी भाषेत रचना केली. जनसामान्यामध्ये मराठीचा जाज्वल्य अभिमान जागृत केला. 'महाराष्ट्रीय' निरूपिले की गा' असे स्पष्ट सांगितल आहे. प्रथम देवनागरीत रचना केली.

५) यावनी आक्रमणाच्या काळात 'नागरी' किंवा 'सकळी' लिपीत ते बंदिस्त केले. त्यामुळे त्यातील अस्सलपणा टिकून राहिला. सकळ व सुंदर लिपीत साहित्य बंदिस्त केले.

६) विविध वाङ्मय प्रकारात लेखन केले. उदा. चरित्रे, दैनंदिनी, प्रवासवर्णन, स्थलवर्णन, आख्याने, लापनिका, दृष्टांन्त, धवळे, पदे, आरत्या इत्यादी गद्य व पद्य वाङ्मय प्रकार हाताळले.

७) मराठीतीलच नव्हे तर भारतीय भाषांमधील पहिले कथाकाव्य लिहिणारी कवयित्री महदंबा याच पंथाने दिली.

८) छोटी-छोटी वाक्ये, घरगुती स्वरूपाची साधी, सोपी व अनौपचारिक भाषा, वाक्यप्रचार यातून तत्कालीन मराठी समाजाचे आणि सांस्कृतिक जीवनाचे अंतरंग उलगडते.

९) मोजक्या शब्दांत यादवकालीन राजकीय, सामाजिक, साहित्यविषयक, सांस्कृतिक, धार्मिक आणि भौगोलिक परिस्थितीचे चित्र साकार केले आहे.

**महानुभावपंथाचे टीकाग्रंथ:**

श्रीचक्रधरस्वामींच्या वचनाचा अर्थ स्पष्ट करणारे प्रमेयस्थळ ग्रंथ म्हणजे मराठीतील टीकावाङ्मयाचा आरंभ होय. 'सूत्रपाठा'वरील ग्रंथचना दोन प्रकारची आहे. १. संदर्भग्रंथ, २. भाष्यग्रंथ. संदर्भग्रंथात सूत्रांचे प्रसंग सांगणारा 'प्रकरणवस', त्याचे उद्देश सांगणारा

'हेतुस्थळ', त्यांचा लीळांशी संबंध दाखवणारा 'निरुक्तशेष' इत्यादी ग्रंथ येतात. भाष्यग्रंथ, टीकात्मक स्फुट प्रकरणे, 'पंचवार्तिका' सारखे सूत्रांच्या भाषेचे व्याकरण, या सर्व साहित्याचा पाया आनेराजांचा 'लक्षणरत्नाकर' हा संस्कृत ग्रंथ आहे. महानुभावपंथाच्या सर्व टीकाग्रंथाचे बीज यात आहे.

**लक्षणरत्नाकर:**

आनेराजाने लक्षणरत्नाकरची इ.स. १२९६ च्या काळात रचना केली. हा ग्रंथ संस्कृत भाषेत आहे. सूत्रार्थनिर्णयाची लक्षणे बत्तीस सांगितली आहेत. श्रीचक्रधरस्वामींच्या उपदेशानुसार पंथीयांचा आचार असावा म्हणून त्या वचनांचा अर्थ सांगून सूसंगती दाखविण्यासाठी पंडित आनेराजांनी लक्षणरत्नाकर या गद्यग्रंथाची निर्मिती केली. 'त्यांचा हा ग्रंथ म्हणजे महानुभाव पंथाचे मीमांसा शास्त्र होय' असे शं. गो. तुळपुळे यांनी म्हटले आहे. श्रीचक्रधरांनी ही बत्तीस लक्षणे म्हाइंभटांना मराठीतून सांगितली होती. 'अन्वयस्थळ' या ग्रंथात याचा संदर्भ मिळतो हे डॉ. तुळपुळे यांनी दाखविले आहे. पहा -'मग आनोबासीं...... बत्तीस लक्षणेः गोसावी महाराष्ट्रभाषा म्हाइंभटाप्रति निरूपिली होती. तिये संस्कृतें केली." (पृ.३०९, म.वा.इ. खंड १) आनेराजाचे हे कार्य महानुभाव मताच्या विरूध्द होते. कारण लोकभाषेतून ग्रंथरचना करा असे चक्रधरस्वामींनी सांगितले होते.

**व्याकरण ग्रंथ:**

'पंचवार्तिक हे मराठी भाषेचे पहिले व्याकरण ग्रंथ समजण्यात येते. (संदर्भ - मराठी भाषेचे व्याकरण, संपा. मो.स.मोने, १९२७) भीष्माचार्य यांनी ते लिहिले आहे. यात सूत्रलक्षण, सूत्रप्रकृती, सूत्रकारक, सूत्रव्याख्यान व सूत्रस्वरूप ही पाच प्रकरणे आहेत. त्यामुळे या ग्रंथास 'पंचवार्तिक' म्हणतात. या ग्रंथात भाषाविषयक विवेचन व्याख्यात्मक आहे. वचन, प्रकरण, वाक्य आणि महावाक्य हे सूत्राचे चार भेद दिसतात. उदा. 'जेथ एकचि क्रियापद समग्रां पदांते व्यापी तें केवळ वाक्य", उदा. "जीवप्रपंच व्यतिरिक्त सच्चिदानंद स्वरूप परमेश्वरू एकु आतिः" (सूत्रपाठ महावाक्य १) येथे 'आति' हे क्रियापद वाक्यातील सर्व पदांना व्यापते, म्हणून ते केवळ वाक्य होय.

संयुक्त वाक्य 'जेथ बहुतियें क्रियापदें आपुलालेआं पदांते व्यापिती ते संयुक्त वाक्य" उदा. "तुष्टला जनुतरि विखो संपादैलः रूसला तरि प्राणाघतैलः भणौनि उभयता जनसंबंधु त्याज्य।।" (सूत्रपाठ आचार २०) येथे 'संपादैल', 'घतैल' व त्याज्य (असे) ही क्रियापदे आपापली पदे व्यापतात, म्हणून त्यांना संयुक्त वाक्य म्हणतात. 'सूत्र' कल्पना हा 'पंचवार्तिक' या ग्रंथाचा पाया आहे. येथे अर्थनिर्णयन केले आहे.

**'प्रकरणवस':**

हा ग्रंथ परशरामाबासाने लिहिला असून तो सर्वात प्राचीन (इ.स. १३३८) आहे. 'सूत्रपाठा' तील सूत्रे स्वामींच्या तोंडून केव्हा, कोठे, कोणत्या प्रसंगाने व कोणास अनुलक्षून निघाली ते 'प्रकरणवस' यात मांडले आहे.

**'हेतुस्थळ':**

श्रीचक्रधरांच्या सूत्रांची पार्श्वभूमी सांगणे हा या ग्रंथाचा हेतू आहे. न्यायबासांनी हे लिहिले आहे. श्रीचक्रधरांना प्रत्यक्ष पाहिलेले नाही. परंतु त्यांच्या मूर्तीचे वर्णन सुंदर आहे.

'प्रकरणवस', 'हेतुस्थळ' आणि 'निरुक्तशेष' हे महानुभावांचे तीन साधन ग्रंथ महत्त्वाचे आहेत. या तीनही ग्रंथाचा हेतू श्रीचक्रधरांचे सूत्र संसदर्भ अर्थ सांगून उद्देश स्पष्ट करणे.

**लापणिक / लापिका:**

लापिका म्हणजे ''वर्ण्य विषयाचा पूर्वापार संबंध आणि सार.'' चक्रधरस्वामींच्या 'दृष्टांन्ता' वरील लापिकांना 'लापणिक' असे म्हणतात. लापणिक म्हणजे 'दृष्टांन्तापाठातील तात्त्विक विचारांचा अनुक्रम होय.

टाचण्या म्हणजे महानुभावाचे वेगवेगळे भाग झाले, त्या त्या भागातील शिष्यांनी सूत्रपाठावर चर्चा करून काढलेल्या टाचण्या. या टाचण्या त्या त्या भागातील महतांचे पक्ष होत. असे एकूण चोवीस पक्षकार आहेत. ते डॉ. तुळपुळे यांनी त्यांची क्रमशा: नावे दिली आहेत. ते मुळातून वाचावे.

**'गुढा'**:

गुढा या टीकाप्रकाराची सुरुवात केशिराजांनी केली आहे. गुढा म्हणजे त्यात गुहयार्थ स्पष्ट करून दाखविलेला असतो असे प्रकरण.

**लक्षण**:

लक्षण म्हणजे स्पष्टीकरणात्मक संक्षिप्त व्याख्या या अर्थाने वापरला जातो. वरील सर्व टीका प्रकार नागदेवाचार्यांच्या हयातील निर्माण झाले परंतु त्यांचे स्वरूप त्रोटक होते.

**प्रमेय**:

'प्रमेय' म्हणजे तत्त्व किंवा सिध्दान्त.

सूत्रपाठ आणि दृष्टांन्तपाठातून निवडून त्यावर केलेले गद्य भाष्य म्हणजे प्रमेयग्रंथ. थोडक्यात 'प्रमेय' हा आद्य टीका प्रकार त्याचा आरंभ केशिराजांनी केला असावा, असे अभ्यासकांचे मत आहे. 'महानुभाव परंपरेप्रमाणे प्रथम 'प्रमेय' रचना झाली. मग स्थळ (भाष्ये) निर्माण झाले व शेवटी 'बंध' म्हणजे महाभाष्ये लिहिली गेली, असे डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी नमूद केलेले आहे. (म.सा.प.खंड १)

**बल्हो**:

बल्हो म्हणजे बरळताना मुखातून बाहेर पडलेले शब्द, उदा. आनोबासाचे काळक्रिया बल्हो',

**सारांश:**

महानुभावपंथाने महाराष्ट्रामध्ये ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्य विषयक कार्य केले. मराठी भाषेतून ग्रंथरचना केली. महानुभाव ग्रंथाचे मोल अनमोल आहे. संदर्भ ग्रंथ म्हणून या ग्रंथाचा अभ्यासकांना उपयोग होतो. यादवकाळातील लोकजीवन समजून घेण्यासाठी ही ग्रंथरचना उपयुक्त आहे

*****

munotes.in

# १क

## महानुभावपंथाची साहित्य संपदा गद्यग्रंथ

### १) लीळाचरित्र (१२०५):

मराठीतील पहिला चरित्रग्रंथ. श्रीचक्रधरस्वामींच्या लीळा (आठवणी) त्यांच्या शिष्याने म्हाइंभट्टाने संकलित करून चरित्ररूपाने मांडल्या. लीळाचरित्राची विभागणी एकाक, पूर्वार्ध व उत्तरार्थ अशा तीन भागात आहे. एकूण लीळांची संख्या १५०९ आहे. तत्कालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक जीवनातील अनेकविध वैशिष्ट्ये, घडामोडी वृत्ती प्रवृत्ती यांचे दर्शन 'लीळाचरित्रातून' घडते. त्यामुळे सांस्कृतिक दस्तऐवजाचे महत्त्व प्राप्त झाले आहे. चक्रधरांना पाहिल्याबरोबर (अयाः कैसे सौंदर पुरुश: साक्षात गोरक्षनाथू असे उद्गार लोक काढत 'लीळाचरित्र' म्हणजे महानुभावीय वाङ्मय आणि तत्वज्ञानाचा मूलाधर होय. या ग्रंथातील चक्रधरांच्या वचनांच्या आधारेच पुढे 'सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ', 'रत्नमालास्तोत्र' या ग्रंथाची निर्मिती झाली. लीळांची रचना पहा.

लीळाचरित्राच्या 'एकाक' मध्ये चौऱ्याहत्तर लीळा आल्या आहेत. 'एकाक'मध्ये श्रीचक्रधर एकाकी जीवन जगत होते. त्यावेळचे प्रसंग त्यात आले आहे. श्रीचक्रधरांची शिष्या महदंबा हीने चक्रधरांच्या पूर्वायुष्याविषयी जाणून घेण्यासाठी त्यांना प्रश्न विचारीत असे. तिच्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी कधी कधी श्रीचक्रधरस्वामी एकाकी जीवनातील भ्रमंतीच्या काळातील आठवणी सांगत. महदंबेविषयी श्रीचक्रधर म्हणतात, "म्हातारी जिज्ञासकः म्हातारी एथ कांही पुसतचि असे" (लीळाचरित्र उत्तरार्ध ४७३) एकाकातील चौथ्या लीळेत चांगदेव राउळांनी गुजराथच्या प्रधानपुत्राच्या मृतदेहात प्रवेश करून हा नवीन अवतार स्वीकारण्याची गोष्ट सांगितली आहे. एकाकात भरवस येथे मृतदेह उठविल्यापासून ते पैठण येथे येईपर्यंतचे प्रसंग आले आहेत.

पुर्वार्धात ३५८ लीळा आहेत. नागांबिकेला केलेले प्रेमदान इथपासून ते थेट श्रीनागदेवाचार्यांना केलेल्या ज्ञानदानापर्यंतचा भाग त्यात आला आहे. इथपासून लीळाचरित्राचा उत्तरार्ध सुरू होतो ते त्यांच्या महाप्रयाणापर्यंत. म्हाइंभट्टाने या लीळांचे संकलन केले. आणि त्या लिहून काढल्या.

लीळाचरित्राची निर्मिती झाल्यानंतरच्या काळात दक्षिणेकडील मुलुखावर मुसलमानांनी आक्रमण केले. दिल्लीच्या अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलिक काफूर याने देवगिरीवर स्वारी केली. या धावपळीत लीळाचरित्राची प्रत गहाळ झाली होती. महानुभाव संप्रदायातील अनेक मंहतांची पळापळ झाली. त्यापैकी हिराइसेला लीळाचरित्र तोंडपाठ होते. परशुरामबासांनी तिच्या सहकार्याने हा ग्रंथ पुन्हा लिहिला होता. याचा संदर्भ कृष्णमुनीच्या 'अन्वयस्थळ' या ग्रंथात मिळतो.

> "माहींभटबासीं लीळाबंध केला: तो धाडी माजीं गेला सकळही"॥
>
> लीळा तीन्ही रुपा हीरांबा शोधनी: पुस्तके लिहूनी बंध केला ॥

तीया लींळाआधारे आदी तीन्ही रूपे: केल्या ज्ञानदीपे परशुरामें ॥''

हिराइसे प्रमाणे आणखी काही महानुभावांच्या लीळाचरित्र तोंडपाठ होते. त्यांचीही मदत घेऊन लीळाचरित्राचे संशोधन व संस्करण केले. यालाच 'पिढीपाठ'असे म्हणतात.

विद्यार्थीमित्रांनो लीळाचरित्रातील एक लीळा येथे देत आहे. यावरून तुम्हाला लीळांचे स्वरूप व रचना लक्षात येईल. यादवकालीन मराठी भाषा कशी लिहिली जात होती हे ही समजेल. श्रीचक्रधरस्वामींच्या व्यक्तीमत्त्वावर प्रकाश टाकता येईल. ''गोसावीयांसी गावीं एकी वृक्षाखालि आसन: तवं पारधी वाटे ससा सोडीला: तया पाठीं सुणीं सोडीलीं: काकुळती येउनि ससा जानू तळिं रीगाला: सूणीं उभी राहिलीं: मागील कडौनि पारधी आले: तेहीं वीनवीलें: 'ससा सोडीजो जी': सर्वज्ञे ह्मणीतले: 'हा एथ सरण आला': पुढती तीहीं ह्मणीतले: 'जी जी: हा होडेचा ससा जीः या कारणें सूरीया काढणीया होती: जी जीः हा सोडावा जी': सर्वज्ञे ह्मणीतले। ' हां गा: एथ सरण आलेया काइ मरण असे': 'जी जी: तरि हा गोसावी राखींला' ॥ मग ते नीगाले: मग सर्वज्ञे ह्मणीतलें: 'माहात्मे होः आतां जाए': ऐसें भणौनि जानू उचलिली: मग ससा नीगाला (एकाक, २३)

**लीळाचरित्रांची वैशिष्ट्ये:**

१) मराठी भाषेतील पहिला चरित्र ग्रंथ

२) आठवणींच्या रूपाने लीळांचे संकलन

३) भाषा सरळ व सोपी आहे. छोटी छोटी वाक्य आहेत.

४) तेराव्या शतकातील महाराष्ट्राचे जीवनचित्र लीळाचरित्रात उमटले आहे.

५) तेराव्या शतकातील सण-उत्सव, व्रतवैकल्ये, चालीरीती, नाणी, (आसू, दाम, रूका, कवडा, पाइका), वस्त्रेप्रावरणे, व्यापार, तेली, परीट, शिंपी, चांभार, कासार इत्यादींची चित्रे उमटली आहेत.

६) लीळाचरित्राच्या आधारे, सूत्रपाठ, दृष्टांतपाठ, रत्नमालास्तोत्र इत्यादी ग्रंथाची निर्मिती झाली.

७) लीळाचरित्र हा ग्रंथ स्मरणभक्तीचा सुंदर अविष्कार आहे. डॉ. वि. भि. कोलते यांनी यास चक्रधरस्वामीची 'दैनंदिनी' आहे असे म्हटले आहे.

८) लीळाचरित्र गहाळ झाल्यावर हीरांबा, परशुराम, सिवबास आणि मरारीमल्ल यांनी कष्ट पूर्वक लीळाचरित्राची प्रत तयार केली.

**लीळाचरित्राची भाषाशैली:**

लीळाचरित्राची भाषाशैली म्हणजे तत्कालीन बोलीचा सुंदर अविष्कार आहे. ती ग्रांथिक भाषा नाही. उदा.

''मग एकुदीसीं दादोसीं गोसावीयातें विनवीलें

''जी जी: मज एकान्तु देयावाः''

सर्वज्ञें म्हणीतले,

''एथ कोण गा लोकान्तु असे?''

''ना जी: मज एकान्तु देयावाः''

सर्वज्ञे म्हणीतले,

''अळंचुपाळंचु न कीजे: ओठान्तरे नीगैल ते देशान्तरा जाइलः''

''ना जी: मज एकान्तु देयावाः'' (लीळा ३०६)

आबाइसेची संताप प्रकट करणारी भाषा पहा -

'देशकाळीचिया दंटीया चिया वरतियांचि माना'

(रांगोळी काढत असताना स्वामींच्या उपरण्याच्या टोकोने पुसली तेव्हांचा आबाइसेचा संताप) म्हाईभटांनी शब्दचित्रे व संवाद प्रभावी रेखाटले आहे. बोलीभाषेतील ठसका व गोडवा याने ती परिपूर्ण आहेत. उदा. 'आपला भातू, आपुला हातु' (पूर्वार्ध २८७) 'वोठान्तरे निगैल ते देषान्तरा जाइल' (उत्तरार्ध- १) 'दात असती तेथे चणे नाही', 'भरलेल्या गाडया काइ सूप जड',:एकाची गेली वाटी, एकाची गेली पाटी', इत्यादी म्हणी व वाक्प्रचारातून लोकभाषा येते. लीळाचरित्र वाचताना ते चित्र डोळयापुढे उभे राहते. अशी ताकद म्हाइंभट्टाच्या शैलीत आहे. महदंबा, नागदेवाचार्य, बाईसा, दादोस यांची शब्दचित्रे भावपूर्ण रेखाटली आहेत. श्रीचक्रधरस्वामींच्या व्यक्तीमत्त्वामध्ये करुणा, अहिंसा, क्रीडा, निःस्पृहवृत्ती, गुरुभक्ती, वेधकत्व आणि सौंदर्य इत्यादी गुणवैशिष्ट्ये ठासून भरलेली आहेत. 'लीळाचरित्र' म्हणजे चक्रधरस्वामींच्या भक्तजनांची एक चित्रशाळाच आहे' असे शं. गो. तुळपुळे म्हणतात ते योग्यच आहे.

### २) श्रीगोविंदप्रभूचरित्र:

हा म्हाइंभटाचा दुसरा ग्रंथ आहे. श्रीगोविंदप्रभूंचा जीवनपट स्मृतिरूपाने ३२३ लीळांतून मांडला आहे. महानुभाव पंथामध्ये या ग्रंथाचा उल्लेख ऋध्दिपूरलीळा किंवा ऋध्दिपूरचरित्र असा केला जातो. वि. भि. कोलते यांनी त्यांचे 'श्रीगोविंदप्रभूचरित्र' असे नामकरण केले आहे. तत्कालीन सामाजिक परिस्थिती खाद्यपदार्थ उदा. कानवला, धिरडे, राळयाचा भात, साकरमांडे इत्यादी माहिती येते. श्रीगोविंदप्रभूच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. "श्रीमूर्तिपासौनि प्रकासु गगनापर्यंत वाहिनला" त्यांचे वेडेपिसे व्यक्तिमत्व स्वतंत्र चिंतनाचा विषय आहे.

गोंविदप्रभूंच्या मृत्युनंतर सहा महिन्यातच म्हाइंभट्टाने चरित्र लिहून पूर्ण केले असावे, असे अभ्यासकांचे मत आहे. गोविंदप्रभूंच्या जन्मापासून मृत्युपर्यंत सुमारे सव्वातीनशे लीळा या चरित्र ग्रंथात आल्या आहेत. लीळाचरित्र या ग्रंथात आलेल्या आठवणी वगळून हे चरित्र लिहिले आहे. त्यामुळे पुनरूक्ती टाळली आहे.

परमेश्वराचे अवतार घेण्याचे प्रकार तीन आहेत. गर्भ, पतित आणि दवडणे पैकी ते गोविंदप्रभुंचा अवतार 'दवडण्या'चा प्रकारांपैकी असल्यामुळे आईच्या गर्भातच दवडले होते. तो जीव वेडापिसा असल्याने त्याचे हे देहधर्म त्यांनी स्वीकारले असे दिसते. त्यामुळे त्यांची किर्ती ''राउळवेडे: राउळ पिसे'' अशी होती. गोविंदप्रभूंचा वावर रिधपूरपासून जवळजवळ पंचवीस कोस म्हणजे अमरावती जिल्हयात होता. त्यामुळे वऱ्हाडी बोलीचा उत्तम नमुना असे या चरित्र ग्रंथाचे वर्णन केले जाते.

गोविंदप्रभू तत्कालीन लोकांना ''राउळ माएः राऊळ बापु'' असे वाटत होते. 'राऊळीं माझें दुःख नीरसींले', 'राऊळें आमुची लेकुरवें बाळे राखीली' असे उद्गार काढू लागले. 'आवो मेली जाए' ही षिवी त्यांच्या तोंडी होती. गोविंदप्रभूंचे सामाजिक जीवनही सेवावृत्तीने गाजले. त्यांनी गोरगरीब, दुःखी, अडलेल्या लोकांची सेवा निरपेक्ष भावनेने केली. गोविंदप्रभूंना अनुग्रह चांगदेव राउळांनी दिला. गोविंदप्रभूंनी श्रीचक्रधरांस अनुग्रह दिला. थोडक्यात गोविंदप्रभूंचे कार्य सांप्रदायिक दृष्टया महत्त्वाचे होते.

### ३) दृष्टांतपाठ:

केसोबासांनी 'दृष्टांतपाठ' ग्रंथ संपादित केला आहे. दृष्टांतपाठात एकूण ११४ दृष्टांत आहेत. श्रीचक्रधरांचे सूत्र आणि दृष्टांत आहेत. द्राष्टांतिक केसोबा यांनी लिहिली आहेत. यादवकालीन नागरी आणि समाज जीवनाचेही दर्शन घडते. उदा.

चक्रधरस्वामी श्रोत्यांना विचार सांगत असताना तो नीट कळावा यासाठी दृष्टान्त देत असत. लीळा चरित्रात अनेक दृष्टांत महाइंभटांनी संकलित केले होते. केसोबासांनी त्यातून ११४ दृष्टान्त निवडले. त्यातून दृष्टान्तपाठ ग्रंथ तयार झाला.

विद्यार्थी मित्रांनो आपण येथे एक दृष्टांत पाहू. म्हणजे तुम्हाला दृष्टांत आणि दार्ष्टान्तिक कसे ते समजायला मदत होईल.

- **सूत्र:** जवं पुरुश विद्येआधिन नव्हे तवं ब्रह्मविद्या अधिकार आति ।। १।।
  बीढारावरि काइ बीढार असे ।। २।।
- **दृष्टान्त:** कव्हणी एकि माता असे: ते हातीं तुपभाताची वाटी घेउनि लेंकुरवासि घांसु सुए: तें तोंड ऐसे पळवी ऐसें पळवी: मग ते म्हणे: आले असैल आलेयापालेया पोट भरूनि: म्हणौनि खाली वाटी ठेवी
- **दार्ष्टान्तिक:** तैसे विद्यामार्ग नावेंचि आलेपाले असति: तेथ ब्रह्मविद्या कें रीगो लाहील । तैसें परमेश्वर प्रवृत्तिवशें निरूपित असतः परि जीवु साधनाचेनि घालेपणे नेघेः ते घालेपण येवों नेदावें।। अशा प्रकारे चक्रधरस्वामी लोकांना निरूपण करीत असत.

### ४) सूत्रपाठ (इ.स. १२०७):

'सूत्रपाठ' या ग्रंथास महानुभावांचा वेद असे संबोधले जाते. महानुभावांचे तत्त्वज्ञान या ग्रंथातून आले आहे. केसोबासांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. १२५५ सूत्रे आहेत. जीव, देवता प्रंपच आणि परमेश्वर हे चार मुख्यपदार्थ मानले आहेत. ते अनादि, अनंत, स्वतंत्र,

नित्य आहेत. देवता नित्यबद्ध जीव बध्दमुक्त, परमेश्वर नित्यमुक्त आणि प्रपंच अनित्य आहे. असे या तत्त्वज्ञानाचे सूत्र आहे.

सूत्रपाठात केसोबासांनी निवडलेली ७८२, परशुराम व रामेश्वर यांनी अनुक्रमे निवडलेली २४० व २१८ आणि पूर्वी, पंचकृष्ण व पंचनाम यांची १५ अशी एकूण १२५५ सूत्रे आहेत. ‘‘दुःख रूपता: पापमूलता: अनित्यताः इये तीन्ही नव्हेति: तरि संसारा वाचौनि आणिक काही गोमटें असे:’’ प्रापंचिकांना मार्गदर्शन करण्यासाठी हे श्रीचक्रधरांचे तत्त्वज्ञान आले आहे. सूत्रपाठ ग्रंथ महानुभाव तत्त्वज्ञानाचा पाया आहे. छोटी छोटी वाक्यरचना, कमीतकमी शब्दात व्यापक अर्थ प्रकट करणारी शैली हे सूत्रपाठाचे वैशिष्ट्ये आहे. उदा. ‘जवं जवं जाणताः तवं तवं नेणता:॥’’ (विचार १६४), ‘‘ पोळलेल्या सुनेयाचेया परी असावें:॥’’ (आचार २१९) ‘‘लोहें पाणी गिळिलें ऐसें होउनि असावें:॥’’ (आचार १९९) इत्यादी. किंवा ‘‘देवो माझा मी देवाचा ऐसेया परी असीजो की देमतीः’’ ‘‘नीरसा: निराशा: निराश्रया: होउनि असावे.’’ ‘‘गावाचां कडिसरा खांड देउळी एकी पाहिजे: तेथ श्वानकुंडली घालीजे इत्यादी.

**५) पूजावसर (नित्यदिनीलीळा):**

बाईदेवव्यासांनी स्मरणातून हा ग्रंथ निर्माण केला. श्रीचक्रधरस्वामी आणि श्रीगोविंदप्रभू यांचे सानिध्य त्यांना लाभले होते. पुजावसार म्हणजे श्रीचक्रधरांची समग्र दिनचर्या होय. यालाच ‘नित्यदिनीलीळा’ असे म्हणतात.

**६) स्मृतिस्थळ:**

स्मृतिस्थळ या ग्रंथाचा लेखक एक व्यक्ती नसून अनेकांच्या पाठांचे हे संकलन आहे. नरेंद्र व परसरामबास हे मूळ लेखक होत. नागदेवाचार्यांचे चरित्र यात आले आहे. त्यांना भटोबास असे म्हणतात. नागदेवांच्या वचनांना स्मृती असे संबोधतात. एकूण २६१ स्मृती आहेत. अनेक ग्रंथकारांची आणि चक्रधरस्वामींच्या नंतरची महानुभावपंथांची सर्व हकीकत यात आहे. चक्रधरस्वामींनी जो दंडक घालून दिला जातो. तो त्यांच्या प्रयाणानंतर नागदेवाचार्यांनी चालू ठेवला. मराठीतून ग्रंथरचना करण्यास प्रोत्साहन दिले. दामोदर पंडिताने आणि केशवदेवाने त्यांना संस्कृत मधून ग्रंथरचनेचा आग्रह केला तेव्हा ते म्हणाले, ‘पंडिताः केशवदेया तुमचा अस्मात कस्मात मी नेणे गाः मज श्रीचक्रधरें निरूपिली मऱ्हाठी नियाची पुसा अशा शब्दात नागदेवाचार्यानी खडसावले. मराठीचा अभिमान जागृत केला. ‘गोसावियांचा व्यापरू चालविता कोणा माझे वेकास गेले असैल तरि तुम्ही क्षेमा करावी’ असे अंत्यसमयी त्यांचे उद्गार होते. संदर्भ ग्रंथ म्हणून या ग्रंथाचे महत्त्व आहे. तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक घडामोडींची माहिती मिळते.

नागदेवाचार्य उर्फ भटोबास हे पंथाचे पहिले आचार्य होते. श्रीचक्रधरस्वामींनी जे विचार शिष्यांना सांगितले त्यांनी घालून दिलेल्या मार्गावर चालून शिष्यांनी आचारधर्म पाळला. हा आचारधर्म म्हणजेच नागदेवाचे स्मृतिस्थळ होय. महानुभाव संप्रदायात पुढील शब्दांना विशिष्ट अर्थ आणि महत्त्व आहे. ‘श्रुती’, ‘स्मृती’, ‘वृध्दाचार’, मार्गरूढी व वर्तमान अशी ही परंपरा दिसते. श्रीचक्रधरांच्या वचनांना ‘श्रुती’ असे म्हणतात. नागदेवाचार्यांचे निरूपण तीला ‘स्मृती’ म्हणतात. (चक्रधरांच्या तोंडून ऐकलेली वचने इतरांना सांगितली.) नागदेवाचार्यांच्या शिष्यांचे (बइदेवोबास, केषवदेव, महदंबा, आनोबास, दामोधर पंडीत

आणि कवीश्वर) निरूपणे तो 'वृध्दाचार', कवीश्वरांच्या शिष्यांचे निरूपण त्यास 'मार्गरूढी' आणि त्यानंतरच्या निरूपणास 'वर्तमान' असे म्हणतात.

नागदेवाचार्यांचे आचार्यपदापूर्वीचे जीवन लीळाचरित्रात वाचायला मिळते. पूर्वार्धातील त्यांचे छंदीफंदी वागणे संप्रदायात आल्यावर बदलले आणि ते आचार्य झाले. श्रीचक्रधराचे एकनिष्ठ शिष्य व भक्त झाले. नागदेवाचार्य म्हणतात, ''मज गोसावीं अधिकरण केलें असे: म्हणौनिची मी अवघे यांचा गुरू: येऱ्हविं अवघिया श्रीचक्रधराचिया धुरा: आणि माझे हाकारेः''

ते शेवटपर्यंत निरंहकारी राहिले. अखेरच्या क्षणी नागदेवाचार्य म्हणाले, '' गोसावियांचा व्यापारू चालवितां कोण्हा वेकास गेलें असैल तरि तुम्ही समस्तीं क्षेमा करावीः'' अशी नम्रता त्यांच्या अंगी होती. एकदा त्यांच्या भक्तगणातील एकाने नागदेवाचार्यांना विचारले, ''भटो, तुम्ही काइ ईश्वरः'' त्यावर ते म्हणतात, ''ना आम्ही ईश्वराचे भक्त.'' यातून त्यांची पंथाविषयीची आणि स्वामीविषयीची निष्ठा कळते.

'स्मृतिस्थळ' कुणा एका लेखकाचे नसून त्यात अनेकांच्या पाठांतील कमी अधिक मजकूर मिसळला गेला असावा.' असे वा. ना. देशपांडे यांचे मत आहे. नरेंद्रबासाने सातशे स्मृती 'जैसिया वर्तलिया तैस्याचि' लिहिल्या. मालोबासाने पाचशे स्मृती आणि वृध्दाचार 'अन्वयी लाविला' परशरामबासाने स्मृतींचा दुसरा बंध तयार केला. (प्र.२७१, म. वा. इ. खंड १: सं. पा. डॉ. तुळपुळे)

महानुभाव संप्रदायातील ग्रंथाची निर्मिती कशी झाली याची हकीकत स्मृतिस्थळात वाचायला मिळते. उदा. लीळाचरित्र, सुत्रपाठ, दृष्टांतपाठ, रत्नमालास्तोत्र, चौपद्या इत्यादी. 'स्मृतिस्थळ' हा ग्रंथ वाङ्मयीन उल्लेखांनी समृध्द झाला आहे. हेच त्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे.

स्मृतिस्थळाची भाषा पहा- उदा. ''भलें केलें केशवदेया: गोसावी यांची या अमोघा लीळा बांधलीया: तुवां वाक्पुष्पीं ईश्वरार्चन केलेः'' (स्मृति १४)

''नको गा केशवदेया: येणें माझिया म्हातारी या नागवतील:''(स्मृति १५)

''पंडिताचें गीत तें माझे हाकारे गा:'' (स्मृति ९१)

**७) स्थानपोथी (इ.स. १३५३):**

मुनिव्यास कोठी यांनी स्थानपोथी लिहिली. स्थानपोथी ही पंथीय यांत्रेकरूंना मार्गदर्शन ठरणारी आहे. परिभ्रमणात श्रीचक्रधर व श्रीगोविंदप्रभू यांच्या स्पर्शाने पुनीत झालेल्या स्थानांचे श्रध्दापूर्वक वर्णन या ग्रंथात आहे. २५० गावे, देव, देवता, मठ, पटिशाळा, विहिरी, तळी, नदीघाट, स्मशाने, वृक्षांचे पार इत्यादीची माहिती मिळते. स्थळमहात्म्यपर ग्रंथ आहे. हा संकलनात्मक ग्रंथ आहे.

*****

# १ड

## ग्रंथकार परिचय

**बोपदेव:**

वऱ्हाडातील विद्वान ब्राम्हण. बोपदेवाने व्याकरणावर दहा, वैद्यकावर नऊ, ज्योतिषावर एक, सहित्यशास्त्रावर तीन व तीन भागवतावर तीन असे सव्वीस प्रबंध संस्कृतात लिहिल्याचे हेमाडपंडित सांगतो. हा हेमाडपंडिताचा मित्र होता.

**हेमाद्री उर्फे हेमाडपंडित:**

कृष्णदेव व महादेव यादव यांच्या कारकिर्दीतील 'करणधिप' (फडणीस गणकागणी) व रामदेवराव यादवाचा मुख्य प्रधान याने धर्मशास्त्रावर संस्कृतमध्ये अनेक ग्रंथ केले असून त्यांत 'चतुर्वर्गचिंतामणि' या ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. व्रतखंड, दानखंड, तीर्थखंड, मोक्षखंड व परिशेषखंड असे या ग्रंथाचे पाच भाग आहेत. अनेक कर्ममार्गाचे एकीकरण या ग्रंथात केले आहेत. व्रतखंडातील राजप्रशस्तीत यादव घराण्याचा इतिहास हेमांद्रीने दिला आहे. बाजरीचे पीक, मोडी लिपी व घरे, देवळे बांधण्याची नवी पध्द्त (हेमाडपंती शिल्प) या तीन गोष्टी रूढ केल्याबद्दल हेमांद्री प्रसिद्ध आहे. हेमाद्री वैदिक धर्माचा कट्टर अभिमानी होता. म्हणून महानुभाव पंथीयांशी त्याचा अनेकदा विरोध झाला.

**दिर्घोत्तरी प्रश्न:**

प्र.१ मराठी भाषेचा उत्पत्तिकाल व कोरीव लेखांचे महत्त्व थोडक्यात स्पष्ट करा.

प्र.२ महानुभाव संप्रदायाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करून पंचकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचा थोडक्यात आढावा घ्या.

प्र.३ महानुभाव वाङ्मयाचा थोडक्यात आढावा घ्या.

प्र.४ महानुभावांच्या चरित्र ग्रंथाचा परिचय करून द्या.

प्र.५ महानुभाव पद्यवाङमयाचा परामर्श घ्या.

प्र.६ 'महानुभाव संप्रदायाने मराठी गद्यांची वैभवशाली परंपरा निर्माण केली' चर्चा करा.

प्र.७ मध्ययुगीन मराठीतील उपलब्ध पुराव्यांच्या आधारे मराठीचा उत्पत्तीकाळ विशद करा.

प्र.८ महानुभवियांच्या गद्य सहित्याची वैशिष्टये साधार स्पष्ट करा.

munotes.in

**टीपा लिहा.**

१) मराठीतील आद्यग्रंथ

२) पंचकृष्ण संकल्पना

३) धवळे

४) महानुभावांचे तत्त्वज्ञान

५) कवी नरेंद्र

६) संत नामदेव

७) संत कवयित्री मुक्ताबाई

८) संत जनाबाई

९) संत बहिणाबाई

१०) भारूड

११) चतुष्लोकी भागवत

१२) संत तुकारामाच्या अभंगाची वैशिष्टये

१३) पंडिती काव्याचे गुणदोष

१४) पंडित कवी मोरोपंत

१५) रघुनाथ पंडित

१६) आद्य कवयित्री महदंबा

**संदर्भ ग्रंथ:**

१) जोग, रा. श्री. व इतर (संपा.) मराठी वाङ्मयाचा इतिहास-खंड ३, महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे प.आ. १९७३.

२) तुळेपुळे, शं.गो., पाच संतकवी, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९८४, (ति.आ.).

३) तुळेपुळे, शं.गो. व इतर (संपा.) मराठी वाङ्मयाचा इतिहास-खंड १, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे प. आ. १९८४.

४) मालषे, सं.गं. व इतर (संपा.) मराठी वाङ्मयाचा इतिहास-खंड २ भाग १ व भाग २, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे प. आ. १९८२.

५) भावे वि.ल. महाराष्ट्र सारस्वत, पॉप्युलर, मुंबई, आ. ५ वि १९६३.

munotes.in

६) धोंड ,म. वा., (संपा.) मऱ्हाटी लावणी, मौज, मुंबई १९५६.

७) शेणोलीकर, ह. श्री. प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७१.

८) सहस्त्रबुध्दे, म.ना. मराठी षाहिरी वाङ्मय, ठोकळ, पुणे, १९६१.

९) सरदार गं. बा., संत साहित्याची सामाजिक फलश्रुती, म.सा.प. पुणे १९७० (ति.आ.).

*****

munotes.in

# २ अ

## मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १

**वारकरी पंथीयांचे वाङ्मय:**

अ) यादवकालीन महाराष्ट्रात वारकरी पंथाची प्रस्थापना, पंढरीचा भक्तीसंप्रदाय हा महाराष्ट्रातील प्रमुख वारकरी संप्रदाय म्हणून तेराव्या शतकात धार्मिक, सामाजिक व साहित्यिकदृष्ट्या प्रभावी.

ब) ज्ञानदेव-नामदेव व त्यांच्या प्रभावळीतील इतरांचे वाङ्मय.

**घटक रचना**

२अ.० उद्देश

२अ.१ प्रस्तावना

२अ.२ विषय विवेचन

२अ.३ यादवकालीन महाराष्ट्रातील सामाजिक पर्यावरण

२अ.४ यादवकालीन महाराष्ट्रात वारकरी पंथाची प्रस्थापना

२अ.५ पंढरीच्या भक्तीसंप्रदाचे धार्मिक आणि सामाजिक योगदान

२अ.६ पंढरीच्या भक्तीसंप्रदाचे वाङ्मयीन महत्त्व

२अ.७ ज्ञानेश्वरांचे वाङ्मय

- १. ज्ञानेश्वरी
- २. अमृतानुभव
- ३. चांगदेवपासष्टी
- ४. स्फुटअभंग रचना
- ५. समारोप

२अ.८ नामदेव

- १. नामदेवांचे कर्तृत्व
- २. आत्मचरित्रपर अभंग
- ३. ज्ञानेश्वरचरित्र
- ४. बाळक्रीडेचे अभंग
- ५. आरती
- ६. समारोप

२अ.९ संतमेळ्याची अभंगवाणी

- २.९.१. ज्ञानेश्वरपंचक
- १. निवृत्तिनाथ

munotes.in

२. सोपानदेव
३. मुक्ताबाई
४. चांगदेव
२अ.९.२ नामयाचा संतमेळा
१. गोरा कुंभार
२. सावता माळी
३. विसोबा खेचर
४. नरहरी सोनार
५. चोखामेळा आणि परिवार
१) सोयराबाई
२) बंका महार आणि निर्मळाबाई
६. सेना महाराज
७. परिसा भागवत
८. जनाबाई
२अ.१० समारोप
२अ.११ प्रश्नसंच
२अ.१२ संदर्भ

## २अ.० उद्देश

१) मराठी वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना यादवकालीन महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाची माहिती करून देणे.

२) महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाची स्थापना आणि स्वरूप यांचा परिचय करून देणे

३) तेराव्या शतकातील महत्त्वपूर्ण पंढरीचा भक्तीसंप्रदाय म्हणजेच वारकरी संप्रदायाचे सामाजिक, साहित्यिक कार्य विशद करणे.

४) संत ज्ञानदेव आणि संत नामदेव यांचे वारकरी संप्रदायातील वाङ्मयीन योगदान स्पष्ट करणे.

५) वारकरी संप्रदायातील महत्त्वाच्या संतांच्या काव्यरचनेचा परिचय करून देणे.

## २अ.१ प्रस्तावना

तेराव्या शतकातील भक्तीसंप्रदायाने महाराष्ट्रात सामाजिक आणि धार्मिक स्थित्यंतर घडवले. याच काळापासून ग्रंथनिर्मिती सातत्याने होऊ लागली. आजच्या समृद्ध मराठी साहित्य परंपरेची पायाभरणी येथे झाली. त्यामुळे मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात तेराव्या शतकातील धार्मिक आणि सामाजिक परिस्थिती नेमकी कशी होती? वाङ्मयाचे

स्वरूप नेमके कसे होते? वाङ्मय निर्मितीसाठी कोणती प्रेरणा होती? तसेच कोणकोणते रचनाप्रकार या काळात अभिव्यक्तीसाठी निर्माण झाले. हे जाणून घेणे आवश्यक ठरते. ज्ञानदेव, नामदेव तसेच अनेक संतानी या काळात आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अभंगवाणीने मराठी पद्यवाङ्मयाला दिशा दिली. सर्वसामान्य लोकांना भक्तीसंप्रदायाने सांगितलेल्या अध्यात्मिक मार्गामुळे आत्मबळ मिळाले. एकूणच, तेराव्या शतकातील विविध स्थित्यंतरे आणि भक्तीसंप्रदायाच्या कार्याचे स्वरूप नेमके कसे होते, याचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

## २अ.२ विषय विवेचन

तेराव्या शतकातील समाजमनावर निरनिराळ्या उपासना पद्धतींचा प्रभाव होता. संन्यास, पढिक पांडित्य, संस्कृत भाषेतून शास्त्राभ्यास, कर्मकांड यांचे स्तोम वाढले होते त्यामुळे समाज नैतिकदृष्ट्या अधःपतनाच्या वाटेवर होता. सामान्य जनांना नित्यकर्मात उपासना करता यायला हवी आणि त्या उपासना पद्धतीतही सहजता असावी ही बाब भक्तीसंप्रदायाला जाणवली होती. त्यामुळे ज्ञानदेव आणि नामदेवांनी वारकरी संप्रदायाची नव्याने बांधणी केली. भोळ्याभाबड्या लोकांना अध्यात्माच्या वाटेवर आत्मोन्नतीची दिशा दिली. 'अद्वैत तत्त्वज्ञान' आणि 'नामस्मरण' हा उपासनेचा साधा-सोपा मंत्र वारकरी संप्रदायातील संतमेळ्याने अंगिकारला होता. त्याची प्रचिती संतांच्या काव्यरचनेत येते. वारकरी संप्रदायाच्या आचार-विचार आणि अभिव्यक्तीने तेराव्या शतकात महाराष्ट्रात चैतन्य निर्माण केले.

तेराव्या शतकातील धार्मिक, सामाजिक पर्यावरणात वारकरी संप्रदायचे उल्लेखनीय योगदान, वाङ्मयीन महत्त्व आणि काव्यरचनेतील वैविध्य या घटकात अभ्यासणार आहोत.

## २अ.३ यादवकालीन महाराष्ट्रातील सामाजिक पर्यावरण

तेराव्या शतकात देवगिरीत रामदेवराव यादवांची कारकीर्द होती. देवगिरीच्या यादवांचा कालखंड हा महाराष्ट्रातील ऐश्वर्याचा आणि समृद्धीचा कालखंड समजला जातो. दृढप्रहार नामक यादव राजपुत्राने उत्तरेकडून येऊन सेऊन भागात (नाशिक-खानदेश) यादवांचे राज्य स्थापन केले.

**देवगिरीकर यादवराजांची वंशावळ:**

दृढप्रहार - सेऊनचंद्र - भिल्लम – अर्जुन (पूर्वकालीन यादव) मल्लगी

मल्लगी-भिल्लम (इ. स. ११८७-९१: १८ वा पुरुष

↓

जैत्रपाल उर्फ जैतुगी (इ. स. ११९१ - १२१०)

↓

सिंघण (१२१० ते १२४७) - जैत्रपाल

↓

कृष्ण (१२४७ -६०) → रामदेवराव (१२७१-१३०९)

महादेव (१२६० ते ७१) → शंकरदेव (१३०९-१८)

यादव राजे वैदिक संस्कृतीचे आणि कला-विद्या यांबाबत आग्रही होते. वैदिक, महानुभाव, भागवत इ. धर्म-संप्रदाय यादवांच्या कारकिर्दीत असल्याने यादवांची राजवट वाङ्मयदृष्ट्याही समृद्ध मानली जाते. संगीत, वेदान्त, धर्मशास्त्र, व्याकरण, वैद्यक इ. शास्त्रांवर या काळात अनेक ग्रंथनिर्मिती झाली आहे. परंतु संस्कृत न येणाऱ्या अनेक लोकांना या ज्ञानार्जनापासून वंचित राहावे लागले म्हणून संत ज्ञानेश्वारांसारख्या प्रभृतींना लोकभाषेचा अवलंब करावा लागला.

वैदिक धर्मीयांतील ब्राह्मण-क्षत्रियांना अध्यात्मिक तत्त्वज्ञान पेलणारे होते पण सामान्यांच्या आवाक्यात येणारे नव्हते. सामाजिक जीवनही वर्णव्यवस्थेने संकुचित झाले होते. वर्णभेद, दैवते, उपासना यांसारख्या गोष्टींवर अनेक निर्बंध होते. त्यामुळे बहुजन या सर्वांपासून दूर होते. अशावेळी धर्मविचार, अध्यात्मिक तत्त्वज्ञान साध्या सोप्या भाषेत सांगणाऱ्या आणि आचरणास सुलभ असलेल्या वारकरी संप्रदायाकडे सामान्यांचे लक्ष वेधले गेले.

## २अ.४ यादवकालीन महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाची प्रस्थापना

सामाजिक अधिकारांपासून वंचित असलेल्या सामान्य लोकांच्या एकजुटीने वारकरी संप्रदाय आकारास आला होता. संत ज्ञानदेवांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचे आणि भक्तीमार्गाचे पाठबळ तिला होते. काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ आणि आलस्य यांमुळे सामान्यजन खऱ्या आत्मिक सुखापासून वंचित आहेत हे संत ज्ञानदेवांनी जाणले होते. भोळ्या-भाबड्या परंतु अध्यात्मापासून दूर असलेल्या लोकांसाठी तात्त्विक विचारांची बैठक निर्माण केली पाहिजे, अशी खात्री ज्ञानदेवांना पटली. धर्मजागृती आणि सामाजिक, सांस्कृतिक बदलांच्या अपेक्षेने संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाची एकात्मता साधली.

पंढरपूरच्या विठ्ठलाला सर्वस्व मानून कीर्तन, अभंग याद्वारे विठ्ठलप्राप्तीची ओढ वारकरी संप्रदायाने व्यक्त केली. कपाळी टिळा, गळ्यात तुळशीची माळ, मुखाने विठ्ठल नामाचा गजर करत चंद्रभागेच्या वाळवंटी जमून भक्तिरसात तल्लीन होणे ही वारकरी संप्रदायाची एक ओळख होती. त्यामुळेच कदाचित दुर्बल, वंचित समाजघटकांपासून ते कुटुंबातल्या सर्व व्यक्तींपर्यंत वारकरी संप्रदायाचे सभासदत्व स्वीकारले गेले.

## २अ.५ पंढरीच्या भक्तीसंप्रदाचे धार्मिक आणि सामाजिक योगदान

तेराव्या शतकातील सामाजिक जीवन भौतिक बाबतीत जेवढे समृद्ध होते तेवढेच धार्मिक आणि सामाजिक बाबतीत ते अधःपतनाकडे चालले होते. कर्मठता, पाखंडीपण, पढिक पांडित्य यांमुळे वैदिक परंपरेचा ऱ्हास होत होता. वेद ज्ञात असणारे त्याचे अवडंबर करत

munotes.in

होते. भोगासक्त वृत्तीने यज्ञयाग करण्याची प्रथा वाढत होती. यज्ञयाग, जपजाप, व्रतवैकल्ये, उद्यापने यांत बराचसा वेळ जात होता. जुन्या ग्रंथांतूनही चाकोरीबद्ध अर्थ काढले जात होते. नवविचार, मनन-चिंतन यांचा विसर पडत चालला होता. या पार्श्वभूमीवर वारकरी संप्रदायाने भक्तीमार्गाची शिकवण दिली.

वारकरी संप्रदायाची पाळेमुळे तेराव्या शतकातील सामान्यजनांत रुजलेली आहेत. वारकरी संप्रदायाने धार्मिक आणि सामाजिक बदलांच्या बाबतीत नेहमीच उदारतेचे धोरण स्वीकारले. अठरापगड जातींच्या संतांचा सहभाग वारकरी संप्रदायात होता. तत्कालीन चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा प्रभाव भक्तीसंप्रदायातील संतांवर नव्हता. त्यामुळे सामान्य लोकांना प्रत्यक्षात समानतेची शिकवण मिळाली. अध्यात्मिक विचारांची बैठक वारकरी संप्रदायामुळे प्राप्त झाली. कर्मठपणा, संन्यास, व्रतवैकल्ये यांपासून वारकरी संप्रदाय दूर राहिला. याउलट संप्रदायाने भक्तीची ताकद अनेक अभंगांतून पटवून दिली. नामस्मरणाचा मार्ग स्वीकारला. सांसारीकांना सध्या-सोप्या भाषेत परमार्थ सांगितला. समाजाच्या कोणत्याही घटकातून आलेल्या व्यक्तीला आत्मिक उन्नतीची संधी वारकरी संप्रदायाने प्राप्त करून दिली होती. मानवतेचा नवा अध्याय या संप्रदायाने सुरू केला. नीती, श्रद्धा, समता, शांती, अहिंसा, दया या मूल्यांचा पुनरुच्चार केला. 'दुरिताचे तिमिर जावो, जो जे वांछिल तो ते लाहो' हे मानवाच्या हिताचे पसायदान वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्य होते. वारकरी संप्रदायाने धार्मिक आणि सामाजिक बदलाची नवी सुरुवात केली होती.

## २अ.६ पंढरीच्या भक्तीसंप्रदाचे वाङ्मयीन महत्त्व

पंढरीच्या भक्तीसंप्रदायाने समाजाला नवी जीवननिष्ठा शिकवली. वारकरी संप्रदायाने आपल्या वाङ्मयाच्या आधारे समाज जागृती केली. प्रवचन, कीर्तन यासोबतच अभंग, आरती, गवळण, ओवी, पद, विराणी, रूपक इ. वाङ्मय प्रकारांचा वापर आपल्या अभिव्यक्तीसाठी केला. लोकभाषेत परमार्थ प्राप्तीची शिकवण देण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने केले. ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरीच्या' रूपाने भक्तीसंप्रदायाला संजीवनी दिली. नामदेवांच्या कीर्तन-अभंगांनी परमार्थ आणि प्रपंच यांचा समतोल साधला. वारकरी संप्रदायाची परंपरा पुंडलिकांपासून असली तरी ज्ञानदेव-नामदेवांनी या संप्रदायाचे पुनरुज्जीवन केले. ज्ञानदेव-नामदेव यांनी आपल्या काव्यरचनेतून ज्या भक्तीमार्गाचा स्वीकार केला त्याचा प्रभाव भक्तीसंप्रदायातील संतांच्या काव्यरचनेवर होता. संप्रदायातील संतानी अभंग या काव्यप्रकारातून सामान्य माणसाच्या रोजच्या जगण्यातील नानाविध अनुभवांना शब्दरूप दिले. अध्यात्मिक आणि सामाजिक या दोहोंच्या मिलाफातून पंढरीच्या भक्तीसंप्रदायाने वाङ्मयनिर्मिती केली.

## २अ.७ ज्ञानेश्वरांचे वाङ्मय

तेराव्या शतकापासून सुरू झालेला 'मराठीचा अमृताचा वसा' आजही मराठी मनाला आपलासा वाटत आला आहे. 'ज्ञानेश्वर माउली' हा नामघोष वारकऱ्यांच्या घरोघरी निनादत असतो. तत्त्वज्ञानात्मक आणि काव्याने नटलेल्या ज्ञानेश्वरीचे पारायण महाराष्ट्रातल्या घरोघरी आजही मनोभावे केले जाते. ज्ञानदेवांचा जन्म इ. स. १२७५ (श. ११९७) मध्ये झाला आणि इ.स. १२९६ (श. १२१८) मध्ये त्यांनी संजीवन समाधी घेतली. अवघ्या

एकवीस वर्षांच्या आयुष्यात ज्ञानेश्वरांनी केलेले साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्य महत्त्वपूर्ण आहे. संन्यास घेऊन पुन्हा संसारात राहिल्यामुळे ज्ञानेश्वरांच्या आई-वडिलांना प्रयागक्षेत्री जाऊन प्रायश्चित्त घ्यावे लागले. वर्णाश्रम व्यवस्थेच्या परिघाबाहेर तत्कालीन समाजव्यवस्थेने ठेवल्याने कर्मठ समाजनियम, जातीसंस्थेचा चिवटपणा, पढिक पांडित्य, स्त्री-शुद्रादी घटकांची बौद्धिक आणि मानसिक अवहेलना यासारख्या अन्यायकारक पद्धतींनी ज्ञानेश्वरांच्या मनात अतीव करुणा निर्माण होणे साहजिकच होते. स्वतःवरील अन्यायाने क्रोधीत न होता त्यांनी समस्त बहुजन समाजाला विश्वबंधुत्वाचे आणि सहिष्णुतेचे मार्गदर्शन केले. नाथपंथी असलेल्या संत ज्ञानदेवांच्या ठायी अद्वैतनिष्ठा, योगसाधना, हरिहरैक्यभाव, दलितोद्धार, देशीभाषा हा वारसा होता. तेराव्या शतकात परकीय आक्रमणात होरपळून निघणाऱ्या समाजाला धार्मिक आणि सामाजिक बाबतीत संघटित करण्याचा मार्ग ज्ञानदेवांच्या कार्याने आणि वाङ्मयाने निर्माण केला.

### १. ज्ञानेश्वरी:

भगवतगीतेवरील टीकात्मक भाष्य म्हणजे ज्ञानेश्वरांची 'ज्ञानदेवी' होय. भगवद्गीतेवरील सर्व टीकाग्रंथात महत्त्वाची आणि लोकप्रिय टीका म्हणून ज्ञानेश्वरी प्रचलित आहे. भगवतगीतेतील अठरा अध्यायांतील सातशे श्लोकांवर नऊ हजार ओव्यांचे तत्त्वज्ञानपर भाष्य म्हणजे 'देशीकार लेणे' आहे. ज्ञानेश्वरीचा लेखनकाळ ज्ञानेश्वरीत उल्लेखलेला आहे.

शके बाराशतें बरोत्तरे । तै टीका केली ज्ञानेश्वरे ।

सच्चिदानंदबाबा आदरें । लेखकु जाहला ।।

परंतु ही ओवी ज्ञानदेवांची नसून ज्ञानेश्वरीची हस्तलिखित प्रत करणाऱ्या सच्चिदानंदबाबांची असावी असे मत शं. गो. तुळपुळे यांनी नोंदवले आहे. कारण ज्ञानेश्वर स्वतःचा उल्लेख 'ज्ञानदेव' असा करतात, असे शं. गो. तुळपुळे यांचे मत आहे.

भगवतगीतेवरील या टीकात्म भाष्याला भावार्थदीपिका, ज्ञानेश्वरी, ज्ञानदेवी अशी नामरूपे प्राप्त आहेत. परंतु यापैकी एकही नामरूप कवीने दिले नाही. 'केले ज्ञानदेवे गीतें । देशीकार लेणे' असे ज्ञानदेवांनी संबोधित केले आहे. संत ज्ञानेश्वरांनी सांगितलेली ज्ञानेश्वरी असेच कालौघात प्रचलित झाले असावे.

मौलिक तत्त्वज्ञान आणि मनोहारी काव्य या दोहोंचा मिलाफ असलेला टीकात्मक ग्रंथ मराठीचे वैभव आहे. ज्ञानेश्वरीत मूळ गीतेतील आशय काव्यात्मकरित्या निरूपण पद्धतीने सांगितला आहे. काव्य हे ज्ञानेश्वरीचे अभिनव माध्यम आहे. परंतु काव्य प्रतिपादित करण्यासाठी किंवा आखीव रेखीवपणे ग्रंथरचना करावी अशी पढिक पांडित्यांची भूमिका ज्ञानेश्वरीत नाही. बहुजनसमाजाला गीतेतला भावार्थ सहज-सुलभरित्या कळावा अशी ज्ञानेश्वरीची रचना आहे. गणेश स्तवन, शारदा स्तवन, व्यासांची स्तुती, गुरुमहिमा, श्रोत्यांचे अनुनय, श्रीकृष्ण-अर्जुन सख्य, बोलीभाषेचे गौरवगान यासारख्या विषयांतून ज्ञानेश्वरी या अभिनव ग्रंथनिर्मितीची प्रचिती येते.

**२. अमृतानुभव:**

गीतेच्या तत्त्वज्ञानपर भाष्यानंतर स्वतंत्र ग्रंथनिर्मिती म्हणून 'अमृतानुभव' सर्वपरिचित आहे. संत ज्ञानेश्वरांच्या स्वतंत्र प्रतिभेचा आविष्कार 'अमृतानुभव'मध्ये दिसतो. अमृतानुभवचा लेखनकाळ इ. स. १२९२ (श. १२१४) असा मानला जातो. अमृतानुभव या ग्रंथात ज्ञानेश्वरांनी स्वतःच्या अनुभूतीला प्रमाण मानून चिद्विलासाचा सिद्धांत मांडला आहे, म्हणून या ग्रंथाला 'अनुभवामृत' असे म्हणत असावेत. ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान या ग्रंथात व्यक्त झाले आहे. ज्ञानेश्वरीतील रसवत्ता या ग्रंथात तुलनेने कमी आहे. पाच संस्कृत श्लोक आणि आठशे चार ओव्या असलेल्या या ग्रंथात दहा प्रकरणे आहेत. स्वतंत्र तत्त्वज्ञान शुद्ध स्वरूपात अमृतानुभवमधून प्रकट झालेले आहे म्हणून ज्ञानेश्वरांनी हा ग्रंथ केवळ पारमार्थिक जनांसाठी लिहिला आहे, असे म्हटले जाते. अमृतानुभव प्रस्तावनेच्या पहिल्या पाच संस्कृत श्लोकांत आपल्या गुरूचा म्हणजेच संत निवृत्तीनाथांचा महिमा सांगताना अक्षर, अव्यय अशी परब्रह्माची विशेषणे सांगितली आहेत. गुरुमहात्म्य सांगताना, दुसऱ्या प्रकरणात ऐंशी ओव्यांचा विस्तार केला आहे. 'जीवनमुक्त' या अवस्थेचे स्पष्टीकरण नवव्या प्रकरणात असून या अवस्थेचा 'अनुभवामृत' असा उल्लेख आहे. 'सद्गुरूस्तवन', 'सच्चिदानंदपदत्रय' ही प्रकरणे अभ्यासकांनी महत्त्वपूर्ण मानली आहेत. लोककल्याणासाठी आपला उपदेश असल्याचे सांगताना,

म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृतें येणें ।

सणु भोगिजे सणें । विश्वाचेनी ॥

याची जाणीव संत ज्ञानेश्वर पुनःपुन्हा करून देतात.

शुद्ध तत्त्वज्ञान या ग्रंथात दृष्टान्तांच्या आधारे विशद केले असल्याने या ग्रंथाचे महत्त्व विद्वजनांमध्ये विशेष आहे. श्री. प्रल्हादबोवा बडवे यांनी अमृतानुभवाचे संस्कृतात समश्लोकी भाषांतर केले आहे, तर 'नित्यानंदैक्यदीपिका' असे भाष्य शिवकल्याणांनी लिहिले आहे.

**३. चांगदेवपासष्टी:**

प्रासंगिक प्रकरण असे जरी या ग्रंथाचे स्वरूप असले तरी हा ग्रंथ तत्त्वज्ञानात्मक आहे असे सांगता येते. चांगदेवपासष्टी' हे पासष्ट ओव्यांचे अमृतानुभवचे सार आहे. अमृतानुभवमधील तात्त्विक विवेचन या ग्रंथात सूत्रबद्धपणे मांडले आहे. चांगदेवपासष्टीची निर्मिती इ.स. १२९४ (श. १२१६) च्या सुमारास आळंदी येथे झाली असावी. चांगदेवपासष्टी निर्मितीची कथा अशी आहे की, ज्ञानदेवांची कीर्ती ऐकून योगीराज चांगावटेश्वरांनी ज्ञानदेवांना पत्र लिहिले परंतु ज्ञानदेवांना पत्रात नमस्कार लिहावा की आशीर्वाद या संभ्रमात चांगदेवांनी ज्ञानदेवांना कोरे पत्र पाठवले. निवृत्तिनाथांच्या आज्ञेने ज्ञानदेवांनी चांगदेवांच्या पत्राला उत्तर पाठवले. हे पत्ररूपी उत्तर म्हणजेच चांगदेवपासष्टी होय. ज्ञानदेवांनी पत्रातून लिहिलेल्या पासष्ट ओव्यांतून चांगदेवांना पूर्णबोध केला आहे.

चांगदेवा तुझेनि व्याजे । माउलिया श्री निवृत्तिराजे ।

स्वानुभाव रसाळ खाजे । दिधले लोभें ॥

अशा विनयपूर्ण उद्गारांतून संत ज्ञानदेवांनी आपल्या रचनेचे श्रेय संत निवृत्तीनाथ आणि चांगदेव यांना दिले आहे.

ज्ञानेश्वरी असो की अमृतानुभव ज्ञानेश्वरांच्या सर्व रचनेत अद्वैतानुभव आणि भक्तिप्रेम अनुस्यूत आहे; परंतु 'अमृतानुभव' आणि 'चांगदेवपासष्टी' या रचनांत ज्ञानेश्वरीच्या तुलनेत काव्यात्मकता कमी आहे.

**४. स्फुटअभंग रचना**

संत ज्ञानेश्वरांची अभंगरचना भक्तीरसाच्या गोडव्यात चिंब भिजलेली आहे. पंढरीच्या संतमेळ्याशी संबंध आल्यावर आणि पुढे नामदेवांच्या सोबत तीर्थयात्रेच्या काळात संत ज्ञानेश्वरांची अभंगरचना झाली असावी. या अभंगरचनेचे मूळ अभंग-कीर्तनात आहे. ज्ञानदेवांच्या उपलब्ध अभंगरचनेची संख्या साधारणतः ७६५ आहे. यांतील बरेच अभंग सांप्रदायिक विषयावर आहेत. काही अभंगांच्या अखेरीस ज्ञानेश्वर स्वतःसोबत 'बापरखुमादेवीवरू' अशी नाममुद्रा धारण करतात. सामान्यजनांना तत्त्वज्ञान आणि जीवनदृष्टी कळावी यासाठी अभंगरचना केली आहे.

सांसारिक उदाहरणांतून परमार्थ सांगणारे वासुदेव, पाईक, आंधळा यांसंबंधीचे रूपकात्मक अभंग, विरहिणीचे अभंग, बालक्रीडेचे अभंग, हरिपाठाचे अभंग असे ज्ञानेश्वरांच्या अभंगांचे वर्गीकरण करता येते. 'चंदनाची चोळी माझे अंग अंग जाळी' यासारख्या विराण्यांतून परमार्थ आणि प्रपंच यांतील समतोल साधलेला दिसतो. हरिपाठाचे अभंग म्हणजे वारकऱ्यांची नित्यपाठाची संध्या होय. ईश्वरभक्ती, अद्वैतबोध, सदाचरण यांचा परिचय सामान्य जनांना व्हावा यादृष्टीने ज्ञानेश्वरांच्या अभंगांची रचना महत्त्वाची आहे.

रूप पाहता लोचनी। सुख झाले हो साजणी।

तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा॥

बहुतां सुकृतांची जोडी। म्हणुनि विठ्ठली आवडी।

सर्व सुखाचे आगरू। बाप रखुमादेविवरू॥

ज्ञानेश्वरांचा हा अभंग म्हणजे काव्य सौंदर्याचा एक नमुना म्हणावा लागेल. ज्ञानदेवांचे बालक्रीडेचे अभंगही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. पाळणा, टिपरी, हमामा, फुगडी अशा अनेक रूपकांद्वारे भक्तीचे महात्म्य लोकांपुढे मांडले आहे त्यामध्ये कूट रचनेचाही समावेश आहे. अतिशय सध्या, सोप्या, सहज परंतु उत्कट शब्दांत संत ज्ञानेश्वरांच्या अभंगांनी सामान्यजनांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे.

**५. समारोप:**

संत ज्ञानेश्वरांची वाङ्मयीन कामगिरी विविध स्वरूपाची आहे. ज्ञानेश्वरीसारखा परिपूर्ण ग्रंथ, चिद्विलासाचे अनोखे तत्त्वज्ञान सांगणारा अमृतानुभव, हठयोग्याला पाठवलेले अध्यात्मप्रवण पत्र तर सामान्यजनांच्या ओठी असणारी स्फुटअभंगाची रचना मराठी वाङ्मयात अधोरेखित

आहे. 'समुद्राहून सखोल व अर्थभरित असे हे मऱ्हाटे बोल' हा दावा सार्थ आहे. ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वात महत्त्वपूर्ण ठसा उमटवला आहे.

## २अ.८ नामदेव

भागवतधर्माची पताका पंढरपूरपासून पंजाबपर्यंत नेणाऱ्या संत नामदेवांचे व्यक्तिमत्त्व सर्वसामान्य लोकांशी अभंगाच्या माध्यमातून आपुलकी निर्माण करणारे होते. नामदेवांच्या नावावर अडीच हजार अभंग उपलब्ध आहेत. संत नामदेवांमुळे 'हरिनामाचा सुकाळ' झाला असे म्हटले जाते. नामदेवांचे व्यक्तिमत्त्व सामान्यलोकांना आपलेसे वाटावे असे होते. लौकिक जीवनातील सुख-दुःख, व्यावहारिक संघर्ष यांचा समावेश असल्याने नामदेवांचा अध्यात्मिक मार्ग बहुजन समाजाला आपलासा वाटायचा.

संत नामदेव हे संत ज्ञानेश्वरांचे समकालीन होते (इ. स. १२७० ते १३५०) नामदेव म्हणजे दामाशेटी शिंप्याचे चिरंजीव अगदी बालपणापासून पंढरीच्या विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. नामदेव जेव्हा ज्ञानदेवांच्या सान्निध्यात आले तेव्हा त्यांच्या ठायी असणाऱ्या भक्तीला तत्त्वज्ञानाचे वलय प्राप्त झाले. त्यामुळे आत्मोद्धाराची प्रेरणा निर्माण झाली. विसोबा खेचर यांच्याकडून गुरूपदेश मिळाल्यावर नामदेवांच्या सगुणोपासनेला दृष्टी प्राप्त झाली. ज्ञानदेवांच्या समवेत केलेल्या तीर्थयात्रेत आलेले अनुभव नामदेवांनी लिहून ठेवले आहेत. त्यात ज्ञानदेवांच्या समाधीचे वर्णन करणारे अभंगही आहेत. अद्वैतनिष्ठ भक्तिमार्गाच्या प्रसाराची धुरा नामदेव समर्थपणे सांभाळतील अशी खात्री जणू ज्ञानदेवांना पटली होती. ज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर जवळपास चोपन्न वर्षे नामदेव हयात होते. या काळात भागवत धर्म प्रसाराचे कार्य त्यांनी निष्ठेने केले.

### १. नामदेवांचे कर्तृत्व:

संत नामदेव हे वारकरी संप्रदायाचे आद्य आणि प्रभावी प्रचारक म्हणून ओळखले जातात. परंतु ही ओळख एवढीच सीमित नाही. पंढरपूरच्या विठ्ठलाचे महात्म्य आणि ज्ञानदेवादी संतमंडळींच्या वैभवाला नामदेवांनी विस्तारित रूप दिले. संत नामदेवांच्या अभंगवाणीने सामान्यलोकांना अध्यात्माचा नवा मार्ग प्राप्त झाला. नामदेवांची अभंगरचना खेड्यापाड्यात राहणाऱ्या प्रापंचिक माणसाच्या आत्माविष्काराचे माध्यम बनली. नामदेवांनी कीर्तनाच्या बळावर विठ्ठलनामाचा महिमा आणि वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान स्वगृहापासून थेट पंजाबपर्यंत पोहोचविले. नामस्मरणाचा सहज-सोपा मार्ग त्यांनी सांगितला. वारकरी संप्रदायाच्या प्रचारासाठी कीर्तनाचे तंत्र त्यांनी स्वीकारल्यामुळे कीर्तनसंप्रदायाचे संस्थापक म्हणून संत नामदेवांचा उल्लेख अपरिहार्य आहे तसेच अभंगवाणीचे प्रवर्तक म्हणूनही नामदेवांची नाममुद्रा उमटली आहे.

भक्तीची साधना करत असताना आत्माविष्कार साधावा या हेतूने संत नामदेवांनी अभंगरचना करण्यास सुरुवात केली. 'हरिकीर्तना'ची आणि 'नामसंकीर्तना'ची परंपरा त्यांनी रूढ केली. 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जागी ।' असा वसा त्यांनी सुरू ठेवला. सामाजिक, राजकीय स्थित्यंतरे घडत असताना जराही विचलित न होता ज्ञानदेवांच्या शिकवणुकीत जराही खंड पडू दिला नाही. कीर्तनाच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाची तत्त्वे नामदेव गावोगाव पोहचवत राहिले. महाराष्ट्रासोबतच उत्तरेकडे पंजाबपर्यंत

महाराष्ट्रातल्या भक्तीमार्गाची ओळख करून दिली. मीराबाई, कबीर यांनीही नामदेवांचा आदरपूर्वक उल्लेख केल्याचे आढळते. 'नामदेव की मुखबानी' म्हणून संत नामदेवांची सुमारे शंभरावर पदे शिखांच्या 'नानकसाहेब' ग्रंथात आहेत.

भागवतधर्माचा प्रसार करत असताना पंढरपूर मुक्कामी संत नामदेवांचे देहावसान झाले. पंढरपूरच्या विठ्ठलमंदिराच्या महाद्वाराशी असलेल्या नामदेवांच्या समाधीला 'नामदेवांची पायरी' असे संबोधले जाते. आपल्या कुटुंबाला विठ्ठलभक्तीची ओढ लावणाऱ्या नामदेवांच्या भक्तीप्रेमाचा प्रभाव परिसा भागवत आणि जनाबाई यांच्यावरही पडला होता.

**२. आत्मचरित्रपर अभंग:**

संत नामदेवांनी आत्मचरित्रपर असे ४९१ अभंग लिहिले आहेत. पारमार्थिक आणि सांसारिक जीवनातील दोलायमान अवस्थेचे चित्रण या अभंगात आढळते. एका अर्थी हे नामदेवांचे आत्मचरित्र म्हणता येते. या अभंगांमध्ये नामदेवांच्या आयुष्यातील चार महत्त्वाच्या घटनांचे निवेदन आहे. तसेच नामदेवांच्या आंतरिक अध्यात्माचे दर्शन या अभंगांतून घडते. आई, वडील, पत्नी इ. कुटुंबातील व्यक्तींनी नामदेवांच्या भक्तीला केलेला विरोध, मुक्ताईने केलेले अहंकारहरण, गुरूकडे झालेली रवानगी, आणि अखेरीस शतकोटी अभंग निर्मितीची प्रतिज्ञा असे मुख्य प्रसंग नामदेवांनी अतिशय उत्कटपणे या अभंगांतून व्यक्त केले आहेत. सहज निवेदन, नाट्यमयता यांमुळे अभंग कलात्मक झाले आहेत. मराठी वाङ्मयात या अभंगांच्या रूपातून प्रथमच आत्मचित्रात्मक लेखन समोर आले आहे. पहिल्या आत्मचरित्रकाराचा मान निःसंकोचपणे नामदेवांना द्यावा लागतो.

भागवत धर्माचे प्रसारक म्हणून नामदेवांनी ईश्वरभक्ती आणि नाममहात्म्य विशद करण्यासाठी आख्यानकाव्याचा अवलंब केला. ईश्वराची निस्सीम सेवा करणाऱ्या संतांचे चरित्रही नामदेवांनी लिहिले आहे. ती संपूर्ण चरित्रे जरी नसली तरी गोराकुंभार, चोखामेळा, जनाबाई यांच्या जीवनातील निवडक एखाद दुसऱ्या प्रसंगांवर नामदेवांनी आख्याने लिहिली आहेत. पौराणिक धाटणीमुळे या रचना आकर्षक झाल्या आहेत.

**३. ज्ञानेश्वरचरित्र:**

नामदेवांनी ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडे यांचे चरित्र 'आदि', 'तीर्थावळी' आणि 'समाधी' या तीन प्रकरणात ओवीबद्ध केले आहे. ज्ञानेश्वरांचे पहिले अधिकृत चरित्र लिहिण्याचा मान नामदेवांकडे जातो. पौराणिक स्वरूपाचे हे चरित्र असले तरी प्रत्यक्ष अवलोकनातून साकार झाले असल्याने या चरित्राचे ऐतिहासिक महत्त्व विशेष आहे. नामदेवांचा ज्ञानदेवांप्रती भक्तीभाव असल्याने यातील निवेदनात अतिशय गोडवा आहे. नामदेवांनी हे चरित्र काव्यातून लिहिलेले असल्याने काव्याच्या माध्यमातून आत्मचरित्र लिहिण्याचा पहिला मानही नामदेवांचा आहे. यातील अभंगसंख्या सुमारे साडेतीनशे आहे. 'तीर्थावळी' आणि 'समाधी' ही प्रकरणे आरंभी लिहिली असून 'आदि' हे प्रकरण नंतर जोडले असावे. 'तीर्थावळी' आणि 'समाधी' या प्रकरणांचे विशेष असे की, ज्ञानदेवांचे चरित्र सांगता सांगता नामदेवांचे आत्मचरित्रही समोर येते. ज्ञानदेवांशी असणारा जिव्हाळा यातून प्रकट होतो. संन्याशाची मुले म्हणून ज्ञानदेवांच्या भावंडांच्या वाट्याला आलेल्या अवहेलनेचे चित्रण 'आदि' या प्रकरणात व्यक्त होते.

'तीर्थावळी' या प्रकरणात नामदेवांनी ज्ञानदेवांसोबत केलेल्या तीर्थयात्रेचा वृत्तांत सांगितला आहे. विठ्ठलापासून दूर असलेल्या नामदेवांच्या मनस्थितीचे वर्णन अतिशय मार्मिक आहे. 'समाधी' या प्रकरणात करुण रसाचा प्रत्यय येतो. ज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर नामदेवांसोबत ज्ञानदेवांची भावंडे आणि उपस्थित सर्वांची काय अवस्था झाली असेल याचे हृदयद्रावक चित्रण या प्रकरणात आहे. 'बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट । ओघ बारा वाट मुरडताती ।' यातून निवृत्तिनाथांच्या भावावस्थेचे दर्शन होते.

**४. बाळक्रीडेचे अभंग:**

या प्रकारच्या अभंग रचनेचा विषय नामदेवांच्या वृत्तीला साजेसा होता. कृष्णाच्या बालपणापासून ते यौवनापर्यंत घडलेले विविध प्रसंग नामदेवांनी या अभंगात साकार केले आहेत. नाट्यपूर्णता हा महत्त्वाचा विशेष सांगता येतो. यासोबतच रसपूर्ण शैली, चित्रमयता, अद्भुतरम्यता या गुणांचा परिपोष या अभंगात आहे. 'महाबळभटविटंबना' आणि 'दाढीवेणीबंधनकथा' यांसारख्या प्रसंगांमध्ये अद्भुतरम्यतेसोबतच बालसुलभ विनोदही आहे. श्रीकृष्ण मथुरेला गेल्यानंतर गोपींसहित सगळ्या गोकुळाला वेढणारी व्याकुळता, विरह यांचे अत्यंत मनस्पर्शी चित्रण नामदेवांनी केले आहे. बाळक्रीडेच्या अभंगांतून मुख्यत्वे नामदेवांच्या मनातील निष्पाप, बालरूपातील नानाविध लीला, सहजता यांचे मनोज्ञ दर्शन घडते.

**५. आरती:**

नामदेवांनी लिहिलेली आरती आणि भूपाळी प्रसिद्ध आहे. 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ।' नामदेवांनी लिहिलेल्या ज्ञानदेवांच्या आरतीतून त्यांचे चरित्रच उभे राहते. नामदेवांनी लिहिलेल्या भूपाळीही प्रसिद्ध आहेत.

यासोबतच 'दशावतारवर्णन', 'हरिश्चंद्राख्यान', 'श्रियाळाख्यान', 'ध्रुवाख्यान' अशी काही आख्यानेही नामदेवांच्या नावावर आहेत. आख्यानासाठी नामदेवांनी अभंगाऐवजी ओवीचा वापर केला आहे.

**६. समारोप:**

तेराव्या शतकात निद्रिस्त समाजाला आपल्या भक्तीमंत्राने जागे करण्याचे काम संत नामदेवांनी केले. भागवतधर्म प्रसाराचे कार्य करताना शैव-वैष्णव एकच आहेत अशी शिकवण त्यांनी दिली. 'हरिहरा भेद नाही । करू नये वाद ।' असे सांगून त्यांनी या वादाला शांत केले. सामान्य लोकांच्या चिंता, विवंचना यांना भक्तीचा सागर नामदेवांनी दाखवला होता. त्यामुळे नामदेवांचे अध्यात्म परमार्थ आणि सांसारिक जीवन यांचा समन्वय साधत होते. सामान्यजनांच्या मनाला आपलेसे करणाऱ्या सुबोध भाषेत त्यांनी भागवतधर्माच्या तत्त्वांचा प्रसार केला. पंढरपूरच्या विठ्ठलाचा नाम कीर्तनाचा झेंडा महाराष्ट्राबाहेर रोवला.

प्रत्यक्ष ईश्वरापेक्षा नामदेवांना ईश्वराची अमर्याद भक्ती प्रिय होती. हेच त्यांच्या काव्याचे महत्त्वाचे लक्षण होते. त्यांच्या या ईश्वराच्या ओढीमुळेच मराठीतील पहिल्या भावकवितेचा जन्म झाला असे म्हणता येते. नामदेवांनी अभंग रचनेचा स्वीकार प्रामुख्याने केला. हे अभंग सामन्यांच्या बोलीतील असल्याने आजही लोकप्रिय आहेत. अठरापगड जातीतल्या संताना

यातूनच अभंग रचनेची प्रेरणा मिळाली. भागवतधर्म प्रसारासाठी कीर्तन हा रचनाप्रकार नामदेवांनी मुख्यत्वे वापरला.

मराठीतील पहिले भावकवी, पद्य चरित्रकार, आत्मचरित्रकार, आख्यानकवी, भागवतधर्माचे प्रचारक, कीर्तनपरंपरेचे प्रवर्तक नामदेवांचे व्यक्तिमत्त्व असे बहुआयामी असल्याचे दिसते.


## २अ.९ संतमेळ्याची अभंगवाणी

तेराव्या शतकाच्या अखेरीस ज्ञानदेव आणि नामदेवांच्या काव्यनिर्मितीने महाराष्ट्रातील सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाचा आरंभ झाला. सामाजिक विषमता, कर्मकांड, वर्णभेद याचा विळखा सामान्य माणसाभोवती होता. विस्कटलेली समाजघडी सुरळीत करण्यासाठी तत्कालीन समाजाला मानवतेची शिकवण देणे आवश्यक होते. ज्ञानदेवांनी गीताभाष्य करून निष्काम कर्मयोग शिकवला तर प्रपंच करून परमार्थ साधता येतो याची शिकवण नामदेवांकडून मिळाली. नामदेवांचा भक्तिमार्गाने प्रभावित होऊन भक्तीसंप्रदायातील संतानी अभंगरचना केली. चंद्रभागेच्या काठावर संतमळा बहरून आला. या सर्वांनी आपल्या अध्यात्मिक अनुभूतीचा उच्चार अभंग रचनेतून केला. चंद्रभागेच्या काठावर हरिनामाचा गजर दुमदुमू लागला. ज्ञानदेवांनी पुनरुज्जीवित केलेल्या वारकरी संप्रदायाची धुरा या संतमेळ्याने मोठ्या भक्तिभावाने पुढे नेली. ज्ञानदेव या संतमेळ्याचे गुरू होते. अठरापगड जातींचे संत या अध्यात्मिक प्रवासात जोडले गेल्याने महाराष्ट्रात नव्या अध्यात्मिक लोकशाहीला सुरुवात झाली. ल. रा. पांगारकर यांचे 'संतमेळा' हे संबोधन अगदी समर्पक वाटते. कारण या संप्रदायात स्त्री-पुरुष, ज्ञानी-साधेभोळे होते त्याचप्रमाणे जातिकुलादिकांच्या अभिमानातून मुक्त झालेले लोकही गुण्या-गोविंदाने सहभागी झाले होते.

गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, विसोबा खेचर, चोखा मेळा, जनाबाई, मुक्ताबाई इ. संतांनी आपल्या अभंग रचनेतून आत्म तृप्त अनुभूतीचा आविष्कार साधला. संतमेळ्याच्या अभंग रचनेत सामाजिक दर्जानुसार वेगळेपण होतेच पण त्यासोबतच संतांच्या अध्यात्मिक योग्यातेनुरूप वैविध्यही होते.

ज्ञानेश्वर-नामदेवकालीन संतमेळ्याच्या वाङ्मयीन योगदानाचा परिचय थोडक्यात बघूया.

### २अ.९.१ ज्ञानेश्वरपंचक:




munotes.in

**१) निवृत्तिनाथ (इ. स. १२६८ - १२९७):**

नाथपंथी असणारे संत निवृतिनाथ हे ज्ञानदेवांचे वडीलबंधू, अध्यात्मिक गुरू म्हणून सर्वपरिचित आहेत. ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभवच्या रचनेचे प्रेरणास्थान निवृत्तिनाथ होते. निवृत्तिनाथ स्वतःचा परिचय करून देताना सांगतात,

'नाही जाति कुळवर्ण अधिकार । क्षत्री वैश्य शुद्र द्विज नव्हे ॥

ते आम्ही अविनाश अव्यक्त जुनाट । निजबोधे इष्ट स्वरूप माझे ॥' (नामदेवकृत आदी)

संत मेळ्यात निवृत्तिनाथांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते.

**२) सोपानदेव (इ. स. १२७४ - १२९६):**

सोपानदेव म्हणजे ज्ञानेश्वरांचे धाकटे बंधू आणि विसोबा खेचरांचे गुरू होते. अद्वैतबोधात ते मुरलेले होते. 'विठ्ठल ब्रह्मांडी एक आहे' ही त्यांची धारणा होती. गोरोबा काकांच्या थापटण्याच्या परीक्षेत ते उतरले होते. सोपानदेवांची वाणी परखड होती. वैराग्याचा उपदेश त्यांच्या अभंगात असला तरी नामभक्तीचा पुकाराही आहे. निवृत्तिनाथ आणि सोपानदेव यांच्या नावावर 'निवृत्तिदेवी', 'सोपनदेवी', 'हरिपाठ', 'पंचीकरण' इ. रचना असल्याचे सांगितले जाते परंतु आज त्या उपलब्ध नाहीत.

**३) मुक्ताबाई (इ. स. १२७७ - १२९७):**

संत मुक्ताबाई सर्व भावंडात लहान होत्या. संतमंडळीत मुक्ताबाईचे अध्यात्मिक योगदान महत्त्वपूर्ण आहे. मुक्ताबाईंनी ज्ञानेश्वरांना कार्यप्रवृत्त केले.'ताटीच्या अभंगा'त ज्ञानेश्वरांना 'तुम्ही तरोन विश्व तारा' हा मुक्ताबाईचा उपदेश अधिकारवाणीचा असला तरी कौतुकास्पद आहे. ज्ञानेश्वरांनी अलिप्तता स्वीकारल्यावर धाकट्या बहिणीने त्यांचा रुसवा काढून, समजूत घालणे ही घटनाच नाट्यमय आहे. यात लहानग्या मुक्ताबाईची प्रगल्भता दिसून येते. संत निवृत्तीनाथांकडून मुक्ताबाईला ज्ञानाधिकार मिळाला होता. नामदेवांचा अहंकार त्यांनी दूर केला होता. 'अखंड जयाला देवाचा सेजार । कां रे अहंकार नाहीं गेला । ।' असा स्पष्टवक्तेपणा त्यांच्या वाणीत होता. चांगदेवासारख्या हट योग्याच्या त्या गुरू झाल्या होत्या.

'मुंगी उडाली आकाशी । तिने गिळिले सूर्याशी ।

माशी व्याली घार झाली । देखोनि मुक्ताई हांसली ॥'

अशा प्रकारची कूट रचनाही त्यांच्या नावावर आढळते. अद्वैत आणि सगुणभक्ती यांमधला उत्कटभाव मुक्ताबाईंच्या रचनेत आहे.


**४) चांगदेव (समाधीकाल इ. स. १३२५):**

चांगावटेश्वर हे महान योगी म्हणून प्रसिद्ध होते. ज्ञानदेवांची कीर्ती ऐकल्यावर अहंकारामुळे त्यांनी ज्ञानदेवांना कोरे पत्र पाठवले. ज्ञानदेवांनी पाठवलेल्या उत्तरातून चांगदेवपासष्टीची निर्मिती झाली. त्या उत्तरातून चांगदेवांचे गर्वहरण झाले. ज्ञानदेवांना ते शरण गेले. मुक्ताबाईंकडून अद्वैतानुभवाचा बोध झाला. 'तत्त्वसार' हा योगरहस्य सांगणारा ग्रंथ

चांगदेवांनी लिहिला आहे. 'नाथगुरुपरंपरा' नावाचा आणखी एक ग्रंथ आणि काही अभंग त्यांच्या नावावर आहेत. चांगदेवांच्या अभंगात गुरुभक्तीचा महिमा आहे.

ज्ञानदेवांचा लेखकु असलेल्या **'सच्चिदानंद बाबां'** च्या नावावरही चार-दोन अभंग रचना आहेत.

**नामयाचा संतमेळा**,




### २अ.९.२ नामयाचा संतमेळा:

संसारात राहूनही परमार्थ साधता येतो हे नामदेवांनी सांगितले. हाच आदर्श समोर ठेवून वारकरी संप्रदायातील संतानी अध्यात्मिक विकास आणि विठ्ठलभक्तीचे महात्म्य आपल्या अभंग रचनेतून स्पष्ट केले. चंद्रभागेच्या काठावर या संतमेळ्याने हरिनामाचा जयघोष केला. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला नवे वळण दिले.

### १) गोरा कुंभार (इ. स. १२६७ - १३०९):

ज्ञानदेव-नामदेवांना समकालीन असणाऱ्या संतपरंपरेत अध्यात्मिक अधिकाराने मोठे असणारे संत गोरा कुंभार 'गोरोबाकाका' म्हणून  सुपरिचित आहेत. 'प्रेम अंगी सदा वाचे भगवंत। प्रेमळ तो भक्त कुंभार गोरा। असे नामदेवांनी गोरा कुंभार यांच्याबद्दल म्हटले आहे. गोरोबा कुंभार मडकी घडवत असताना त्यांचे नामस्मरण सुरू असे, अभंगरचना करत असत. त्यांचे वीस-एकवीस अभंग उपलब्ध आहेत. कर्मातच ईश्वर शोधावा हा गोरोबाकाकांचा विचार ज्ञानदेव-नामदेवांच्या वारकरी संप्रदायाच्या विचारांचा परिपाक आहे. जीवनमुक्तीचा आनंद सांगता येत नाही, 'मुकिया साखर चाखाया दिली। बोलतां हे बोलीं बोलवेना॥' असे वर्णन करतात. नामाचा महिमा सांगतात की, 'म्हणे गोरा कुंभार विठ्ठल मंत्र सोपा। एक वेळा बापा उच्चारी रे॥' गोरा कुंभार यांच्या अभंगात रसवत्ता दिसत नसली तरी सात्त्विक ज्ञानानुभव आहे.

### २) सावता माळी:

संत सावता माळी यांनी हरिनामाच्या स्मरणात स्वतःला झोकून दिले होते. त्यांनी आपल्या व्यवसायालाच हरिनाम बनवले होते. सावता माळी यांच्या अभंगात प्रेमाचा ओलावा अधिक आहे. नामदेवांनीसुद्धा सावता माळी यांचे वर्णन करताना म्हटले आहे, 'सावता सागर प्रेमाचा

munotes.in

आगर'. सावता माळी यांनी आपल्या व्यवसायात विठ्ठलाचे रूप पाहिले. 'आमुची माळ्याची जात । शेत लावू बागाईत । आम्हा हाती मोट नाडा । पाणी जाते फुलझाडा ।' असे ते सांगतात. आपला व्यवसाय विठ्ठलमय असल्याचा आनंदही त्यांच्या अभंगात आहे, 'कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।' प्रेमळ वाणीतून उत्कट भावनावेग त्यांच्या अभंगांतून व्यक्त होतो.

**३) विसोबा खेचर (समाधी : इ. स. १३०९):**

नामदेवांचे गुरू म्हणजे संत विसोबा खेचर. त्यांना ज्ञानेश्वरांकडून अद्वैतबोध आणि सोपानदेवांकडून योगदीक्षा मिळाली होती. नामदेवांना उपदेश करताना ते म्हणतात, 'नाम्या तू भक्त भला । मज नाहीं कळला । देव तुझा ॥' - जेथे नाही देव । तेथे ठेवो पाव । देवेवीण ठाव । हे बोलणेचि वाव ॥' विसोबांच्या नावावर काही कूट रचनाही आहेत. विसोबा खेचर यांनी आपल्या अभंग रचनेत व्यापारी पेशाची नंदभाषा आणि सराफी व्यवहारातील सांकेतिक आकड्यांचा उपयोग केला आहे. 'मुळू (५) वदनाचा । आंगळू (१०) हाताचा । उधाणू (३) नेत्राचा । स्वामी माझा ॥' असे आदिनाथ शिवाचे वर्णन त्यांनी केले आहे.

**४) नरहरी सोनार:**

आरंभी शिवभक्त असणारे संत नरहरी सोनार ज्ञानदेवांच्या शिकवणीमुळे विष्णुदास झाले. 'शिव आणि विष्णु एकचि प्रतिमा' याचा स्वीकार त्यांनी केला. सराफाच्या व्यवसायालाच त्यांनी विठ्ठलभक्तीत रुपांतरीत केले होते. पुढील अभंगातून याची प्रचिती येते -

देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ।

देह बागेसरी जाणे । अंतरात्मा जाण सोने ।

'नाम फुकाचे फुकाचे । देवा पंढरिरायाचे ।' हा नाममहात्म्य सांगणारा अभंग आजही मुखोद्गत आहे. त्यांच्या अभंगातून मधूनमधून अद्वैतसिद्धांत व्यक्त होतो. नरहरी सोनार यांनी आपल्या सराफाच्या व्यवसायातील शब्दांचा उपयोग अभंग रचनेत केला आहे. 'सकलसंतगाथा'त त्यांच्या नावावर चौतीस अभंग आढळतात.

**५) चोखामेळा (अंतकाळ इ. स. १३३८):**

संत चोखामेळा यांचा जन्मकाळ निश्चित माहित नसला तरी त्यांच्या रचनेत नामदेवांचा आणि ज्ञानदेवादी भावंडांचा उल्लेख बघता चोखामेळा हे नामदेवांचे समकालीन होते असे सांगता येते. चोखोबांच्या घरात आजी-आजोबांपासून विठ्ठलभक्ती होती. अनेक तीर्थक्षेत्र फिरून पंढरपूरला आल्यावर त्यांना मनःशांती लाभली.

'बहुत हिंडलो । देशदेशांतर ।

परि मन नाहीं स्थिर । झाले कोठे ।।

चोख म्हणे पाहतां । पंढरी भूवैकुंठ ।

मनाचे हे कष्ट । दूर झाले ॥'

वारकरी संप्रदायात समानतेची शिकवण असल्याने अस्पृश्यतेची बोच कमी झाली. चोखोबाला नामदेवांकडून नामभक्तीचा मार्ग माहीत झाल्याने त्यांना आणि कुटुंबाला आत्मोन्नतीची नवी दिशा प्राप्त झाली. याचा प्रत्यंतर चोखोबांच्या अभंगात येतो, 'हीन याती माझी देवा । कैसे घडे तुझी सेवा ।' तत्कालीन सामाजिक परिस्थिती देखील त्यांच्या अभंगांतून समोर येते, 'मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटू कवण्या रिती ।' विठ्ठलाप्रती उत्कट प्रीती त्यांच्या ठायी असल्याने विठ्ठलाची ते आळवणी करतात, 'धांव घाली विठू आतां । चालू नको मंद ।' आणि विठ्ठलही चोखोबांच्या हाकेला जणू धावून जातो. चोखोबांची श्रद्धा जशी उत्कट आहे तसाच अद्वैताचा बोधही व्यक्त होऊ लागतो. भेदाभेदापलीकडची द्वंद्वातीत अवस्था चोखोबांच्या अभंगात दिसते. 'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रांगा ।' असे धारदार शब्दातही चोखोबा व्यक्त होतात तर 'जोहार मायबाप जोहार' असे रूपकात्मक अभंगही प्रसिद्ध आहेत. चोखोबांच्या नावावर 'विवेकदर्पण' नावाचे एक आध्यात्मिक प्रकरण आहे. 'सकलसंतगाथा'त त्यांच्या नावावर ३४९ अभंगांची नोंद आहे.

**चोखामेळा यांच्या परिवाराची अभंग रचना:**

**१) सोयराबाई:**

चोखामेळा यांच्या पत्नी संत सोयराबाईही विठ्ठलभक्तीत लीन झाल्या होत्या. सोयराबाई यांच्या नावावर बासष्ट अभंग उपलब्ध आहेत. अस्पृश्य म्हणून आलेले कटू अनुभव त्यांनी अभंगांतून मांडले आहेत.

**२) बंका महार आणि निर्मळा:**

चोखोबांचे मेहुणे आणि सोयराबाईचे बंधू म्हणून बंका महार परिचित आहेत. बंका महार चोखोबांचे शिष्य होते. चोखोबांच्या धाकट्या बहिणीशी म्हणजे निर्मळाशी त्यांचा विवाह झाला होता. निर्मळानेही चोखोबांचे शिष्यत्व स्वीकारले होते. बंका महार यांच्या नावावर चाळीस अभंग तर निर्मळा यांच्या नावावर चोवीस अभंग आढळतात. (सकलसंतगाथा)

चोखामेळा यांचा मुलगा कर्ममेळा (इसवी सनाचे चौदावे शतक) यांच्या अभंगातही चोखोबांचेच पडसाद ऐकू येतात.

**६) सेना महाराज:**

संत सेना महाराजांनी सामाजिक नीतीविषयक अभंग लिहून तत्कालीन साधूसंतांच्या पाखंडावर टीका केली आहे. 'आम्ही वारीक वारीक । करू हजामत बारीक ।' अशा शब्दांत त्यांनी आपल्या  व्यवसायात विठ्ठलाची भक्ती दाखवली आहे. नाममहात्म्याविषयी फारच स्पष्ट सांगतात, 'मुखी नाम नाही । त्याची संगती नको पाही ।' किंवा 'घेता नाम विठोबाचे । पर्वत जळती पापांचे ।'असे प्रसिद्ध अभंग सेना महाराजांच्या नावावर आहेत. त्यांनी गौळणीही लिहिल्या आहेत. या गौळणींतील राधा-कृष्ण, गोपी-यशोदा यांचे संवाद लक्षवेधी आहेत तर राधाकृष्णाच्या प्रेमाचे मोहक रूप दाखवले आहे.

**७) परिसा भागवत:**

आरंभी नामदेवांची हेटाळणी करणारे परिसा भागवत पुढे नामदेवांचे शिष्य झाले. नामदेवांच्या प्रेमभक्तीपुढे परिसा भागवतांचे गर्वहरण झाले. 'दुधावरील गाय ते मी वानू काय। तैसे गाणे गाय नामदेव।' अशा शब्दात नामदेवांची स्तुती केली आहे.

**८) जनाबाई:**

'संतवाटिकेतील जाईची वेल' असा ज्यांचा उल्लेख केला जातो त्या संत जनाबाईंच्या अभंगवाणीत संत नामदेवांच्या अभंगवाणीची वैशिष्ट्ये पुरेपूर दिसतात. नामदेवांच्या घरात मोलकरणीचे काम करणारी आई-बापाविना पोरकी झालेली जनाबाई एक सामान्य स्त्री परंतु तिच्या विठ्ठलभक्तीने वारकरी संतमेळ्यात अढळ स्थान प्राप्त केले आहे. जनाबाईंच्या अभंगरचनेवर ज्ञानदेव आणि नामदेव या दोघांचा प्रभाव आहे. त्यांच्या अभंगांना अद्वैताची खोली तर भक्तीचे माधुर्य आहे.

विठ्ठल भक्ताचा भुकेला आहे. भक्तासाठी तो नेहमी धावून जातो. विठ्ठल कसलाच भेद मानत नाही अशी त्यांची विठ्ठलाप्रती श्रद्धा आहे. परमेश्वर प्राप्तीची ओढ त्यांच्या अभंगांमध्ये आहे. भवसागर पार करण्यासाठी नामभक्तीचा मार्ग जनाबाई सांगतात,

नाम फुकट चोखट। नाम घेता न ये वीट।

जड शिळा ज्या सागरी। आत्मारामें नामे तारी।

'विठू माझा लेकुरवाळा। संगे लेकुरांचा मेळा।' या अभंगात भक्तांसमवेत रंगलेल्या विठोबाचे अतिशय वत्सल रूप जनाबाई रेखाटतात. कधीकधी विठ्ठलाला चिडवताना, 'रागा येउनी काय करिसी। तुझे बळ आम्हापाशी' असे ही म्हणतात. तर कधी रागवताना त्याला खडे बोलही सुनावतात,

ऐसा येळकोट केला। जनी म्हणे विठो मेला।।

अरे विठ्या, अरे विठ्या। मूळ मायेच्या कारट्या॥

तुझें गेले मढें। तुला पाहून काळ रडे॥

यातील त्वेषाची भावनाही जनाबाईंचे विठ्ठलावरील प्रेम व्यक्त करते.

जनाबाईंच्या नावावर ३५० च्या वर अभंग आढळतात. 'कृष्णजन्म', 'बालक्रीडा', 'काला', 'नामदेवचरित्र', 'हरीश्चंद्राख्यान' इ. आख्यानपर रचनांसोबत पाळणा, काकडआरती,पदे अशा रचनाही आहेत. त्यांच्या अभंगात पुराणाचे संदर्भ बरेच आहेत. आत्यंतिक भक्तीभाव हे जनाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे त्यांच्या वाणीतला गोडवा आपसूकच विठ्ठलभक्तीच्या अभंगात अवतरला आहे. जनाबाई या मुळातच कवयित्री आहेत असे त्यांच्या अभंगराचनांवरून सांगता येते. 'पक्षी जाय दिगंतरा। बाळकासी आणे चारा। घार हिंडते आकाशीं। झांप घाली पिलांपाशी माता गुंतली कामासी। चित्त तिचे बाळापाशीं॥ तैसी आम्हासी विठ्ठल माये। जनी वेळोवेळा पाहे॥ यांसारख्या नित्य जीवनातील दृष्टांतांतून

जनाबाई आपल्या भावना समर्पकपणे व्यक्त करतात. संत जनाबाईची अभंगरचना काव्यदृष्ट्या श्रेष्ठ दर्जाची आहे.

जोगा परमानंद, जगन्मित्र यासोबतच संत नामदेवांच्या कुटुंबातील दामाशेटी, गोणाई, राजाई, विठा यांचीही रचना भक्तीभाव सांगणारी आहे.

## २अ.१० समारोप

नामदेवांच्या संतमेळ्यातील प्रमुख संतांच्या अभंगवाणीत अशी वैविध्यपूर्णता आहे. पंढरीमहात्म्य, बालक्रीडा, नामसंकीर्तन, विठ्ठलभक्ती हे जरी सारखेच दिसले तरी या संतमेळ्याने तत्कालीन समाजाला परमार्थपूर्ण भक्तीकडे वळवले. मराठी कवितेला या रचनांनी नवे वळण दिले. आपल्या पद्यरचनेतून या संतानी भूतदया, समानता, जीवननिष्ठा, आत्मशुद्धी अशी मूलतत्त्वे सांगितली. कर्मकांडाला विरोध करून सहज सोपा भक्तीचा मार्ग दाखवला. सामान्य माणसाला सामाजिक, सांस्कृतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. समाजातल्या प्रत्येक घटकाला भक्तीरसात सहभागी करून घेतले. संत चळवळीने सामान्य जनांना धार्मिक आणि अध्यात्मिक जीवनात सनदशीरपणे लढण्याची ऊर्जा दिली.

## २अ.११ प्रश्नसंच

**आपली प्रगती तपासा.**

१) तेराव्या शतकातील भक्तीसंप्रदायाचे सामाजिक योगदान सविस्तर लिहा.

२) वारकरी संप्रदायातील 'संतमेळ्याचे' वाङ्मयीन महत्त्व विशद करा.

**टिपा लिहा.**

१) ज्ञानेश्वरी

२) नामदेवांचे आत्मचरित्रपर अभंग

## २अ.१२ संदर्भ

१) शेणोलीकर, ह.श्री., प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप : डायमंड पब्लिकेशन्स, पुणे प्र.आ.२०११

२) नासिराबादकर, ल.रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : फडके प्रकाशन, कोल्हापूर, नववी आवृत्ती २००८

३) डॉ. पठाण, यु.म., संत साहित्य नवचिंतन : दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., प्र.आ.२०११

munotes.in

**पूरक ग्रंथ:**

१) जोग, रा.श्री., व इतर (संपा) मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प. आ. १९७३

२) तुळपुळे, शं.गो., पाच संतकवी : सुविचार प्रकाशन, पुणे, ति. आ. १९८४

३) भावे, वि. ल., महाराष्ट्र सरस्वत : पॉप्युलर मुंबई

४) सरदार, गं.बा., संत साहित्याची सामाजिक फलश्रुती : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

*****

munotes.in

# २ब

## महानुभाव तत्वज्ञान व पंचकृष्ण संकल्पना

**घटक रचना**

२ब.१ उद्देश

२ब.२ प्रस्तावना

२ब.३ महानुभाव पंथ

२ब.४ महानुभावाचे पंचकृष्ण

  २ब.४.१ दत्तात्रेयप्रभू

  २ब.४.२ श्रीकृष्ण चक्रवर्ती

  २ब.४.३ चांगदेव राउळ

  २ब.४.४ गोविंदप्रभु

  २ब.४.५ चक्रधरस्वामी

## २ब.१ उद्देश

१. तेराव्या शतकातील सामाजिक व राजकीय परिस्थितीची वैशिष्टये लिहिता येतील.

२. महानुभाव पंथाचे प्रवर्तक कोण होते, हे सांगता येईल.

३. महानुभाव पंथाची स्थापना कोणत्या पार्श्वभूमीवर झाली ते स्पष्ट करता येईल.

४. महानुभाव वाङ्मय निर्मितीचा काळ व वाङ्मयाचे स्वरूप नोंदवता येईल.

## २ब.२ प्रस्तावना

महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक चक्रधरस्वामी यांच्या वेळी यादवांची राजवट होती. इ.स. ७९५ ते ११९० पर्यंत यादवराजे मांडलिक होते. पण या घराण्यातील भिल्लम नावाच्या राजपुरुषाने सोमेश्वर चालुक्याला जिंकून संपूर्ण महाराष्ट्रात यादवांची सत्ता प्रस्थापित केली. कृष्णदेवाच्या कारकिर्दीतच राजकीयदृष्ट्या यादवांचे राज्य साम्राज्य बनले. आर्थिक दृष्टया ही काळ अत्यंत भरभराटीचा व ऐश्वर्याचा होता. यादव राजे वैदिक संस्कृतीचे व विद्या-कला यांचे पुरस्कर्ते होते. कृष्णदेवाने आपल्या कारकिर्दित अनेक यज्ञयाग केले. रामदेवरावाने काशीत विष्णूचे सुवर्णमंदिर बांधले व आपल्या राज्यातही अनेक मंदिरे उभारली. वैदिक, महानुभाव, भागवत इत्यादी धर्मपंथाना त्यांनी चांगला राजाश्रय दिला. संस्कृत आणि मराठीत अनेक ग्रंथ निर्माण झाले. त्यामुळे यादवांची राजवट वाङ्मयदृष्ट्या मोठी भरभराटीची होऊन गेली. नेवासे, पैठण, रिधपूर व पंढरपूर ही ग्रंथनिर्मितीची चार प्रमुख केंद्रे देवगिरीच्या यादवांच्या राज्यात होती.वाङ्मयनिर्मितीची प्रेरणा धार्मिक होती. समाज अशिक्षित होता. शेती हा प्रमुख व्यवसाय होता. जातीभेद होते. रोटी-बेटी व्यवहार नव्हता. समाज कष्टाळू

munotes.in

होता. कारगीर वर्ग कुशल होता. एकूण प्रजा सुखी आणि समाधानी होती. लोकांची वृत्ती धार्मिक होती. आध्यात्माकडे कल होता. भक्तीमय असा समाज होता.

१३ व्या शतकात रामदेवराय आणि कृष्णदेवराय यांच्या समृध्द राजवटीत श्रीचक्रधरास्वामीनी महानुभावपंथानी स्थापना केली. याचबरोबर पंथाचा प्रचार, प्रसार व वाङ्मयीन कारकीर्द घडवली. या पंथाचे मूळ पुरुष श्रीगोविंदप्रभू उर्फे गुंडम राऊळ हे होते. यादवराजांचा काळ ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाचा समृध्दीचा कालखंड होता. हा पंथ महाराष्ट्रात उदयाला आला. त्याचा प्रसार काबूल कंदहारपर्यंत होता. भारताची फाळणी झाल्यावर महानुभावांनी पूर्वपंजाबमध्ये स्थलांतर केले. पंजाबात त्याला जयकृष्णी पंथ तर बुंदेलखंडात अच्युतपंथ असे म्हणतात. (पृ. १९०, मराठी वाङ्मयाचा इतिहासः संपा. डॉ. तुळपुळे)

महानुभाव पंथ परमेश्वराचे पाच अवतार मानतो. श्रीकृष्ण, श्रीदत्तात्रेयप्रभू, श्रीचांगदेव राउळ, श्रीगोविंदप्रभु व श्रीचक्रधर. परमेश्वराच्या या पाच अवतारांना 'पंचकृष्ण' असे म्हणतात.

## २ब.३ महानुभाव पंथ

- महानुभाव पंथ म्हणजे 'महान अनुभवोस्तेजा बलं वा यस्य सः महानुभाव (मोठया तेजाने युक्त असलेल्या लोकांचा मार्ग तो महानुभाव पंथ)
- 'महान अनुभव असलेले ते महानुभाव' असाही उल्लेख आढळतो.
- या पंथाचे मूळ नाव 'परमार्ग'
- महानुभावपंथ' हे नाव प्रथम संत एकनाथांनी वापरले.
- या पंथाने मराठी गद्य व पद्य वाङ्मयाची वैभवशाली परंपरा निर्माण केली.

'महानुभावपंथ' हे नाव प्रथम संत एकनाथांनी वापरले असे शं. गो. तुळपुळे म्हणतात. महानुभाव पंथाने मराठी गद्य वाङ्मयाची वैभवशाली परंपरा निर्माण केली.

**चार अवतार:**

महानुभाव चार युगांचे चार अवतार मानतात.

१) कृतयुगात - हंसावतार

२) त्रेतायुगात - दत्तावतार

३) व्दापारयुगात - कृष्णावतार

४) कालियुगात - चक्रधरावतार

**पंचकृष्ण संकल्पना:**

महानुभावांनी श्रीकृष्णाची पाच रूपे मानली आहेत.

१) श्रीकृष्ण

२) श्रीदत्त

३) श्रीचांगदेव राउळ

४) गुंडम राउळ (श्रीगोविंदप्रभू)

५) श्रीचक्रधरस्वामी

हे पाच अवतार म्हणजेच पंचकृष्ण होय.

**महानुभावांचा आचारधर्म:**

- महानुभाव पंथामध्ये संन्यस्त व गृहस्थ असे शिष्याचे दोन वर्ग आहेत.
- संन्याशाने नित्य भ्रमंती, भिक्षाभोजन करावे, एकांतवास करून परमेश्वराचे नामस्मरण करावे.
- कर्म; धर्म; विधि; विखो; परित्यजौनि परमेश्वरा शरण रिगावे.
- जीवेश्वर भेद, भक्तियोग, संन्यास व अहिंसा या चार तत्वांवर आचारधर्म उभा आहे.

**महानुभावांचे तत्वज्ञान द्वैती**:

१) महानुभावांचे तत्वज्ञान द्वैती आहे.

२) महानुभाव जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या चार वस्तू मुख्य व नित्य अशा मानतात.

३) त्यांच्या मते या चार वस्तू स्वतंत्र, नित्य, अनादि व अनंत आहेत.

४) देवता या नित्यबध्द आहेत. जीव बध्दमुक्त आहे. परमेश्वर नित्यमुक्त आहे व प्रपंच अनित्य आहे असे या तत्वज्ञानाचे सूत्र आहे.

**जीव:**

जीव बध्दमुक्त आहे. म्हणजेच बध्द असूनही- मुक्तीस पात्र आहे. त्याला मायेचे बंधन आहे. अविद्येचे मडके फोडले म्हणजे वरची मडकी आपोआप फुटतील. अनदि, आविद्या, अन्यथाज्ञान, जीवत्व व अदिमळ या पाच पिशी होय. 'तळीचील हाणितलेया वरिचील पडे: उतरंडी गडबडी' थोडक्यात परमेश्वर प्राप्तीनंतरही तो परतंत्रच असतो.

जीव बध्दमुक्त असतो. जीव हा अनादी कालापासून अविद्यायुक्त आहे. जशा देवता असंख्य तसेच जीवही असंख्य, अनादी आणि नित्य. परमेश्वराची सेवा केल्यानेच जीवाचा अविद्यानाश होतो; म्हणून जीव व परमेश्वर यांच्यात सेव्यसेवक संबंध असतो. उदा.

'परमेश्वरू सेव्यो: जीवु सेवकु' जीव मायेत अनादी काळापासून पडलेला निष्क्रिय आणि परतंत्र असतो. जीवाला क्रियाशील करण्यासाठी परमेश्वर वृत्तीमुळे मायेने एक अंश सोबत दिला. मुक्ती मिळे पर्यंत त्याच्या सोबत असतो.

**देवता:**

देवता नित्यबध्द आहेत. देवतांना महानुभावांनी गौण मानले आहे. त्या ज्ञान, आनंद, ऐश्वर्य देऊ शकल्या तरी परमेश्वर होऊ शकणार नाहीत. कर्मभूमीचिया देवता, अष्टौदेवयोगी देवता, अंतराळीचे गंधर्व देवता, स्वर्गीचे इंद्रचंद्रादिक दिव्य देवता, कैलास वैकुंठीचे हरिहर ब्रह्मादिक देवता, क्षीराब्धीच शेषशायी देवता, अष्टभैरव देवता, विश्वरूप देवता, चैतन्य देवता म्हणजेच माया असे देवतांचे प्रमुख प्रकार आहेत. या देवता परमेश्वर नव्हेत. या नेहमी बध्द, मुक्तीला अपात्र........ सृष्टीतील जीवांना त्यांच्या कर्माची सुखदुःखात्मक फळे देणे, हे या देवतांचे मुख्य कार्य ईश्वर विषयक कर्माची फळे मात्र त्या देऊ शकत नाहीत, ती ईश्वराकडूनच जीवाला मिळतात. (पृ.३९८, म.वा.इ.खंड १, अ.ना. देशपांडे) थोडक्यात 'दैवरहाटी' ईश्वर विषयक कर्मे, देवतांकडून मिळणारी फळे 'कर्मेरहाटी'. जीव या दोघांपैकी एकाचा अनुयायी असतो.

**प्रपंच:**

प्रपंचास महानुभाव अनित्य मानतात. कारणप्रपंच व कार्यप्रपंच असे त्यांनी प्रपंचाचे दोन भाग केले आहेत. अव्यक्त असणारी पंचमहाभूते व त्रिगुणी म्हणजेच कारणप्रपंच होय. कार्यप्रपंचाची निर्मिती पृथ्वी आप, तेज, वायू, आकाश ही पंचमहाभूते व सत्त्वरज, तम हे त्रिगुण यांच्यातून झाली आहे. श्रीचक्रधरस्वामी म्हणतात, '' एथ प्रपंचु भणिजे स्वतंत्र पदार्थ एकु आति.'' कारणरूप प्रपंच आणि कार्यरूप प्रपंच. कारणरूप प्रपंच अनादिसिध्द असतो तर कार्यरूप प्रपंच नाशवंत आहे. कार्यरूप प्रपंच संहारानंतर कारणरूप अवस्थेत राहतो.

**परमेश्वर:**

परमेश्वर हा नित्यमुक्त असल्यामुळे तो जीवाचा उध्दार करू शकतो. परमेश्वराचे ज्ञान झाले म्हणजे, अथवा भक्ती केली म्हणजे, जीवाला मोक्ष मिळतो. परमेश्वर सर्वशक्तियुक्त आहे. श्रीचक्रधरस्वामी म्हणतात, ''जीवु आर्जकू: देवतां फळदायी: चैतन्य व्यापारतेः परमेश्वरू उध्दरीता:'' जीवाचा उध्दार करण्यासाठी परमेश्वर तीन रूपाने अवतरतो. गर्भीचा, पतिताचा आणि दवडण्याचा 'एथ जीव उध्दरीजेति हेचि व्यसन' असे परमेश्वराला व्यसनच आहे. मानवाने ईश्वराच्या कृपेसाठी पात्र होण्यासाठी जगायचे असते. तारूण्यातच ईश्वराची गोडी वा अनुसरण झाले पाहिजे. असे चक्रधरांना वाटते. अशा प्रकारे महानुभाव संप्रदायात या चार पदार्थांचे वेगवेगळे स्वरूप आपल्याला पाहावयास मिळते. हे त्यांचे तत्त्वज्ञान आहे.

## २ब.४ महानुभावाचे पंचकृष्ण

**प्रस्तावना:**

महानुभाव पंथाचे वाङ्मय पंचकृष्णाभोवती निर्माण झाल्यामुळे पंचकृष्ण संकल्पना समजावून घेऊ. महानुभाव पंथातील अवतार आणि इतर पंथातील अवतार यातील फरक समजून

घेऊ. श्रीचक्रधरस्वामींनी म्हांइभट्टांना जी पाच अवतारांची नावे सांगितली तीच केशीराजांनी सूत्रपाठात 'पंचकृष्ण' या शिर्षकाखाली क्रमवार लिहिली आहेत.

'जैसे व्दापरी श्रीकृष्णचक्रवर्ती ॥१॥

जैसे सैहाद्री श्रीदत्तात्रेय प्रभु ॥२॥

जैसे व्दारावतीए श्रीचांगदेवो राऊळ ॥३॥

जैसे ऋध्दिपुरीं श्रीगुंडम राउळ ॥४॥

जैसे प्रतिष्ठानीं श्रीचांगदेवो राऊळ ॥५॥

या सूत्रानुसार श्रीकृष्ण, श्रीदत्तात्रेयप्रभू, श्रीचांगदेव राउळ, द्वारावातिकार, श्री गोविंदप्रभु व पैठणचे श्री चांगदेव राउळ हे महानुभावाचे पाच कृष्णावतार आहेत. पहिले नाव श्रीकृष्णाचे असले तरी या मार्गाचा आरंभ श्रीदत्तात्रेय प्रभुंच्या अवताराने झाला असे स्वतः चक्रधरांनीच सांगितले आहे. या मार्गासि 'श्रीदत्तात्रेयप्रभु आदिकारण' असेही म्हटले जाते. पंचकृष्ण हे जीवाला मोक्ष देऊ शकतात असे महानुभाव समजतात.

सूत्रपाठाचे अभ्यासक व इंग्रजी अनुवादक डॉ. ॲन फेल्डहाऊस यांना हे पंचकृष्ण प्रकरण 'सुत्रपाठा' च्या प्राथमिक खडर्यानंतरच केवळ नव्हे तर चक्रधरांच्या पश्चात निर्माण झाले असावे असे मत मांडले. ( पृ. १९४ म.सा.प.खंड १ संपा. डॉ. तुळपुळे )

महानुभव वाङ्मयाचे दुसरे अभ्यासक डॉ. रेसाइड यांनी "महानुभावांचा दत्त" या विषयाचा सखोल अभ्यास केला असून त्यांच्या मतेही या अवताराचा समावेश पंचकृष्णांच्या यादीत थोडया उशिरानेच म्हणजे १४ व्या शतकात झाला असला पाहिजे असे मत मांडले.( पृ. १९५ म.सा.प. खंड १ संपा. डॉ. तुळपुळे )

महानुभाव मतानुसार त्याचा दत्त पौराणिक स्वरूपाचा नसून ऐतिहासिक स्वरूपाचा आहे व तो त्यांच्या मार्गाने 'आदिकारण' आहे. या परमेश्वराचा व त्याच्या लीळांचा उल्लेख लीळाचरित्र (एकाक १ ; पूर्वार्ध ४३,६२,३१२,उत्तरार्थ ११३, २८४) गद्यराजस्तोत्र (२३२ ते २३६) सैदयाद्रिवर्णन व सैदयाद्रिलीळा या ग्रंथातून आढळतो. यावरून श्रीदत्तात्रेय - श्रीचक्रपाणी किंवा श्रीचांगदेव राऊळ, श्रीगोविंदप्रभू - श्रीचक्रधर अशी परंपरा ठरते. डॉ. कोलते यांनी पंचकृष्णापैकी श्रीकृष्ण हा अवतारही दत्तपरंपरेतील मानता येणे शक्य आहे. असे तो अवतार ज्या यदूच्या कुळात झाला त्या यदूला दत्तात्रेयापासून अनुग्रह होता. या भागवताच्या एकादश स्कंधातील उल्लेखावरून (७.२५) सूचविले आहे..( पृ. १९६ म.सा.प. खंड १ संपा. डॉ. तुळपुळे )

### २ब.४.१ दत्तात्रेयप्रभू:

महानुभव पंथाचा दत्तसंप्रदाय महाराष्ट्रात व कर्नाटकात प्रसिध्द असलेल्या दत्त संप्रदायाहून निराळा आहे. त्या संप्रदायाचे प्रवर्तक पीठापूर येथील दत्तावतार श्रीपाद - श्रीवल्लभ असून तेच पुढे नृसिंह सरस्वती म्हणून वऱ्हाडात कारंजे येथे जन्मास आले. सरस्वती -गंगाधराच्या 'गुरूचरित्रात' यासंबधीच्या 'लीळा' आहेत.

महानुभावांच्या दत्तसंप्रदायाची परंपरा निराळी आहे. याचबरोबर महानुभावांचा दत्तावतार निराळा आहे. रूढ दत्तात्रयावताराप्रमाणे तो त्रिमुखी नसुन एकमुखी आहे. 'तीन शिरे सहा हात' हे वर्णन लागू होत नाही. महानुभवांचा दत्तावतार हा एक देवतावतार नसून तो प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार आहे. दोन दत्तावतारातील हा भेद महत्त्वाचा आहे. (पृ. १९७, मराठी वाङ्मयाचा इतिहासः संपा. डॉ. तुळपुळे)

पंचकृष्णातील दत्तावतार हा दुसरा अवतार मानलेला आहे. श्रीदत्तप्रभुचा अवतार त्रेतायुगातील आहे. द्वापारयुगाच्या अगोदरचे त्रेतायुग येते. त्यामुळे पंचकृष्णाच्या नावाच्या यादीमध्ये पहिले नाव श्रीकृष्णाचे असले तरी अवतार पहिला श्रीदत्तप्रभुचा आहे. श्रीदत्तप्रभुच्या लीळा ४७ आहेत. प्रा. डोळके यांच्याजवळ पिढीपाठाचे जे श्रीचक्रधर निरूपित श्रीदत्तात्रेय चरित्र आहे त्यात अवघ्या सात लीळा आहेत.

**'सूत्रपाठांच्या विचार-प्रकरणातील दत्तात्रेय विशयक सूत्रे पुढीलप्रमाणे आहेत.**

'श्री दत्तात्रेयप्रभूच्या चतुर्युगी अवतारू' (२८२), 'अलर्काचे तीन्ही तापू दर्शनासरिसें शंबोलि शंबोलि भणौनि फेडिते जाले: कां ते पाणी अमृतवर्षिणी की (२८३), 'ते अमोघदर्शन की गाः' (२८४), 'या मार्गासी श्रीदत्तात्रेयप्रभु आदिकारणः' (२८५) या चार सूत्रातील आशय असा की दत्तावतार हा त्रेतायुगातील असला तरी त्यानंतरच्या सर्व युगांत ही तो विद्यमान आहेत. त्याचे दर्शन अमोघ आहे ते एखाद्यासच त्याचे दर्शन घडते. डॉ. कोलते यांनी संपादित केलेल्या प्रतित 'सहस्त्रार्जुना वरप्रदान' व 'परसरामा भेटी' या दोन लीळांत प्रभूने दर्शन दिल्याचे उल्लेख येतात.

दत्तात्रेयप्रभुंची माहूर, पंचाळेश्वर इत्यादी स्थाने महानुभावपंथीय पुज्य मानतात. त्यात माहुरचे महत्त्व विशेष आहे. हे माहूर सह्याद्रीच्या एका रांगेत वसलेले असून माहूरच्या डोंगरावर दत्तात्रेयप्रभुंनी ज्या लीळा केल्या त्याचे वर्णन खळोबासाच्या 'सह्याद्रिवर्णन' या काव्यात आले आहे. माहूर म्हणजे मूळचे मातापूर आणि मातापूर म्हणजे अर्थात रेणूकामातेचे पूर. परंतु 'सह्याद्रीवर्णनकाराने त्याची उपपत्ती दत्तमातेचे पूर अशी लावली आहे.(पृ. १९९, मराठी वाङ्मयाचा इतिहासः संपा. डॉ. तुळपुळे)

**२ब.४.२ श्रीकृष्ण चक्रवर्ती:**

पंचकृष्णातील हा दुसरा अवतार आहे. तो पूर्णावतार असून 'गर्भीचा' व 'उभयदर्शी' अवतार आहे. तो आपल्या पूर्वावतारात बदरिकाश्रम येथे हंसरूपाने 'राज्य करीत' होता व दैत्यांचे निर्दलन करून साधुजनांचे रक्षण करावे यासाठी तो देवकीच्या पोटी आला. उदा. 'देवकीदेवीसि प्रसूति जाली: सवेंचि परमेश्वरें गर्भासि बीजें केले'. म्हणून श्रीकृष्णाला गर्भीचा अवतार म्हणतात. त्यांच्या लीळा व्दापरीच्या लीळा किंवा व्दापरचरित्रे म्हणून प्रसिध्द आहेत. कारण तो व्दापार युगात होऊन गेला. चक्रधरांनी श्रीकृष्णाला 'विधाचार्य' म्हटले आहे. चक्रधर-निरूपित 'श्रीकृष्णचरित्रा' वरून परमेश्वराचा हा अवतार श्रीकृष्णाच्या पौराणिक अवताराशी मिळताजुळता दिसतो.

महानुभावांचा कृष्ण भागवतातील कृष्णाहून थोडा निराळा आहे. त्यांच्याच पंचकृष्णातील इतर अवतारांहूनही त्याचे निराळेपण जाणवते याचे कारण त्याचे कालदृष्टया दूरत्व इतर अवतार कलियुगातील आहेत, तर श्रीकृष्णावतार द्वापरयुगातील आहे. पंचकृष्णाच्या



munotes.in

नामावलीतही त्याचा निर्देष इतरांच्याप्रमाणे स्थलसापेक्ष नव्हे तर कालासापेक्ष होतो. दत्तात्रेयप्रभू सह्याद्रीचे, चांगदेव राउळ द्वारावतीचे, गोविंदप्रभू रिधपूरचे आणि चक्रधर प्रतिष्ठानीचे पण श्रीकृष्णचक्रवर्ती मात्र विशिष्ट स्थानीचे नसुन व्दापरीचे म्हणजे विशिष्ट कालीचे, असा अभिप्राय या नामावलीत दिसतो. (पृ. २००, मराठी वाङ्मयाचा इतिहासः संपा. डॉ. तुळपुळे )

श्रीचक्रधरांनी श्रीकृष्णाच्या ४७ लीळा सांगितल्या असून त्या महींद्रभट्टांनी ऊर्फ म्हाइंभटांनी संकलीत केलेल्या आहेत.

### २ब.४.३ चांगदेव राउळ:

फलटण येथे जनकनायक व जनकाइसे यांचे पोटी चांगदेव राउळ यांचा जन्म झाला. चांगदेव राउळ यांनाच चक्रपाणी हे नाव आहे. हा तिसरा अवतार व्दारावतीकार श्रीचांगदेव राउळ यांच्या चरित्रविषयक लीळा महींद्रभट्टानीच संकलित केल्या आहेत. चांगदेव राउळ प्रथमपासून मनाने विरक्त होते. ते संसारात रमले नाही. त्यामुळे लग्न करून ही ते कमळाइसेपासून दूर राहिले. एक दिवस यात्रेला जाण्याचे निमित्त करून त्यांनी फलटण सोडले व यात्रेकरूच्या मेळाव्या बरोबर ते मातापूर किंवा माहूर येथे आले. माहूराला मेरूवाला नावाचे तळे आहे व जवळच श्री दत्तात्रेयांचे शयनस्थान आहे. तळयात स्नान करून ते दत्तस्थानाच्या दर्शनासाठी म्हणून निघाले असताना वाटेत एका जाळीतून स्वतः श्री दत्तात्रेयप्रभू वाघाच्या रूपात डरकाळी फोडीत बाहेर आले व आपला चवडा त्यांनी चांगदेवांच्या माथ्यावर ठेवला. अशा रीतीने त्यांच्याकडून शक्ती स्वीकारली. त्यानंतर चांगदेवांनी गृहस्थाश्रम सोडून दिला. अवधूताचा वेष धारण करून भिक्षाव्रत स्वीकारले. काही दिवस माहूरला राहून ते यात्रेकरूबरोबर व्दारावतीला आले.

**चांगदेव राउळ यांचे व्यक्तिमत्त्व:**

चक्रपाणी हे गोमतीनदीच्या काठी एका गुंफेत राहत. व्दारावतीला असताना ते एका हातात खराटा आणि दुसऱ्या हातात सूप घेऊन गावातील रस्ते झाडीत व आपल्या दर्शनाला येणाऱ्या पुरुषांच्या डोक्यावर हातातील सूप ठेवून त्यांना खराटयाने पाठीवर मारीत. विद्यादान करण्याची त्यांची ही रीत होती. पैकी सूप ठेवल्याने ईशप्राप्तीच्या मार्ग किंवा ब्रम्हविद्या प्रगट होई व खराटयाने हाणल्याने देहविद्येसारख्या हीन प्रकारची विद्या प्रगट होत. अशा रीतीने चांगदेवांनी एकूण बावन पुरुषांना विद्यादान केले. त्यात रिधपुरचे श्रीगोविंदप्रभू हे एक होत.

त्यामुळे उदास वृत्तीने राहून जीवांचा उध्दार करण्याचे कार्य करीत होते. त्यांच्या दृष्टीने सर्व भेदाभेद नाहीसे होऊन ती सर्वाभूती सम झाली होती. त्यामुळे "शुद्रांच्यां घरीं आरोगण" किंवा "अंत्येजाचां घरी क्रीडा" करावयास त्यांना काहीच वाटत नसे. त्यांच्या दैवी सामर्थ्याची कीर्ती सर्वदूर पसरली होती. कामाख्या स्त्री त्यांच्याकडे आकर्षित झाली. सुखाचे आव्हान केले तेव्हा चांगदेवाने योगसामार्थ्याने ठायींच्या ठायी देहत्याग केला व अवतार संपविला. भरवस येथे हरपाळदेवाच्या मृत देहात प्रवेश केला. नवीन अवतार स्वीकारला तो म्हणजेच महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर होत. महात्मा गांधीजीच्या गुजराथमधील एका गावात, त्यांच्या आवडीच्या विधायक कार्यक्रमातील ग्रामसफाईच्या जो

एक महत्त्वाचा उपक्रम त्याची मुहूर्तमेढ श्रीचांगदेवांनी बाराव्या शतकात रोविली। अहिंसात्मक सामजिक क्रान्तीला श्री चांगदेवांनी इतक्या जुन्या काळी क्रियाशील चालना दिली । हेच कार्य करीत असताना त्यांनी रिध्दपूरहून व्दारावतीला आलेले श्रीगोविंदप्रभू उर्फे गुंडम राउळ यांच्यावर अनुग्रह केला. गुंडम राउळांनी चांगदेव राउळापासून शक्ती स्वीकारली आणि अडल्या नडल्यांच्या मदतीला निरपेक्ष बुध्दीने धावून जाण्याच्या समाजसेवेची दीक्षा ही घेतली. अशा प्रकारे श्रीचांगदेव राउळ यांनी ६३ वर्षे राज्य केले. (अ.ना.देशपांडे खंड १)

### २ब.४.४ गोविंदप्रभु:

गोविंदप्रभू उर्फे गुंडम राउळ हे चवथे अवतार होय. वऱ्हाडामध्ये रिधपूर येथील काटसरे किंवा काटोपरे या गावी एका काण्व ब्राम्हणाच्या घरी इ.स. ११८७ मध्ये अवतार स्वीकार केला. त्यांच्या आईचे नाव नेमाइसे व बापाचे नाव अनंतनायक. आईवडील लहानपणीच वारल्यामुळे गोंविंदप्रभूचे पालनपोषण त्यांच्या मामाने व मावशीने केले. वयाच्या सातव्या वर्षी 'मौजीबंधन' होऊन गोविंदप्रभू शिक्षणासाठी रिधपूरास आले ते शेवटपर्यंत तेथे होते पंचकृष्णांच्या नामावळीत त्यांचा उल्लेख 'ऋध्दिपुरीचे श्रीगुंडम राउळ' असा येतो. कारण त्यांचे नाव गुंडम किंवा गुंडो असे ठेवलेले होते. त्याचा उल्लेखही त्याच नावाने केलेला दिसतो.

गोविंदप्रभूंचा अवतार हा तिसऱ्या प्रकारचा म्हणजे 'आच्छादनीचा परदृश्यावतार होता.

वस्तुतः पर आणि अवर अशा दोन्ही विद्या आच्छादून केवळ परविद्या प्रगट केली. त्याला 'आच्छादनीचा परदृश्यावतार म्हणतात. गोविंदप्रभुचा अवतार या प्रकारचा असून शिवाय तो 'दवडण्याचा' होता.

**गोविंदप्रभूचे व्यक्तिमत्त्व:**

संजीवनी विद्या, त्रिकालज्ञान, पंचमहाभूतावर नियंत्रण विष निर्विष करणे, भूमिगत द्व्य शोधणे, मुक्याला वाचा देणे अंतरीक्षातून वस्तू आणणे इत्यादी अनेक सामर्थ्य गोविंदप्रभूच्या अवतारित्वाची साक्ष देतात. त्यांच्या देहातून प्रकाश बाहेर पडे व देवतादिकांशी त्यांचे नित्य संभाषण होई. अनाथ स्त्रियांनाही गोविंदप्रभू आपले माहेर वाटे. या दृष्टीने जिला मायबाप किंवा बहिण-भाऊ यापैकी कोणी नाही आणि जिला सासुरवासाचा जाच आहे. अशा सावळापूरच्या एका ब्राह्मणाच्या सुनेची हकीगत ऐकण्यासारखी आहे. "तुं के निगालीसि?" मी आपुलेया माहियरा जाती असे.'

गोंविंदप्रभूच्या ठिकाणी विनोद बृध्दीही होती. भक्तजनांना गमतीने 'नावे' ठेवीत (उदा. खोडी, कोथळा, जावई इत्यादी) शिव्या देत. बालवृत्ती ही होती. खादाडपण हे एक वैषिष्ट्ये होते. महानुभाव पंथाच्या दृष्टीने त्यांचे मुख्य कार्य म्हणजे चक्रधर निर्मिती हे होय. पूर्वायुष्यातील हारिपाळदेव या नावाचा एक साधा प्रधानपूत्र गोविंदप्रभूंनी त्यांच्याकडे 'सेंगुळेबुडडे' फेकताच ते वरच्या वर झेलून, तोही एका क्षणात त्यांच्याकडून ज्ञानशक्ती स्वीकारून त्यांच्यासारखाच परमेश्वरावतार झाला हे केवढे आश्चर्य पण ते घडून आले. श्रीचक्रधरस्वामी रूपाने अवतारी पुरुष आले.

## २ब.४.५ चक्रधरस्वामी:

पंचकृष्णापैकी हा पाचवा अवतार होय. श्रीचक्रधरांच्या अवतार धारनांची कथा अपूर्व आहे. गुजरातच्या हरपाळ देवाच्या मृत शरिरात व्दारावतीकार चांगदेव राउळांनी प्रवेश केला. त्यामुळे चक्रधरांचा अवतार हा 'पतित' अवतार मानला जातो. त्याचे नामकरण 'चक्रधर' असे गोविंदप्रभूनी केले. गोविंदप्रभूजवळ काही काळ राहून ते ऋध्दिपूरहून सालबर्डीला गेले. बारा वर्षे तपस्या केल्यानंतर त्यांनी भ्रमंतीला सुरुवात केली.

**श्रीचक्रधरांचे व्यक्तिमत्त्व:**

श्रीचक्रधर अतिशय सुंदर होते. श्रीचक्रधरच्या लीळाचरित्रात यांचे उदाहरणे अनेक आहेत. एका नाथपंथीय योग्याने स्वामींना पहिले. तेव्हा तो म्हणाला "अयाः कैसे सौंदर्य पुरुष: साक्षात, गोरसनाथू: ऐसे सौंदर्य कव्हणी ठाई नाही" शिष्यांमध्ये असलेल्या गुणांची पारख करीत. त्यातील गुणांना विकसित करीत. श्रीचक्रधरस्वामींना अनेक भाषा येत. उदा. संस्कृत, मराठी, हिंदी, गुजराती, श्रृती, स्मृती, पुराणे, उपनिषदे यांचे त्यांना ज्ञान होते.

यादवकाळात वर्णभेदाने समाज त्रस्त झाला होता. वर्णभेद व गरीब-श्रीमंत असा भेद चक्रधरस्वामींनी केला नाही. स्त्रीयांना धर्माचे अधिकार दिले. मठात येण्याचे, पूजा अर्चा करण्याचे स्वातंत्र्य दिले. त्यांच्या ठिकाणी करूणा होती. प्राणीमात्रावर दया करत. आपल्या शिष्याकडून मराठीत ग्रंथरचना केली. पंरतु परकीय आक्रमणामुळे सकळा आणि सुंदर लिपित हे वाङ्मय बंदिस्त झाले. श्रीचक्रधरस्वामींच्या मराठी भाषेच्या प्रेमांतूनच पुढे महानुभावांचे सर्व गद्य व पद्य ग्रंथ अवतरले. चक्रधरस्वामींपासून महानुभावाना मराठीतून लेखन करण्याची प्रेरणा मिळाली. महानुभाव पंथाचे ते संस्थापक होते.

**महानुभावपंथाची वाङ्मयीन कारकीर्द**:

| महानुभावपंथाची साहित्यसंपदा | |
|---|---|
| **गद्य** | **पद्य** |
| लीळाचरित्र श्रीगोविंदप्रभूचरित्र | मूर्तिप्रकाश |
| दृष्टांतपाठ सूत्रपाठ | धवळे |
| पूजावसार | मातृकी<br>रूक्मिणीस्वयंवर |
| | शिशुपालवध, |
| | सहयाद्रीवर्णन, |
| | उध्दवगीता, |
| | ऋधद्धिपूरवर्णन |
| | वछाहरण, |
| | ज्ञानप्रबोध |

**महानुभावपंथातील प्रमुख ग्रंथकार**:

| | |
|---|---|
| म्हाइंभट्ट | पंडित विश्वनाथ |
| महदंबा | खळोबास |
| नरेंद्र | नारायण पंडित |
| भास्करभट बोरीकर | केसोबास |
| दामोदार पंडित | लक्ष्मीधरभट |
| | बाईदेव व्यास |

**महानुभावपंथाची वैशिष्टये:**

१) व्दैती तत्वज्ञानाचा प्रसार केला.

२) सामान्य देवतांचे प्रस्थ कमी केले.

३) देवतांच्या पुजेचा निषेध केला आणि चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर हल्ला चढाविला.

४) पंथामध्ये स्त्रिया, शुद्र, ब्राम्हण, क्षत्रिय अशा सर्वांना सामावून घेण्याची सोय ठेवली.

५) संन्याशाने जातिभेद न मानता कोणाकडूनही भिक्षा घ्यावी.

६) संपूर्ण अहिंसा आणि कडकडित वैराग्य यांचे पालन आपल्या संप्रदायात अपरिहार्य मानले.

७) लोकभाषेत म्हणजेच मराठी भाषेचा पुरस्कार केला. त्यातूनच ग्रंथरचना केली.

८) सामान्य लोकांसाठी ज्ञानाचे भंडार खुले केले.

munotes.in

*****

# ३अ

## वारकरी पंथियाचे वाङ्मय

**घटक रचना**

३अ.१ उद्देश्य

३अ.२ प्रस्तावना

३अ.३ अ) बहामनी राजवट

३अ.३.१ बहामनीकालीन साहित्य

३अ.३.२ एकनाथकालीन महाराष्ट्र

३अ.३.३ एकनाथांची ग्रंथरचना

चतु:श्लोकी भागवत

एकनाथी भागवत

रूक्मिणी स्वयंवर

भावार्थ रामायण

एकनाथांची अभंगवाणी

एकनाथांची भारूडे

एकनाथांच्या गौळणी, विरहिणी

एकनाथ पंथक

३अ.५ समारोप

३अ.६ प्रश्नावली

३अ.७ संदर्भग्रंथ

## ३अ.१ उद्देश्य

१) वारकरी संतांच्या रचनेतील वैविध्याचे स्वरूप समजावून घेता येईल.

२) वारकरी संत परंपरेचा परिचय करून घेता येईल.

३) संत एकनाथ यांच्या ग्रंथांची माहिती घेता येईल.

४) संत तुकाराम यांच्या वाङ्मयीन कामगिरी लक्षात येईल.

५) संतांनी केलेल्या विविध रचनाप्रकार ज्ञात होतील.

६) मध्ययुगीन कालखंडांतील संतांच्या काळरचनेचे स्वरूप समजावून घेता येईल.

**अ) बहामनी राजवट, एकनाथकालीन महाराष्ट्र, तमोयुग एकनाथ, एकनाथपंचक यांचे वाङ्मय.**

munotes.in

## ३अ.२ प्रस्तावना

मध्ययुगीन मराठी वाङ्मयामध्ये वारकरी पंथियांचे कार्य अतुलनीय आहे. त्यांच्या कार्याचा विचार, अभ्यास केल्याशिवाय आपणास पुढेच जाता येत नाही, येणार नाही. इतकी महान कामगिरी वारकरी संप्रदायाची आहे. घटक कृ. तीन 'वारकरी पंथियांचे वाङ्.मय' यामध्ये आपण बहामनी राजवटी विषयी विचार करणार आहोत.

महाराष्ट्रामध्ये बहामनी राज्याची स्थापना इ.स.१३४७ मध्ये झाली. म्हणून सुमारे १३४७ ते इ.स.१६५० या काळाला 'बहामनी काळ' असे संबोधण्यात येते. या काळात साधारणत: १३३५ मध्ये महंमद तुघलक नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या मनमानी कारभाराबद्दल सर्वत्र असंतोष पसरला होता. त्याच्या काळात बेबंदशाही माजली होती. तुर्की वंशाच्या परदेशी मुसलमान अमीर उमराव यांनी दौलताबादवर कब्जा केला. हे बंड महंमद तुघलकाला मोडणे शक्य नव्हते. महंमद तुघलकाने दक्षिणेतील अमीरांना विश्वासघाताने ठार मारण्याचा कट रचला होता पण तो फसला, आणि सुलतानाने पाठविलेल्या दुतासच ठार मारण्यात आले. आणि अमीरांनी 'हसन गंगु' नावाच्या अमीराचा दौलताबाद येथे राज्याभिषेक केला. याच हसनने 'बहमन' हे नाव धारण केले, आणि त्याने इ.स.१३४७ मध्ये बहामनी राज्यांची स्थापना केली.

अशाप्रकारे हसन याने स्वत:च 'बहमन' हे नाव धारण केले. त्यामुळे याला बहामनी राजघराणे किंवा बहामनी राजसत्ता असे नाव या राजवटीला मिळाले.

## ३अ.३ बहामनी राजवट

बहामनी सुलतानांनी मराठी मुलुखावर राज्य करणा-या स्थानिक सत्तांशी वैर पत्करून युध्द करण्यास, संघर्ष करण्यास प्रवृत्त झाले. खानदेश, नाशिक या शहरांवर यांचा अंमल होता. तसेच मध्य महाराष्ट्र, कोकण, माहिम, दाभोळ, संगमेश्वर येथे मराठी सत्ता होती. बहामनी वजीर महंमद गवान याने कोकण व गोवे जिंकून बहामनी सत्तेचा विस्तार करण्यास सुरूवात केली. मात्र महंमद गवान नंतर बहामनी राजवटीला उतरती कळा येऊ लागली. व-हाडची इमादशाही, बिदरची बरादेशाही, गोवळकोंडयाची कुतुबशाही, अहमदनगरची निजामशाही आणि विजापूरची आदिलशाही अशा पाच शाहया निर्माण झाल्या.

बहामनी सत्ता खिळखिळी होऊन, त्याच्या पाच शाहया निर्माण झाल्या. यावरून एक गोष्ट दिसून येते की, कोणतीही आणि कोणाचीही सत्ता चिरंतन टिकत नाही. बहामनी राजवटीच्या बाबतीतही हेच झाले.

**बहामनीकालीन महाराष्ट्र:**

बहामनी काळात महाराष्ट्रातील मराठी घराणे कशी होती याचा विचार केल्यास इतकेच म्हणता येईल की, यादव, सावंत, निंबाळकर इत्यादी घराणी पराक्रमी होती. परंतु आपण आपला स्वंतत्र कारभार करावा, स्वंतत्र राज्य स्थापन करावे असे एकालाही त्याकाळी वाटले नाही. अनेक घराणी उलट मुसलमानी सत्तेच्या चाकरीत होती. श्री. पु.ग.सहस्त्रबुध्दे म्हणतात, "......याचे कारण एकच, या घराण्यातील थोर पुरूषांना क्षात्रधर्माचा विसर पडला

हे एक कारण होय''. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे तत्कालीन मराठी सरदारांमध्ये एकी नव्हती. ते जर एकदिलाने या सत्तेविरूध्द आवाज उठविला असता तर मराठयांच्या पराक्रमांचे वेगळे चित्र पहायला मिळाले असते.

### ३अ.३.१ बहामनीकालीन साहित्य:

माणूस हा समाजशील प्राणी आहे. त्यामुळे साहाजिकच समाजामध्ये घडणा-या घटनांचे प्रतिबिंब त्याच्या मनावर पडणे स्वाभाविक आहे. बहामनी काळाचा विचार करता आपणाला असे म्हणता येईल की, या काळातील वाङ्मय हे यवनांचे आक्रमण, त्यांच्या सत्तेचे वर्चस्व याचा परिणाम या काळातच्या वाङ्मयावरही झाल्याचे दिसते. संस्कृत, उर्दु या भाषांतही साहित्य निर्मिती झालेली दिसते.

मध्ययुगीन मराठी साहित्यावर या काळात संत ज्ञानदेव, नामदेव, चोखोबा, इत्यादी संताच्या साहित्याचे विशेष संस्कार दिसून येतात. कारण त्यांच्या साहित्यात परमेश्वर (श्री. विठ्ठल) भक्ती आणि जनसामान्यांबद्दल विशेष कळवळा ही या साहित्याची वैशिष्टे आहेत. ज्ञानदेवादी संतांच्या लेखनानंतर सुमारे शे-दिडशे वर्षे फार कमी प्रमाणात साहित्य निर्मिती झालेली दिसते. परंतू या बहामनी काळात ख-या अर्थाने संत एकनाथांच्या साहित्य निर्मितीने बहामनी काळ उजळून निघाला, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण संत एकनाथांची ग्रंथरचना विपुल आहे. चतुश्लोकी भागवत, एकनाथी भागवत, एकनाथी गाथा, भावार्थ रामायण, रूक्मीणी स्वयंवर, भारूडे... इत्यादी अनेक ग्रथांतून संत एकनाथांची प्रचंड बुध्दिमत्ता तर दिसून येतेच, भक्तिभाव समाजाविषयी तळमळ आणि कळकळही दिसून येते. आणि याच पोटतिडकीतून हे लेखन झाल्यामुळे त्यात विशेष दर्जा प्राप्त झाला आहे. संत एकनाथांच्या काळात दासोपंत, रामा जनार्दन, जनी जनार्दन, विठा रेणुकानंदन या संत कवींचा उल्लेख 'नाथपंथक' म्हणून केला जातो.

याचबरोबर बहामनीकाळात कवी मुक्तेश्वर, त्र्यंबकराज, विष्णूदासनामा, महालिंगदास, सामराज आणि विशेष म्हणजे संत तुकाराम, समर्थ रामदास इत्यादी अनेकांनी जी काव्यनिर्मिती याच बहामनी काळात केली.

### ३अ.३.२ एकनाथकालीन महाराष्ट्र:

संत एकनाथांच्या काळात महाराष्ट्रात मुस्लिमांची राजवट होती. त्यांचेच साम्राज्य होते. त्यामुळे त्याकाळातील जनतेला मुस्लिमांचेच म्हणणे योग्य वाटत असे. इतकेच नव्हे तर मुस्लिम धर्माचे संस्कारही हिंदू समाजातल्या माणसांत रूजले होते. फारशी शब्दांचा वापरही बोलण्यात येत होता. क्षत्रिय आपला क्षात्रधर्म सोडून मुसलमानांचे नोकर बनले. याकाळात अनेक जन स्वार्थी आणि लाचार बनले. त्यामुळे सहाजिकच धार्मिक भावना कमी झाली. स्वत:च्या फायद्यासाठी लोक देवाचा वापर करू लागले. जाखाई – जोखाई... यासारख्या देवतांची भक्ती करून कोंबडे, बकरे कापून नवस करू लागले. त्यामुळे खरा भक्तीमार्ग, आणि भगवतभक्ती, ईश्र्वरभक्ती दिसेना झाली. धर्माच्या नावाखाली अनाचार, अनिती वाढू लागली. यातून बाहेर पडायचे असेल तर संत ज्ञानेश्वरांनी सांगितलेल्या भक्तीमार्गाचेच अनुकरण केले पाहिजे आणि तोच भक्तीमार्ग सर्वश्रेष्ठ आहे असे जनार्दनस्वामींना वाटले. जनार्दनस्वामी दत्त संप्रदायी असूनही काळाची गरज म्हणून संत एकनाथांना त्यांनी

ज्ञानदेवांची भगवतभक्तीच उपयोगी पडेल असे सांगितले. संत एकनाथांनीही मान्य केले. कारण या तमोयुगातून महाराष्ट्राला बाहेर काढायचे असेल तर संत ज्ञानेश्वरांचा वारकरी संप्रदायच योग्य असल्याने एकनाथांनी वारकरी संप्रदायाची धुरा खांद्यावर घेऊन लोकजागृतीचे महान कार्य करण्यास सुरूवात केली. अशा या संत एकनाथांच्या साहित्य निर्मितीचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे:

**संत एकनाथ:**

(इ.स.१५३३ ते १५९९)

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायामध्ये जे थोर संत होऊन गेले त्यामध्ये संत एकनाथांचे नाव मोठया आदराने घेतले जाते. त्यांचे कार्य आणि कर्तृत्व फारच महान होते. अशा या संत एकनाथांचा जन्म महान भगवतभक्त संत भानुदासांच्या घराण्यात सूर्यनारायण आणि रूक्मिणी यांच्या पोटी झाला.

संत एकनाथांची वंशपरंपरा भानुदास – चक्रपाणी – सूर्यनारायण – एकनाथ अशी आहे. संत एकनाथंच्या जन्मकाळासंबंधी मतभेद आहेत. यासंबंधी डॉ. शं.गो.तुळपुळे लिहितात, 'आज असे एकही ऐतिहासिक प्रमाण उपलब्ध नाही की, ज्यांच्या आधारावर नाथांचा जन्मकाळ निश्चित करता येईल. तेव्हा तुर्त परंपरेस अनुसरून एकनाथांचा जन्म शके १४५५ म्हणजेच इ.स.१५३३ मध्ये पैठणास झाला असे आपण धरून चालू.' श्री वि.प.भावे यांनीही संत एकनाथांचा जन्म शके १४५५ मानणे अधिक संयुक्तिक असण्याचा निर्वाळा दिलेला आहे.

संत एकनाथांचा जन्म पैठण येथे झाला. पैठण हे त्याकाळी विद्येचे माहेर घर म्हणून ओळखले जात होते. नाथांच्या घराण्यातच भक्तीची परंपरा होती. त्याचे संस्कार नाथांवर झाले. समाजातील प्रथा, परंपरा, चालीरीती, अनिष्ठ रूढी, जातियता, अस्पृश्यता... इत्यादी अनिष्ठ गोष्टींचा परिणाम लहानपणापासून नाथांच्यावर होत गेला. त्यातून ते बेचेन झाले आणि ते आपले गुरू जनार्दन स्वामींना भेटले.

जनार्दन स्वामींनी नाथांना उपदेश करताना सांगितले की, 'माझा मार्ग स्वयंउध्दाराचा, तुझा मार्ग लोकोध्दाराचा, भक्ती ज्ञानपूरक आहे तू भागवत संप्रदायाचा विकास करावा.' हा गुरूचा आदेश प्रमाण मानून संत एकनाथांनी आपल्या कार्यास सुरूवात केली. त्यांनी गुरूसेवेत असून हिमाचल तिर्थयात्रा केली. त्यांनी लोकजीवन जवळून पाहिले. वयाच्या पंचविसाव्या वर्षी नाथ पैठणात आले. तिथेच त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला, आणि तिथेच आजन्म वास्तव्य केले म्हणून पुढे संत एकनाथ आणि पैठण असे अतूट नाते निर्माण झाले. वयाच्या सहासष्टाव्या वर्षी फाल्गुन वद्य षष्ठीला शके १५२१ म्हणजेच इ.स.१५९९ मध्ये संत एकनाथांचे देहावसान झाले.

**३अ.३.३ एकनाथांची ग्रंथरचना:**

महाराष्ट्रात मध्ययुगीन काळात मराठी भाषांमध्ये विपुल ग्रंथरचना झालेली दिसते. संत ज्ञानेश्वरांनी विपुल ग्रंथरचना केली. त्यांनाच प्रमाण मानून संत एकनाथांनीही विपुल ग्रंथरचना केली. संत एकनाथांच्या साहित्यावर संत ज्ञानेश्वरांचा विशेष प्रभाव आहे.

म्हणूनच त्यांच्यातील साम्याकडे पाहून डॉ. शं. गो तुळपुळे म्हणतात, ‘ एकनाथांना ज्ञानदेवांचा अफाट किंवा ‘ज्ञानाचा एका’ असे मानतात. याचे कारण दोघांचीही ग्रंथरचना पाहिली असता नीटपणे उमगेल. नाथांना गुरूपुदशाने ज्ञानेश्वरी ऐकायचे भाग्य लाभले होते आणि तेव्हापासूनच त्या ग्रंथाची अवीट गोडी त्यांच्या जीभेला लागली होती. पुढे पुढे तर ते ज्ञानेश्वरीवरच पुराण सांगत. या दोन सत्पुरूषांत काळाने जरी तीनशे वर्षाचे अंतर असले तरी दोघांची हृदये मात्र अगदी एक आहेत.”

संत एकनाथांची वाङ्मये.... बहुप्रिय आहे, विपुल आहे. त्यात अध्यात्मिक प्रकरणे, टीका, अभंग, भारूडे, गौळणी, एकनाथी भागवत, एकनाथी रामायण, चतुश्लोकी भागवत... इत्यादी विविध प्रकारची साहित्य संपदा नाथांची दिसुन येते.

### १) चतु:श्लोकी भागवत:

संत एकनाथांचे गुरू श्री जनार्दन स्वामी यांच्या सांगण्यावरून ‘चतु:श्लोकी भागवत’ हा ग्रंथ नाथांनी लिहिला. नाथांनी मूळ संस्कृतमध्ये असलेल्या भागवताच्या चार श्लोकावर द्वितीय स्कंध ९ वा अध्याय यातील चार श्लोक १०३६ ओव्यांचा विवरणात्मक ग्रंथ लिहिला. त्याला ‘चतु:श्लोकी भागवत’ असे म्हणतात.

संत एकनाथांचा हा पहिलाच ग्रंथ आहे. या ग्रंथातून त्याच्या वाणीतील नम्रता, कृतज्ञता, गुरूभक्ती दिसून येते. ग्रंथाच्या सुरूवातीला त्यांनी गणेशवंदन, शारदावंदन केले. संत सज्जनांना वंदन करताना नाथ म्हणतात,

“आता वंदू संत सज्जन। जे सर्वांगी चैतन्यधन।

ज्या सगुण-निर्गुण समसमान। जे नीजजीवन सद्भावा ॥“

या ग्रंथान नाथांनी माया तत्त्व निरूपणही केलेले आहे. नाथ म्हणतात माया ‘मिथ्या’ आहे, नाथ म्हणतात,

“माया सत ना असत। शेखी नव्हे सद्‌सत।

माया मिथ्यत्याचे मथित। जाण निश्चित विधात्य... ॥“

संत म्हणो तरी जीत नसे। असन म्हणो तरी शरणे ननासे।

आधी असे पारी नसे। ऐसे मढेही न दिसे मायेचे डोळा ॥“ (४८५)

भारतीय संस्कृतीत स्त्रीच्या पवित्रतेला महत्वाचे स्थान आहे. नाथांनी तिला या ग्रंथात वैकुंठाचे स्थान दिले आहे.

उदा.:-

जे शुध्द सत्वेकरूनी संपन्न। नुल्लंघन पतीचे वचन।

जे निर्विकल्प पवित्रता पूर्ण। तीर्सा निवासस्थान वैकुंठ ॥१९०॥

अशा या निवांत सुंदर नाथांच्या 'चतुश्लोकी भागवत' या ग्रंथाबद्दल डॉ. शं.गो तुळपुळे म्हणतात, 'संकोच वृत्तीने आणि गुरूकृपेच्या जाणिवेने नाथांनी काव्याच्या प्रांतात हे पहिले पाऊल टाकले आहे. त्यांच्या प्रज्ञेचा हा प्रथमोन्मेष पाहून मात्र असे वाटते की, नाथ संकोच्याने बोलत नसून विनयाने बोलत आहेत. कारण ही चतुश्लोकी म्हणजे नाथ म्हणतात त्याप्रमाणे श्रांत जीवांतरित उभारलेले चौखांबी मंदिरच असून त्यात कवीची कलाकुसर स्पष्ट दिसते आणि 'शब्दांपुढे ज्ञान धावे । ओवी पुढे अर्थ पावे ।। या कविवचनाचा प्रत्यय पदोपदी येतो.' थोडक्यात नाथांची ही प्रथम रचना असली तरीही सर्वश्रेष्ठ अशीच म्हणता येईल.

**२) एकनाथी भागवत:**

'चतु:श्लोकी भागवत' या ग्रंथाच्या यशानंतर नाथांच्या गुरूंनी श्री जनार्दन स्वामींनी नाथांना दुसरा ग्रंथ लिहण्यास सांगितले तो ग्रंथ म्हणजे 'एकनाथी भागवत'. भागवताच्या एकांदश स्कंदावरील ही विस्तृत टिका आहे. या ग्रंथाची ओवी संख्या १८८०० इतकी आहे. भागवताचा एकादशस्कंध कृष्ण आणि उध्दव याचा संवादस्वरूप आहे.

'एकनाथी भागवतात कर्मकांड, उपासनाकांड, आणि ज्ञानकांड यांचा विचार केला असला तरी सामान्य लोकांना भक्तीचे ज्ञान कसे होईल याकडेही नाथांनी लक्ष दिले आहे.

"माझी मराठी भाषा चोखटी ।

परब्रम्हे फळली गाणी ।।"

या ग्रंथाचे प्रयोजन सांगताना नाथ म्हणतात, 'भोळेभाळे विषयी जन । याचे करिता श्रवण पठण ।।" हे नाथांनी सांगितले आहे.

संत एकनाथांच्या 'भागवत' रचनेविषयी डॉ. शं.दा.पेडसे लिहितात "गीतेची भक्ती कर्मप्रधान आहे, तर भागवताची भक्ती वैराग्यप्रधान आहे. गीतेपेक्षाही लोकप्रिय व अधिक प्रसार असलेला वैराग्यप्रधान भागवताची भागवत गीतेतील श्री कृष्णाच्या उपदेशाशी संगती लावून दाखविण्याचे अवघड कार्य नाथांनी, मूळ भागवताला धक्का न लावता त्यावरील आपल्या टीकेमध्ये केले. ही टीका मराठी असूनही तिच्यातील विवरण पद्धती व काशीतील संस्कृत पंडितांकडूनही मान्यता मिळविली. नाथांनी सनातनी पंडितांच्या राजधानी............. केवळ अपूर्व होय." (पृ. ३०२)

एकनाथी भागवत या ग्रंथाचे स्वरूप सांगताना डॉ. बी.एन. पाटील म्हणतात, ''संत एकनाथाच्या 'भागवतात' एकतीस अध्याय आहेत. मंगलचरण, श्रीकृष्णचरित्राची अपूर्वता, यादववंश निर्दालन, संतदर्शन, भागवतधर्म रहस्य, भागवतभक्त लक्षणे, मायेचे लक्षण, या..............., मायावरणाचा उपाय, कर्मकर्मातिल, वेदांचे नियमन, वर्णाश्रामधर्म, विषयासक्ती, पूजाविधी, व्दारकेतील उत्पातवर्णन, यादवांचे आपसांत युध्द, यादवांचा संहार, समुद्राची व्दारका बुडाली इत्यादी घटना प्रसंगातून श्री कृष्ण – श्री उध्दव यांच्यातील श्रीकृष्णाचा उध्दवास उपदेश, उद्वयी................नाथांनी भाष्यरूपाने भागवत ग्रंथात निरूपिली आहे.'' (पृ. ३०२)

भागवत ग्रंथाच्या पहिल्या अध्यायात 'संत सज्जन' यांच्या विषयी नाथ नम्रतापूर्वक म्हणतात,

''ते भोगावरी न विटती। त्यागावरी न उठती।

आपुलिमे सहजा स्थिती। स्वये वर्तती सर्वशी॥''(पृ ३०२)

थोडक्यात संताना भोग आणि त्याग समान असते. प्रंपच आणि परमार्थ त्याच्या जीवास एकरूप.......... रूढी भक्त.

नाथांचे हे 'एकनाथी भागवत' म्हणजे भागवत धर्माच्या मंदिराचा आधारस्तंभ आहे त्यामुळेच 'खांबदिला भागवत' ही बहिणाबाईंची उक्ती सार्थक ठरलेली आहे.

**३) रूक्मिणीस्वयंवर:**

प्राचीन मराठी वाङ्मयात जी स्वयंवर काव्ये लिहिली गेली त्यात अत्यंत लोकप्रिय असलेले काव्य म्हणून एकनाथांच्या 'रूक्मिणी स्वयंवर' या काव्याचा उल्लेख केला जातो. श्रीकृष्णभक्ती, श्रीकृष्ण अध्यायबोध, व समाजचित्र, श्रीकृष्ण रूक्मिणीच्या स्वयंवर सोहळयाची विविध वर्णने यादृष्टीने हे काव्य महत्वाचे आहे.

या काळात १८ प्रसंग असून १७१२ त्यांची ओवीसंख्या आहे. भागवताच्या दहाव्या स्कंधातील ५२ ते ५४ अध्याय प्रमुख आधाराला घेतलेले आहे. 'हरिवंश' आणि 'विष्णुपुराण' या ग्रंथाचा आधारही नाथांनी घेतला आहे.

या ग्रंथाच्या पहिल्या सहा प्रसंगात, रूक्मिणी हरणापर्यंतचा मुख्य कथाभाग आहे. ७ ते १२ अध्यायापर्यंत युध्दवर्णने आहेत. १३ व्या प्रसंगापासून शेवटी १८ व्या प्रसंगापर्यंत विवाह वर्णनाचा भाग आढळलेले मुळास्थित प्रश्लोकाच्या आधारावर एकनाथांनी ६०० ओव्या लिहून त्यांनी त्यांची कल्पकता दाखविली आहे.

संत एकनाथाच्या 'रूक्मिणी स्वयंवर' काव्यातील रूक्मिणी कशी आर्त भक्त आहे ते सांगताना डॉ. बी.एन.पाटील म्हणतात,

"संत एकनाथाच्या स्वयंवरातील रूक्मिणी ही एक आर्त भक्त आहे. तीची अवस्था दासाची, भक्ताची आहे. नाथांनी अचूक बोलक्या शब्दातून मनोबेधक भावचित्र साकारले आहे. रूक्मिणीच नव्हे तर वाचकही त्या अवस्थेत जातो.''

**४) भावार्थ रामायण:**

संत एकनाथांनी वाल्मिकी रामायण, अध्यात्मरामायण, रामकथेवरील विविध नाटके, गीता भागवत, योगवसिष्ठ इ. ग्रंथांचा आधार घेऊन हा ग्रंथ लिहिला आहे.

या ग्रंथात एकूण २९७ अध्याय असून ४० हजार ओव्या आहेत. हा नाथांचा शेवटचा ग्रंथ मानला जातो. युध्दकांडाच्या ४४ व्या अध्ययापुढचा जवळजवळ १/३ ग्रंथ गावबा नावाच्या त्याच्या शिष्याने पूर्ण केला अशी आख्यायिका आहे. नंतर लिहिलेला भक्तमार्ग मूळ कथेशी

आधी............. झेपामूळे जोडला गेलेला आढळतो. एकनाथांच्या अध्यात्मावर लेखनाचा प्रयत्न ..........................ग्रंथात येतो.

रामकथेच्या निम्मित्ताने एकनाथांनी तत्कालीन समाजाचे समाजजीवनही रेखाटले आहे. हनुमान सीतेच्या शोधासाठी सारी लंका शोधली तिथे त्याला भक्तिहिन कर्मट ब्राम्हण, मरणभय बाळगणारे नामर्द मंडळी, गर्विष्ठ क्षत्रिय वित्तलोलुप वेश्या... अशा सर्व समाजद्रोही लोकांचे वर्णन या ग्रंथात दिसून येते.

संत एकनाथांना 'भावार्थ रामायण' लिहिण्यास श्रीरामानेच प्रवृत्त केले. त्यांनीच आपल्याकडून हे लेखनकार्य करून घेतल्याचे नाथ कथन करतात. नाथ म्हणतात,

''श्रीराम कथेचा गुह्र्यार्थ। यर्थार्थ वदनी रघुनाथ।

माझे हाती लेखनी दौत। कथा लिहिवीत श्रीराम॥

माझे दृष्टीचे देखणेपण। श्रीराम होवो नि आपण।

दावी कथा निरूपण। जागृती स्वप्न सुषुप्ती॥''

यावरून हेच स्पष्ट होते की, हा ग्रंथ लिहिताना नाथ कसे 'राममय' झाले होते ते दिसून येते.

या ग्रंथाविषयी डॉ. शं.गो.तुळपुळे म्हणतात, "देवांचे बंद विमोचन करून रामराज्यांचीही गुढी उभारावी, स्वधर्माला आलेली ग्लानी दूर करून त्यांचे पुनरूत्थापन करावे, दृष्टाचे निर्दालन करून गोब्राम्हणाचे संरक्षण करावे, देवद्रोही, विश्वद्रोही, ब्रम्हद्रोही अशा रावणाला निपटून रामराज्य स्थापावे अशा अर्थाचा विचार रामायणात नाथांनी कमीत कमी पन्नास वेळा व्यक्त केले आहेत. ते इतके स्पष्ट आणि रोकडे आहेत की ते वाचताना रामदासांच्या पावलांची चाहूल कोणालाही लाभावी.''

**५) संत एकनाथांची अभंगवाणी:**

महाराष्ट्रातील संतांनी जी विपूल रचना केली ती अभंग या काव्यप्रकारातच केली आहे. संत ज्ञानदेव, नामदेव या संतांप्रमाणेच संत एकनाथांनीही अभंग लिहिले आहेत. एकनाथांची अभंगगाथा म्हणून प्रसिध्द आहे. नाथांच्या अभंगवाणीत सुमारे साडे चार हजार अभंग आहेत. त्यांच्या अभंगवाणीत – संत महिमा, पंढरी महिमा, विठ्ठल महिमा, भक्ती, नीती, उपदेश, समाजोपदेश... इत्यादी विविध विषयावर त्यांची अभंगगाथा लोकप्रिय झाली आहे.

अभंगगाथेतील वंदनपर अभंगात नाथ प्रार्थना करतात,

"ओम सद्गुरू निर्गुणा। पार नाही तव गुणा।

बसेनि माझिया रसना। हरिगुणा वर्णवी॥१॥

हरिगुण विशाल पावम। वदवी तू कृपा करून।

मी मूखमती दिन। म्हणो कि किंव भाकितसे॥२॥

तुमचा प्रसाद जाहलिया पूर्ण। हरिगुण वर्णीनी मी जार्ण।

एका वंदितसे चरण। सद्गुरू आदरे ॥"

(श्री सकलसंतगाथा, एकनाथ – अ.१)

संत एकनाथांनी प्रथम उपास्य देवतांना वंदन केले आहे. त्यांच्या जीवनात देवतांपेक्षा "गुरूला" सर्वश्रेष्ठ स्थान आहे. म्हणूनच त्यांनी 'एका जनार्दनी' ही नाममुद्रा स्विकारली.

वारकरी संप्रदायात सर्वच संतांनी श्री विठ्ठल आणि पंढरपूर किंवा पंढरीला फारच महत्वाचे स्थान दिलेले आहे. संत एकनाथांनीही श्री विठ्ठल महिमा आणि पंढरी महात्म्य गायले आहे. विठ्ठलाचे वर्णन करताना नाथ म्हणतात,

"विठ्ठलासी गाय विठ्ठलासी ध्याय।

विठ्ठलासी पाहे वेळोवेळा ॥१॥

विठ्ठल विसावा सोडवण जीवां।

म्हणोनी त्याच्या गावा जावे आधी ॥२॥

विठ्ठल वाचोनि सोयरा जीवलगा। विठ्ठलाचे मार्ग जपा आधी ॥३॥

एका जनार्दनी विठ्ठलवाचोनी। दुजा नेणे स्वप्नी संग काही ॥४॥"

(श्री सकलसंतगाथा – एकनाथ. ६९६)

पंढरीचे महात्म्य गाताना नाथ म्हणतात-

"माझे माहेर पंढरी। आहे भीवरेचे तीरीं ॥१॥

बाप आणि आई। माझी विठ्ठल रखूमाई ॥२॥

पुंडलिक बंधू आहे। त्याची ख्याती सांगूं काय ॥३॥

माझी बहिण चंद्रभागा। करीतसे पाप भंगा ॥४॥

एका जनार्दनी शरण। करी माहेरींची आठवण ॥५॥"

(श्री सकलसंतगाथा एकनाथ अ. ४३४)

अशाप्रकारे संत एकनाथांनी आपल्या अभंगगाथेमध्ये विठ्ठल महिमा आणि पंढरी महात्म्य गायले आहे. नाथांच्या अभंगवाणीचा गौरव करताना प्रा.रानडे लिहितात, ''नाथांचे इतर ग्रंथ बुध्दिवादाचे, पण अभंग अनुभवप्रधान आहेत. संत एकनाथांची अभंगवाणी सरस आहे. नाथांची नैतिक, पारमार्थिक, अध्यात्मिक उंची त्यांच्या अभंगवाणीत अनुभवायला मिळते. कधीही भंग न पावणारी नाथांची अभंगवाणी, त्यांची अभंगगाथा होय.''

**६) संत एकनाथांची भारूडे:**

'भारूडे' हा प्राचीन मराठीतील एक दर्जेदार काव्यप्रकार आहे. ज्ञानेश्वर - नामदेव यांनीही भारूडे लिहिली. पण भारूड लेखन वैशिष्टयपूर्ण बनविण्याचे कार्य संत एकनाथांनी केले. संत एकनाथांनीच 'भारूड' हा काव्यप्रकार अत्यंत लोकप्रिय केला.

एकनाथांनी सुमारे १२५ विषयावर भारूडे लिहिली असून आज त्यांची संख्या सुमारे ३०० पर्यंत आहे.

**'भारूड' शब्दाचा अर्थ:**

**१) महाराष्ट्र भाषा कोष:**

'सांगू लागले असता, एकाएकी संपावयाचे नाही आणि समजून

येणा-यांसही एकाएकी पूर्वापार संधान जुळून आकलन होवू नये, असे जे लांबच लांब सांप्रत झालेले वर्तमान किंवा पुरातन कवींनी बांधलेली कथाशाख गोष्ट आहे.''

**२) आचार्य विनोबा भावे:**

भार गूढ म्हणजे भारलेले गूढ कुट शैलीचे गाणे असा व्युत्पत्ती अर्थ सांगितला आहे.

**३) कै. ल.रा. पांगारकर:**

भारूड म्हणजे ''बहुरूढ' लोकप्रिय गीत. भारूडांना कोणी गारूडही म्हणतात. 'गारूड' म्हणजे चमत्कृतीजनक, अद्भुतकाळ. भारूडात अद्भुतपणा असतो. समाजातील चालीरीती वर टीका असते. बोध ही असतो. इत्यादी अनेकांनी भारूडांची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

संत एकनाथांनी आपल्या भारूडांत समाजातील रूढ प्रथा, परंपरा, चालीरीती, देवदेवता, व्रतवैकल्ये तसेच ज्यांना लोकसंस्कृतीचे उपासक मानले जाते असे भुते, वासुदेव, जोशी, दरवेशी, पांगुळ, अंधळा... इत्यादी भारूड रचनेतून साकारले आहे. तसेच साप, विंचू, गाय, एडका असे प्राणीही त्यांच्या भारूडांचे विषय झाले आहेत.

संत एकनाथाच्या 'जोशी' या भारूडाचे विवेचन करताना डॉ. बी.एन.पाटील म्हणतात, "संत एकनाथांच्या 'जोशी' या भारूडातील जोशी हा होरा सांगणारा विवेकी आहे. त्याच्या निवेदनात, कथनात समाजाविषयी तळमळ आहे. "माझा शकून ऐका हो भाई ॥" अशी त्याची विनम्र विनवणी आहे. चार वेद, सहा शास्त्रे ज्याचे गुणगान करतात, त्या परमेश्वराची भक्ती करण्याचा उपदेश जोशी करतो. जीवनात आड वाटेने जाऊ नका. आड वाटेने जाऊन चक्रात अडकवून, ठेचखाऊन पडू नका. जोशीने सांगितले होरा ऐकण्याने, परमेश्वराचीच भक्ती केल्याने, फे-यात पडणार याचा सारासार विवेकाने विचार करण्याचेही 'जोशी' सांगतो.''

संत एकनाथाचे अत्यंत प्रसिध्द भारूड म्हणजे 'विंचू चावला' हे भारूड होय. नाथांनी माणसांना एक विखारी इंगळी संबोधले आहे. बिचवापेक्षा इंगळी जास्त विषारी असते. त्या

munotes.in

इंगळीने माणसाला डंख मारला म्हणजे माणसाच्या ठिकाणी जे सहाविकार आहेत, ते इंगळी रूपाने विषारी आहेत. त्या विषाला उतरविण्यासाठी 'सत्वगुण' अंगारा लावा असे नाथ या भारूडामध्ये म्हणतात.

उदा.

विंचू चावला। वृश्चिक चावला। काम, क्रोध विंचू चावला।

तम घाम अंगासी आला ॥धृ॥

पंचपाढा व्याकुळ झाला ॥ लागे माझा प्राण चालला।

सर्वांगाचा दाह झाला ॥१॥

मनुष्य इंगळी अति दारूण। मज नांगा मारला तिने।

सर्वांगी वेदना जाण। त्या इंगळीची ॥२॥

या विंचवाला उतारा। तमोगुण मागे सारा।

सत्वगुण लावा अंगारा। विंचू इंगळी उतरे झरझरा ॥३॥

सत्य उतारा देऊन। अवघा सारिला तमोगुण।

किंचित राहिली फुणफुण। शांत केली जनार्दने ॥४॥

(श्री संतगाथा, एकनाथ, अ.३७९०)

अशाप्रकारे संत एकनाथांनी जी बहुविध भारूडे लिहिली त्यातून त्यांनी मनोरंजनातून समाजप्रबोधनच करण्याचा प्रयत्न केला.

**७) संत एकनाथांच्या गौळणी, विरहिणी:**

संत एकनाथांची भारूडे जशी लोकप्रिय आहेत तशीच त्यांनी लिहिलेल्या गौळणीही लोकप्रिय आहेत. नाथांच्या गौळणीतून प्रामुख्याने राधा-कृष्ण, गोपी-यशोदा यांच्याविषयीची भक्तीच दिसून येते. श्री वसंत जोशी 'गौळणी' या काव्यप्रकाराविषयी जे लिहितात त्यातून या काव्यप्रकाराची महती पटते. ते लिहितात, "अभंग रचना करणारा कवी गौळणी रचतो. परंतु गौळणीतील मुग्ध शृंगार, वात्सल्य, मधुराभक्तीच्या छटा, संतांच्या जीवांच्या जीवलगांशी जवळीक साधतात. लौकीक प्रेमभावनेचा मधूर आविष्कार गौळणीच्या रूपाने त्यांना घडविता येतो."

संत एकनाथांच्या गौळणीही विविध स्वरूपात लिहिलेल्या दिसतील. त्याही अत्यंत साध्या-सोप्या भाषेत असल्यामुळे फारच मनोहर झाल्या आहेत. वाचकांनाही त्यातील चित्रमयता विशेष लक्षात राहते उदा.

१) "वारियाने कुंडल हाले । डोळे मोडित राधा चाले ॥१॥

राधाला पाहून भुलले हरी । बैल डुहितो आपुले घरी ॥२॥

हरिला पाहून भुलली चित्रा ।

राधा घुसळी, खडबडी ऐश रिता ॥३॥

२) मन मिळालेसे मना । एका भूलान जनार्दना ॥४॥

तुझी संगती नाही कामाची । मी सुंदरा कोवळया मनाची ।

कसे वेड लागी, कान्हा गौळीया ।

माझा वंश आहे मोठयाचा तू तव यतिहीन गवळयाची ॥

ऐक्य जालीया नावरूपाखचा ठावासि पुसालिया ॥१॥''

अशाप्रकारे साध्या सोप्या भाषेतून संत एकनाथांच्या मनात असणारे राधाकृष्णाविषयीचे प्रेम आणि भक्ती व्यक्त झालेली दिसते.

**विरहिणी:**

संत एकनाथांच्या 'विरहिणी' विषयी विवेचन करताना डॉ. बी.एन.पाटील लिहितात, ''वारकरी संताचा विठोबा, श्रीकृष्णाचेच रूप असून संतांची सर्व नाती त्यांच्याशी एकवटलेली आहेत. संतांना श्रीकृष्ण भक्तीचे वेड लागले असून, अहर्निश त्याचाच वेध लागलेला होता. त्यांचे जीवन कृष्णमय झालेले होते. कृष्ण हाच त्याचा 'आत्मा' असल्याने, आत्म्यापासून शरीर विभक्त राहू शकत नाही. तद्वत कृष्णाचा क्षणिक विरह, वियोग, दुरावा ते सहन करू शकत नाही. त्यांच्या ठिकाणाचा विरहार्तभाव, उत्करती, आशा, तृष्णा, ओढ, वेध इत्यादी मनोभाव संत एकनाथांनी त्यांच्या 'विरहिनी' काव्यातून व्यक्त केलेले आहेत. भक्ताला परमेश्वराची अनावर ओढ असते या वियोग, विरहातून निर्माण होणारी विरहार्तता विरहिणी असते ती एक 'विराणी' असते. नाथांनी राधा, गोपी यांना श्रीकृष्णाचा क्षणिक विरह सहन होत नाही. त्याची अवस्था, भावस्थिती विरहिणीतून वर्णन केली आहे.

**उदा.:**

"वेधला जीव माझा भेटवा श्रीरंगा । सर्व सांडियेल मोह ममता संघ

जिवी जीवलग जाला अभंग । भेटता भेटवा मज श्रीरंग ॥"

अशाप्रकारे नाथांच्या या विरहिणीतून आर्त भक्तीच व्यक्त होताना दिसते.

**८) एकनाथ पंथक:**

संत एकनाथ आणि त्यांचे समकालीन असलेले दासोपंत, रामाजनार्दन, जर्ना जनार्दन, विठा रेणुकानंदन या पाच जनांचा उल्लेख नाथपंचकामध्ये केला जातो.

एकनाथ पंथकाच्या कार्याविषयी लिहिताना डॉ. ह.श्री शेणोलिकर म्हणतात, ''रामाजनार्दनांनी लिहिलेली आरती ज्ञानराजा । महा कैवल्य तेजा ॥'' ही संत ज्ञानेश्वरांची आरती प्रसिध्द आहे. त्यामधील 'प्रगट गृहय बोंध । विश्व ब्राम्हणी केले॥' यासारख्या चरणातून ज्ञानेश्वरांच्या विचारसरणीत मुरलेला असा कवी असावा असे वाटते.

दुस-या अनंत भूजांच्या आरतीतील "आरती अनंतभूजा । विठो पंढरी राजा ॥" या उद्गारावरून तो वारकरी पंथीय विठ्ठलभक्त दिसतो. विठा रेणुकानंदन हे देवीभक्त असून त्यांची पायसान पदेच काय ती उपलब्ध आहेत.

दामाजीप्रमाणेच दुष्काळात धान्य लुटविण्यामुळे जनी जनार्दनांना विजापूरच्या बादशहाने हत्तीच्या पायी देण्याची शिक्षा फर्माविली. पण त्या प्राण्याने त्यांना काहीही केले नाही. तेव्हा आपल्या वंशजानीही यवनाची सेवा करू नये, अशी शपथ घालून जनी जनार्दनांनी पश्चाताप वृत्तीने बादशहाची नोकरी सोडून दिली आणि ईश्वराचरणी आपली लेखनी वाहिली. त्यांनी 'निर्विकल्प' (ओव्या ७१६) नावाचा उध्दवकृष्णसंवादरूप अध्यायग्रंथ लिहिला आहे शिवाय 'महावाक्य विवरण' हे वेदांती प्रमाण, 'सीतास्वयंवर' हे पौराणिक आख्यान आणि वेदांतपर व रामकृष्णचारित्र्यावर अशी हिंदी शे-दिडशे पदे इतकी रचना…………… आहे. नाथांच्या गायेतील जनार्दनस्वामींचे अभंग या जनी जनार्दनाचेच असावेत. या पंचकातील जनी जनार्दन हे एकच तेवढे ग्रंथरचलेले वळण व त्यातील बोध या दृष्टीने नाथांच्या जवळ बसू शकतात.

पुढील ओव्यांवरून त्यांच्या विवेचनाचे समन्वयवादी स्वरूप कळून येईल,

"चांडाळाशी घेय बोध । येणे नासती भेदाभेद ।

ज्ञानियासी उपजे प्रबोध । ऐसे सांगितले उध्दवा ।

करावा बुध्दीचा प्रकाश । अवघा देव हा उपदेशू ।

परंतु वर्णावर्णाचा नाशू करू नये ।

जो आचार विचार भंगल । तो कर्मचांडाळ जाला ।

आलवून सर्व जानावे । परंतु आचरावे न भंगावे ॥"

रामाजनार्दन, जनी जनार्दन या नावावरून हे दोघे एकनाथांचे गुरू बंधू असावेत असे वाटते. पण त्यांच्या नावातील जनार्दन हा उल्लेख जनार्दनस्वामीबद्दल नाथ याबद्दल खात्रीचा पुरावा मिळत नाही.

## ३अ.५ समारोप

अशाप्रकारे वरील विवेचनावरून बहामनी राजवट, एकनाथकालीन महाराष्ट्र तमोयुग, संत एकनाथ आणि त्यांचे एकनाथपंचक याविषयी थोडक्यात माहिती आपण पाहिली.

## ३अ.६ प्रश्नावली

१) संत एकनाथांच्या वाङ्:मयाचा परिचय करून द्या.

२) मध्ययुगीन कालखंडांतील संत एकनाथाच्या काव्याचे स्वरूप स्पष्ट करा.

३) बहामनी कालीन राजवटीची माहिती देऊन एकनाथकालीन महाराष्ट्राचे वर्णन करा.

**टिपा लिहा.**

१) संत एकनाथ कालीन गौळणी, विरहिणी

२) एकनाथांची ग्रंथरचना

३) एकनाथांची भारूडे

## ३अ.७ संदर्भग्रंथ


- ल. रा. नसिराबादकर - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास.
- ह. श्री. शेणोलिकर- प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप.
- ना. देशपांडे- अ. ना. देशपांडे


*****

munotes.in

# ३ब

## शिवकालीन महाराष्ट्र

**घटक रचना**

३ब.१ उद्देश्य

३ब.२ प्रस्तावना

३ब.३ ब) शिवकालीन महाराष्ट्र, स्वराज्य प्रेरणा

३ब.३.१ शिवकालीन वाङ्:मय

३ब.३.२ संत तुकाराम

३ब.३.३ संत तुकारामांची अभंगगाथा

३ब.३.३.१ आत्मचरित्रपर अभंग

३ब.३.३.२ विठ्ठलभक्तीचे अभंग

३ब.३.३.३ सामाजिक अभंग

३ब.३.४ संत तुकारामांचे शिष्य यांचे वाङ्मय

३ब.३.४.१ बहिणाबाई

३ब.३.४.२ संत निळोबा

३ब.४ समारोप

३ब.५ प्रश्नावली

३ब.६ संदर्भग्रंथ

**ब) शिवकालीन महाराष्ट्र : स्वराज्य प्रेरणा, तुकाराम, तुकारामाचे शिष्य यांचे वाङ्:मय**

**प्रस्तावना:**

मध्ययुगिन मराठी वाङ्:मयाच्या इतिहासाकडे 'वारकरी पंथियाचे वाङ्:मय याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण संत साहित्यामध्ये वारकरी पंथियांचे वाङ्:मय आणि त्यांचे सामाजिक कार्य आजही प्रेरणा देणारे असेच आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींनी भागवत धर्माचा पाया रचला. आणि त्यामुळेच त्यांच्या काळापासून अनेक जातीचे संत मंडळी एकत्र आली. त्यात संत ज्ञानेश्वरांचे समकालीन संत नामदेव, संत गोरा कुंभार यांचा उल्लेख करता येईल. त्याचबरोबर संत जनाबाई, संत एकनाथ, संत सावता माळी, संत तुकाराम इत्यादी अनेक संत वारकरी संत म्हणून ओळखले जातात. तसेच या पंथातील संतांनी लिहिलेल्या वाङ्:मयाला 'वारकरी पंथियांचे वाङ्:मय' म्हणून ओळखले जाते.

राजवट, एकनाथकालीन महाराष्ट्र, तमोयुग, एकनाथ, एकनाथ-पंचक, यांचे वाङ्:मय तसेच शिवकालीन महाराष्ट्र, स्वराज्य पेरणा, तुकाराम, तुकारामांचे शिष्य यांचे वाङ्:मय यांचा थोडक्यात विचार आपण करणार आहोत.



munotes.in

## ३ब.२ प्रस्तावना

बहामनी सत्तेचे ५, ६ तुकडे होऊन पाच 'शाह्या' प्रस्थापित झाल्याचे आपण पाहिले. या सत्तेचे पाच तुकडे झाल्यावरही मराठा सरदार मात्र सेवा करण्यातच धन्यता मानीत होते. यादव, निंबाळकर, सावंत, सुर्वे, जाधव, भोसले अशी अनेक घराणे बहामनी अमदनीतच पराक्रम करीत होती. मराठे सरदारांना आपले स्वतंत्र, स्वराज्य स्थापन करावे अशी भावना निर्माण झाल्याचे दिसत नाही. मुसद्ध्यानी सत्तेतच जाधवांनी पराक्रम केल्याचे इतिहासात नोंद आहे. 'परंतु हेच मराठे जर डोईजड होऊ लागतात त्यांची वतने काढली जात किंवा त्यांचा नॅश केला जात असे. त्यामुळे मग मराठे एक शाही सोडून दुसऱ्याकडे आश्रयाला जात असत, असे डॉ. बी. एन. पाटील म्हणतात.

## ३ब.३ शिवकालीन महाराष्ट्र व स्वराज्य प्रेरणा

मुसलमानी राजसत्तेच्या काळात महाराष्ट्रत हिंदूंवर अनेक अत्याचार केले गेले. त्यांचा अतोनात छळ करत होते. याची बाल शिवाजीला येणं स्वाभाविक होतं. "शिवाजी महाराज बालपणी बेंगलोरला असताना, शहाजी महाराजांकडे असताना त्यांनी वडिलांची नेतृत्वशक्ती व सत्तेचा वापर करण्याची पद्धती जवळून पाहिली. युद्धशास्त्राचे प्रात्यक्षिक पाहायला मिळाले. लढाईचे डावपेच शिकता आले. या सर्व बाबींचा परिणाम शिवाजी महाराजांचे नेतृत्व उभे राहण्यात झाला." असे 'मराठ्यांचा इतिहास' या पुस्तकात डॉ. धये आणि डॉ. टाकले लिहितात. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे मोठेपणी शिवाजी महाराजांच्या जे विविध गुणकौशल्ये दिसून आली त्यामुळे त्यांच्यापुढे कोणत्याही शत्रूचा निभाव लागत नाही.

शिवकाळात मुसलमानांचा वाढत अन्याय अत्याचार पाहून सामान्य माणसाच्या मनात दहशत धडकी भरलेली होती. त्यावेळी अवस्था सांगताना डॉ. वि. का. राजवाडे लिहितात, "हिंदू बाटवले गेले, देवळे मोडली गेली, देव फोडले गेले, बायका भ्रष्ट केल्या, साधुसंत छळले गेले, देवळांच्या मशिदी झाल्या, घरांचे दर्गे बनले, राऊळांचे महाल झाले, धर्म केवळ लोपून गेला." ही भयाण अवस्था पाहून, या मराठी माणसांच्या स्वाभिमानासाठी, धर्माभिमानासाठी कोणीतरी प्रबळ असा हवा होता तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने मराठी माणसांना मिळाला. रायरेश्वराला स्वातंत्र्यासाठी शपथा घेतल्या गेल्या. मराठी मातीसाठी, मराठी माणसांसाठी रक्त सांडणार तरुण छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर होता. त्यामुळे त्यांना मोठा आधार मिळाला. मुसलमानांच्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम याच काळात सुरुवातीस घडले.

या काळात शेतकऱ्यांनीही फारच बिकट अवस्था होती. दुष्काळामुळे सामान्य जनतेचे बेमालूम हाल होत होते. महाराष्ट्रातल्या खडकाळ, डोंगराळ भागातल्या शेतकऱ्यांची तर फारच दयनीय अवस्था झाली होती. त्यातच राज्यकर्ते वेगवेगळे कर आकारून त्यांची पिळवणूक करीत होते. या सर्वांना छेद देण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाने निर्माण झाले आणि यातूनच पुढे मराठी सत्तेचा उदय होत गेला. "आधी मनुष्य ओळखावे," "योग्य पाहून काम सांगावे ॥" या समर्थांच्या उक्तीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी जीवाला जीव देणार माणसे ओळखली. त्यांना आपलसं केलं. तानाजी, नेताजी,

मोरोपंत, हंबीरराव मोहिते इत्यादी कणखर माणसे सोबत घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्याचा प्रयत्न केला. जातीपातीच्या मूठमाती देऊन राष्ट्रनिष्ठ माणसे एकत्र करून छत्रपतींनी स्वराज्याचा पाय घातला. म्हणून ग्रांट डक म्हणतो, " देश जिंकण्याच्या संदर्भात मराठे हे आमचे पूर्वज असून त्यांची सत्ता हळूहळू बाळाने वाढत असता त्यांना दिगंत कीर्तीचा 'शिवाजी भोसले' हा लोकनेता लाभला."

याच छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली महाराष्ट्रात छत्रपती शिवाजीराजांच्या नेतृत्वाखाली नवे युग निर्माण झाले त्यालाच 'शिवकाळ' संबोधण्यात आले.

### ३ब.३.१ शिवकालीन वाङ्‌मय:

छत्रपती शिवाजी महारांजांच्या काळात दोनच महान व्यक्तींनी वाङ्‌मयात प्रभाव गाजविला. एक संत तुकाराम महाराज आणि दुसरे समर्थ रामदास स्वामी. शिवकालीन वाङ्‌मयाच्या भरभराटीविषयी सांगताना डॉ. श्री. व्यं. केतकर म्हणतात, " छत्रपती शिवाजींचा काळ म्हणजे संत तुकोबा आणि समर्थ रामदास यांच्या परमार्थाचा काळ होय. दोन महान संतांचा, संप्रदायिकांचा, धार्मिक उत्थापनाचा, समाज जागृतीचा, प्रबोधनाचा काळ होय. शिवकाळात अनेक संत महंत झाले, त्याचप्रमाणे विद्वान पंडित झाले. मोठ्या प्रमाणात वाङ्‌मयनिर्मिती झाली. शिवकालीन वाङ्‌मयनिर्मितीविषयी डॉ. केतकर पुढे म्हणतात, "शिवाजी महाराजांच्या काळामध्ये जितकी मोठी उच्चं प्रकारची ग्रंथोपत्ती झाली, तितकी केव्हाच झाली नाही. सुंदर, गोड व सोप्या ओव्या लिहीणाऱ्या मुक्तेश्वराच्या महाभारुडापासून थोडी जरी डोकेफोड करावयास लावणारे यथार्थ दलेले सारखे ग्रंथ याच काळात झाले. त्याचप्रमाणे याच काळात बखरी वाङ्‌मय तयार होऊ लागल्या, ऐतिहासिक पोवाडे तयार झाले. शृंगारिक संस्कृत काव्यांची भाषांतरे आणि स्वतंत्र शृंगेरीक कविता यांच्याकडे लोकप्रवृत्ती झाली. "

अशाप्रकारे शिवकाळात वाङ्‌मयाच्या दृष्टीने अत्यंत पोषक असेच वातावरण होते असे म्हटले तर वावगे ठरू नये. म्हणूनच शिवकाळातील वाङ्‌मयाचे स्वरूप विशेष सांगताना डॉ. बी. एन. पाटील म्हणतात, " छत्रपती शिवाजी महाराज काळात वाङ्‌मयाच्या विचाराचा प्रारंभ प्रामुख्याने शहाजीराजांपासून केला जातो. शिवकाळात संत, पंत तसेच तुकोबा ही महाराष्ट्राची संत भूषणे त्यांच्या काळातच झाली आहे.

त्यांच्या संप्रदयिक प्रसार, प्रचार कार्यांन्वये महाराष्ट्र संस्कृतीला एक वेगळे स्फुरण प्राप्त झाले. 'संत हे राजाचे भट नव्हते.' राजांनी संतांचा आदर केला आहे. समर्थांना राजगुरू संबोधण्यात येते. संतांचे त्यांच्या अनुयायांचे वांङमयीन कार्य शिवकाळात अलौकिक असून अत्यंत समृद्ध आहे."

वरील विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे शिवकाळ हा मराठी वांङमयासाठी दर्जेदार वांङमयनिर्मिती झालेला कालखंड मानवा लागेल. या कालखंडात दोन महान सत्पुरुषांचे वांङमय जगप्रसिद्ध आहे. ते एक संत तुकाराम आणि समर्थ रामदास. याच काळात विशेष प्रभाव गाजवणारे जगविख्यात संतकवी तुकाराम महाराजांच्या काव्य - कर्तृत्वाचा थोडक्यात आढावा घेऊ.

## ३ब.३.२ संत तुकाराम:

वारकरी संप्रदायामध्ये संत तुकारामांचे कार्य अतुलनीय आहे. संत ज्ञानेश्वरांनी ज्या भागवत धर्म मंदिराचा पाय रचला त्याचा कळस होण्याचे भाग्य संत तुकारामांना लाभले ते त्यांच्या कर्तुत्वामुळेच !

### संत तुकाराम चरित्र:

अशा या संत तुकारामांचा जन्म मोऱ्यांच्या कुळातील 'अंबिले' घराण्यात इ. स. १६०८ साली देहू येथे झाला. इंद्रायणी काठी असलेल्या त्यांच्या घराण्यातील मूळ पुरुष विश्वांभरबाबा हे होते. त्यांच्या घरी नित्यनेमाने केली जात असे. असे सांगितले जाते कि, विश्वांभरबुवाना देवाने दृष्टांत दिला की "तुला आता पंढरीस येण्याची आवश्यकता नाही. मीच तुझ्या गावात राहावयास आलो आहे. "त्यांना झालेल्या दृष्टांतानुसार आंब्याच्या वनात, शेतात विठ्ठल - रखुमाईची मूर्ती जमिनीत सापडली. त्यांनी गावात विठ्ठलमूर्तीची स्थापना केली.

अशा या विठ्ठलभक्तीचा थोर वारसा लाभलेल्या घराण्यात बोल्होबा आणि कनकईच्यापोटी जन्म झालेल्या तुकोबांकडे हा भक्तीचा वारसा असा परंपरेने आला होता. तुकोबांचे वडील कुणबी असल्याने स्वतःचा व्यवसाय आणि सावकारी त्यांच्याकडे होती. संत तुकोबांचा मोठा भाऊ सावजी हा विरक्त वृत्तीचा असल्याने कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी तुकोबांवर पडली. नंतरच्या काळात तुकोबांचा विवाह रखमाबाईशी करण्यात आला. रखमाबाई व तुकारामांना 'संतू ' नावाचा एक मुलगा झाला.

तुकोबांचे घराणे प्रतिष्ठित, श्रीमंत होते. घराण्यात चालत आलेली महाजनकी होती त्यामुळे त्यांच्या घराण्यात सर्व प्रकारची सुबत्ता होती. तुकोबांच्या घराण्याविषयी श्री. गो. शं. राहिरकर जे लिहितात ते, "तुकोबांच्या जातीकडे पाहावयाचे तेव्हा ते जन्मतः मराठा क्षत्रिय होते. त्यांचा व्यवसाय वैश्य व शेतकी कुणबिकीचा होता. जुन्या हिंदू धर्मात जातीप्रमाण्य ध्यानात येण्याला त्या कुळाचे सांसारिक संबंध कोठे झाले ते पाहणे महत्त्वाचे असते. तुकोबांचे पूर्वजांचे सर्व सांसारिक संबंध क्षत्रियकुळाशी, घराण्याशी झालेले आहेत.

'बरे कुणबी केलो | नाही तरी दंभेची असतो मेलो ॥

असा स्वतःच तुकोबांनी आपल्या जातीचा उल्लेख केला आहे.

"वयाच्या १७ -१८ वर्षांपासून तुकोबांचे जीवनात दुःखाचे डोंगर कोसळू लागले. आई-बाप वारले, भावजय वारली, थोरला भाऊ तर अगोदरच विरक्त झाला होता. दुकानाचे दिवाळे निघाले. दुष्काळात सर्व गेले. पहिली बायको रखमाबाई व मुलगा संतू डोळ्यांदेखत अन्नान करीत मेली. संसाराची अशी वाताहत तुकोबांना अशी उघड्या डोळ्यांनी पाहावी लागली. दुसऱ्या पत्नीच्या जिजाईच्या कर्कशपणाने तुकोबांच्या उद्विग्नतेत भरच पडली. "हे डॉ. ल. रा. नसिराबादकर यांनी गरीबांचे केलेले वर्णन एखाद्या चित्रपटातल्या प्रसंगासारखे समोर घडल्यासारखे वाटते.

याच उद्विग्न अवस्थेत तुकोबांनी गावाबाहेरच्या भंडारा डोंगराचा आधार घेतला आणि ते हळूहळू ईश्वरचिंतनात रमू लागले. तुकोबा 'एकांताचे सुखअनुभवू लागले. मनी - मानसी विठ्ठलमय झाले.

**साक्षात्करी संत तुकाराम:**

संत तुकोबांनी भंडाऱ्यांच्या डोंगरावर एकांतात राहून परमेश्वराचेच, श्री विठ्ठलाचेच नामस्मरण करीत आपला दिवस घालविण्यात धन्यता मानली. त्यांनी विठ्ठलभक्तीचा केली. त्या विठ्ठलाच्या भेटीसाठी ते कासावीस झाले, बेचैन झाले.

"माझ्या मना लागो चाळा । पाहावया विठ्ठल डोळा ॥१॥

आणिक नाही चाड । न लगे संसार हा गोड ॥२॥

तरीच फळ जन्म आलो । सरता पांडुरंगी जालो ॥३॥

तुका म्हणे देवा । देई चरणांची सेवा ॥४॥

(संत तुकाराम गाथा क्र. २९६३)

अशाप्रकारे संत तुकोबांची विठ्ठलभेटीची आस दिसून येते.

संत तुकोबा भारनाथाच्या डोंगरावर पशु, पक्षी, झाडे, वेली यांच्या संगतीत, विठ्ठल भक्तीत तल्लीन होत असत.

'तुका म्हणे होय मनाशी संवाद ।

आपलाची वाद आपणाशी ॥

असे ते स्वतःच्या मनाशी संवाद साधत असत. तुकोबा विठ्ठलाशी, पांडुरंगाशी संवाद साधत. तुकोबांना परमेश्वरभेटीची असं लागली. ....

'वाटही पाहता । शिणले माझे डोळे । दाविसी पाऊले कैवो डोळा ॥' अशा विठ्ठलभेटीसाठी निकराची अवस्था तुकोबांची झाली. डॉ. बी.एन पाटील. सांगतात, ' सतत पंधरा दिवस परमेश्वराचा, विठ्ठलाच्या नामस्मरणाचा ध्यास लागला होता. ते अंतःकरणाने हरिनाम वेलीवर पक्षिराज झाले होते. त्यांची भगवदभक्ती निर्वाणीची होती. त्यांना राघवचैतन्य, केशवचैतन्य यांच्या परंपरेतील चैतन्याचा साक्षत्कार झाला. त्यांनी तुळशीमाळेचा जप करण्याचे सांगून 'रामकृष्णहरी' हा षडाक्षरी मंत्र दिला.

"नामदेव केले स्वप्नामाजी जागे । सवे पांडुरंग येवोनिया|सांगितले काम करावे काशिज्ञा ।"

या साक्षात्कारातूनच काशिज्ञा झाली. त्यांची वाणी अभंगरूपाने अभंगवाणी झाली. परमेश्वराच्या भक्तीत अंतर्मुख झालेल्या तुकारामांना गुरुकृपा लाभली. आत्मसाक्षात्कार झाला. त्यांच्या पारमार्थिक जीवनाचा प्रारंभ झाला. "अशाप्रकारे संत तुकोबांना साक्षत्कार होऊन विठ्ठलमय झाले. त्यांचे सर्व लौकिक अलौकिक झाले. तुकोबा एकांतातून पुन्हा लोकांतात आले. त्यांचे जीवन परोपकारी झाले. तत्कालीन विद्वान, शास्त्री, पंडित,

उच्च्वर्णीयांकडून त्यांना त्रासही सहन करावा लागला. परंतु त्यांनी आपल्या नामसाधनेच्या बळावर सर्व सुसह्य केले. 'अणुरेणिया थोकडा ।तुका आकाशाएवढा ॥१॥ असे ते विशाल अंतकरणाने झाले. 'जे जे भेट भूत । ते ते मानिजे भगवंत ', या ज्ञानेशांच्या उक्तीनुसार त्यांना अणुरेणूत परमेश्वर दिसू लागला. त्यांना सर्व चराचरात वित्तहानी दिसू लागला. त्यामुळे कितीही त्रास झाला तरी त्यांनी कोणाला दोष नाही दिला. त्यांनी आपला सर्व भर विठ्ठलावरच सोपवून दिला.

### ३ब.३.३ ॥ संत तुकारामांची अभंगगाथा ॥:

संत तुकारामांच्या साक्षात्कार झाल्यानंतर ...... "वाउगे निमित्त बोलो नको ॥ हाच विचार मनी - मानसी ठेऊन, आपले सर्वांचे चरणी अपूर्ण संत तुकारामांनी जी अभंगरचना केली ती अतुलनीय आहे. त्यांच्या अभंगगाथेत सुमारे पाच हजार अभंग आहेत. हे सर्व अभंग विठ्ठल भक्तीच्या निष्ठेतून लिहिले आहेत. त्यामुळे त्यांच्या अभंगात विविधता आलेली आहे.

तुकोबांनी जी काव्य रचना केली त्याचे सर्व श्रेय त्यांनी श्री विठ्ठलाला दिलेले आहे. त्यांच्या अभंगाचे प्रेरणास्थान श्री विठ्ठलच आहे. म्हणून अत्यंत विनम्रतेने तुकोबा म्हणतात, "करितो कवित्य म्हणाल हे कोणी । न हे माझी वाणी पदरीची ॥१॥ माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वबंधु बोलवितो ॥ २॥

काय मी पामर जाणे अर्थभेद । वदवी गोविंद तेचि वेद ॥ ३॥

निमित्त भरासी बैसविले आहे । मी तो काही नव्हे स्वामिसत्ता ॥ ४॥

तुका म्हणे आहे पाईकची खरा । वागवितो मुद्रा नामाची हे ॥५॥

(संत तुकाराम गाथा क्र. १००७)

अशा प्रकारे आपल्या सर्व कवित्याचे सर्व श्रेय तुकोबांनी विश्वम्भरास, विठ्ठलास दिले आहे.

संत तुकोबांच्या अभंगवाणीबद्दल सारस्वतकार श्री. वि. ना . भावे म्हणतात, "सोप्या व सध्या शब्दांनी मनावर ठसेल असा उपदेश करणे, तसेच प्रसंगी राग, द्वेष इत्यादी विकारांचे श्रोत्यांच्या मनावर काहूर उभे करणे, किंवा एखाद्या निंद्य गोष्टीची अवहेलना करून, तिजबद्दल तिटकारा उत्पन्न करणे, या सर्व गोष्टी त्यांनी (तुकोबांनी) आपल्या अभंगात साधल्या आहेत."

सारस्वतकार वि. ल. भावे यांच्या या विधानाबद्दल तुकोबांची अभंगवाणी कशी विविधतेने नटली आहे, हेच स्पष्ट होते.

**संत तुकोबांच्या अभंगातील विविधता:**

मराठी वंडगमयात संत तुकोबांच्याअभंगवाणीचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. कारण ती सर्वसामान्य माणसांच्या अंतःकरणाला जाऊन भिडण्याचे सामर्थ्य त्यांच्या अभंगवाणीत आहे. त्यामुळेच त्यांची अभंगगाथा आज आणि उद्याही 'अभंग'च राहणार यात कसलाही संदेह नाही. अशा संत तुकोबांच्या अभंगगाथेतील विविध प्रकारच्या अभंगांचा थोडक्यात विचार खालीलप्रमाणे करता येईल.

### ३ब.३.३.१ आत्मचरित्रपर अभंग:

तुकोबांची अभंगगाथा म्हणजे त्यांच्या जीवनाची कहाणीच आहे. सुख - दुःख त्यांच्या वाट्याला जे आले ते त्यांनी निर्भीड आणि प्रखरपणे मांडले आहेत. संत तुकोबांचे सुरुवातीचे आयुष्य जे सुख - समाधानात आनंदात गेले त्याचेही वर्णन तुकोबांनी आपल्या गाथेत केले आहे. आई वडिलांचे लाभलेल्या प्रेमाची माहितीही तुकोबांनी आपल्या आत्मचरित्रपर अभंगात गायलेली दिसते. उदा.

लागलीय मुख स्तना । आली पान्हा माउली ॥१॥

उभयता आवडी लाडे लाडे । कोंडे कोंडे पुरतसे ॥२॥

'सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे ॥२॥ या उक्तीप्रमाणेच तुकोबांच्या वारसातील हे सुखाचे क्षण फार काळ टिकले नाहीत. त्यांच्यात एकामागोमाग एवढे संकटे येऊ लागते. संकटाची मालिकाच चालू झाली. माता-पित्याचे निधन, पत्नी व मुलाचे निधन, मोठ्या भावाचे विरक्तीपण, दुष्काळ .... असा अनेक संकटाना तुकोबांना सामोरे जावे लागले. तरीसुद्धा त्यांनी परमेश्वराला दोष दिले नाही. उलट त्यांनी परमेश्वराचे, विठ्ठलाचे आभारच मानलेले दिसतात.

उदा.

"बरे झाले देवा निघाले दिवाळे| बरे या दुष्काळी पीडा केली ॥१॥

अनुयाये तुझे राहिले चिंतन । जय वमन संसार ॥२॥

बरे झाले देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनामध्ये ॥३॥

बरे झाले नाही धरती लालेलाल । बरा आलो तुज शरण देवा ॥४॥

(संत तुकाराम गाथा - अ. १९३५)

अशाप्रकारे आपल्यावर आलेली संकटे त्यांच्याकडे विनम्रपणे पाहण्याची विशाल दृष्टी तुकोबांची दिसते.

### ३ब.३.३.२ विठ्ठलभक्तीचे अभंग:

संत तुकोबांची अभंगगाथाच विठ्ठल प्रेमाने आणि भक्तीने भरली आहे. संपूर्ण अभंगावर तुकोबांचे विठ्ठल प्रेम आणि भक्ती कशी ओतप्रोत भरली आहे हे दिसून येते, कारण तुकोबांना 'बोलविता धनी' च विठ्ठल आहे. त्यामुळे विविध स्वरूपात त्यांनी विठ्ठलाची भक्ती केलेली दिसते. माता - पिता, बंधू, सखा, सोयरा, धायरा, उद्धारक .... असे सर्व काही श्री विठ्ठलच आहे. उदा.

"विठ्ठल गीती विठ्ठल चित्ती । विठ्ठल विश्रांती भोग जया॥॥

विठ्ठल आसनी विठ्ठल शायनी । विठ्ठल भोजनीं ग्रासोग्रासीं ॥२॥

munotes.in

विठ्ठल जागृती स्वप्न सुपुत्री ।न दुजे नेणती विठ्ठलेंविण ॥३॥

भूषण अलंकार सुखाचे प्रकार । विठ्ठल निर्धार जया नरा ॥४॥

तुका म्हणे ते हि विठ्ठल चि जाले । संकल्प मुरले दुजेपणे ॥५॥

(संत तुकाराम गाथा अ. ११२१)

अशाप्रकारे संत तुकोबांचे सर्वस्वच श्री विठ्ठल आहे. त्यामुळे विठ्ठलाच्या भेटीसाठी तुकोबांचे मन कासावीस झालेले दिसते. उदा.

"कन्या सासुरासी जाये । मागे परतोनि पाहे ॥

तैसे झाले माझ्या जीवा । कधी भेटीसी केशवा ॥

चुकलिया माये । बाळ वेळोवेळा पाहे ॥

तुका तैसा तळमळी । जगावेगळी मासोळी ॥"

अशाप्रकारे विठ्ठलाच्या भेटीसाठी तुकोबांच्या मनातील आर्तता आणि तडफड व्यक्त झालेली दिसते.

### ३ब.३.३.३ सामाजिक अभंग:

संत तुकोबांचे सामाजिक अभंग, सामाजिक कर्तृत्व हे अफाट आहे. समाजातील सुष्ट, दुष्ट, चांगल्या - वाईट, वृत्ती - प्रवृत्तीच्या व्यक्तींचा तुकोबांना जेवढा अनुभव आला असेल तेवढा कदाचित इतर कोणालाही आला नसेल, म्हणून तुकोबांचे जीवन आणि त्यांचे अभंग या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हणता येईल.

"रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग ।अंतर्बाह्य जग आणि मन ॥" अशी तुकोबांची अवस्था होती. तुकोबा हे वैश्य आणि शूद्र वर्णाचे प्रतिनिधी होते. त्यामुळे त्यांनी सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील मिरासदारीवर, परंपरागत व नीतिमूल्यांवर त्यांनी अभंगातून जोरदार हल्ला चढविलेला दिसतो.

तुकोबांच्या काळातील सामाजिक परिस्थिती फारच बिकट होती. उच्च - नीचपणा, जातीयता, धर्मांधता यांनी सर्व सामान्य माणूस नाडविला जात होता. तो अपार दुःखाच्या खाईत जात होता. सर्व बाजूने त्याचे खच्चीकरण होत होते. हे पाहून "बुडता हे जण न देखवे डोळा| येतो कळवळा म्हणोनि " म्हणून सामान्य माणसांबद्दल त्यांच्या मनात अपार करून दिसते. त्यांचा उद्धार करण्याचा लागलेला ध्यासच त्यांच्या अभंगवाणीतून दिसून येतो. 'जे का रंजले गांजले| त्यासी म्हणे जो आपुले ॥

तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥"

खरा देव हा माणसांतच असतो. हाही संस्कार तुकोबांचा दिसून येतो. आणि म्हणूनच त्यांनी सामान्य, दिन दलितांची सेवा करण्याचे व्रत स्वीकारले.

तुकोबांची सामाजिक कामगिरी कशी लोकोत्तर होती हे सांगताना डॉ. ह. श्री. शेणोलीकर म्हणतात, ".... कर्मठांचे ढोंग, शास्त्रीपंडितांची पोपटपंची आणि महानुभाव, नाट्य शास्त्र इत्यादी धर्मपंथातील आधाराचा कल्पना या गोष्टी त्यांनी चव्हाट्यावर आणल्या. त्या विध्वंसक कार्याबरोबर धर्माभिमान, स्वामीनिष्ठा, शरीरसुखापेक्षा धर्मनितीचे श्रेष्ठत्व, धर्मकर्मापेक्षा चित्तशुद्धीचे व सदाचाराचे महत्त्व इत्यादी उच्चतर जीवनमूल्यांची ओळख तुकारामांनी सामान्य जनतेला करून दिली. त्यांच्या या विधायक कार्याने शिवकार्याला उपयोगी असा ध्येयनिष्ठ, सुसंघटित व कार्यक्षम असा जो कुणबी मराठा समाज तयार झाला, त्याच मावळ्यांच्या बळावर स्वराज्य संपादनाच्या कार्यात शिवाजीराजांना यशस्वी होता आले. तुकोबांच्या सामाजिक (व पर्यायाने राजकीय) कामगिरी लोकोत्तरच म्हणावी लागेल."

अशाप्रकारे तुकोबांच्या अभंग गाथेत सर्वच प्रकारचे विविध स्वरूपाचे अभंग पहावयास मिळतात. मानवी जीवनाशी निगडित नाही असा एकही विचार तुकोबांच्या गाथेत नाही असे होणार नाही.

**इतर विषय:**

तुकोबांची अभंगगाथा मानवी जीवनाच्या सत्कार्यासाठीच असलेली दिसते. पांढरी माहात्म्य असो, संत महात्म्य असो, तत्त्वज्ञान असो, बुधज्ञान असो, वेदप्रामाण्याचे ज्ञान, जीव-शिवाच्या ऐक्याचे विचार, जगतविचार, मायाविचार अशा विविध विचारांनी तुकोबांची अभंगगाथा जनसामान्यांच्या मनात आजही टिकून आहे. त्यांच्या गाथेमध्ये अभंगातील सुभाषितेही तितकीच उठावदार आहेत. उदा. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी । असाध्य ते साध्य करीत सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥' 'नाही निर्मल जीवन काय करील साबण |' तुला म्हणे तेचि संत, त्यासी जगाचे आधार ।', नाथाच्या कल्याण, संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकार |'...... इत्यादी अनेक सुभाषितांनी तुकोबांचे अभंग फुलले आहेत. त्यामुळेच मानवी जीवनात आकार,दिशा मिळते.

**समारोप:**

अशाप्रकारे तुकोबांची अभंगगाथा विविध विषय आणि विविध आशयाची ओतप्रोत भरलेली आहे. तुकोबांच्या विषयी आणि त्यांच्या क्विटीविषयी ल. र. नासिराबादकर म्हणतात, "तुकाराम हे प्राचीन मराठी साहित्यातील जवळजवळ अखेरचे प्रमुख वारकरी संत. त्यांची कविता म्हणजे संत साहित्याचा फळसाध्यायच म्हटलं पाहिजे. ज्ञानेश्वर, नामदेव एकनाथ यांच्या सांस्कृतिक कार्याचा वीणा खांद्यावर घेतला. वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने तर तुकारामांचे कार्य फार मोलाचे आहे. वंशपरंपरेने चालत आलेली विठ्ठलभक्तीची मिरास वाढविली. स्त्री शूद्रांपर्यंत पोहोचवली. नाथ साहित्याने मोक्षाची पायवाट सोपी केली.

'याचसाठी केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ॥' या उद्देशाने संत तुकोबा आजीवन समाजासाठी तळमळत राहिले आणि शके १६४९ मध्ये त्यांचा 'दिस गोड' झाला. ते वैकुंठवासी झाले. परंतु आपल्या हृदयात ते काळ, आज आणि उद्याही आहेत अजोपर्यंत ही सृष्टी आहे तोपर्यंत तुकोबा आणि त्यांचे कार्य 'अभंग'च राहणार यात कसलाही संदेह नाही.

### ३ब.३.४ तुकारामांचे शिष्य यांचे वाङ्‌मय:

संत तुकोबांचे कार्य आणि कर्तृत्व हे अजरामर आहे. त्यांच्या वाणीचा, विचारांचा, त्यांच्या अभंगांचा संस्कार प्रभाव लोकमानसावर पडत होता. तुकोबांच्या विचारांच्या संस्कारातून अनेकजण घडत होते. त्यामध्ये संत तुकोबांच्या शिष्य संत बहिणाबाई, संत निळोबा यांचा अगदी आदराने उल्लेख करावा लागतो. कार्य आणि संस्करशील संत म्हणून त्यांचा नामोल्लेख केला जातो.

### ३ब.३.४.१ संत बहिणाबाई:

संत बहिणाबाई ही संत तुकोबांची शिष्या म्हणूनही तिज मानाचे स्थान आहे. संत बहिणाबाईंना तुकोबांचा साक्षात बोध व त्यांचे कीर्तन श्रावण यांचा लाभ झाला होता. अशा या तुकारामांच्या शिष्येचा जन्म इ. स. १६२८ मध्ये झाला. वयाच्या तिसऱ्या वर्षीच तीस वर्षाच्या बिजवराशी त्यांचा विवाह झाल्याचे त्यांनी आपल्या आत्मचरित्रात उल्लेख केला आहे. या संसारात फारशा रमल्या नाहीत. हरी आणि हरिकथा याकडेच त्यांचं मन धाव घेत असे. प्रवासात भ्रमंती करीत  कोल्हापुरात आल्यानंतर जयराम स्वामींकडून त्यांनी तुकोबांची कीर्ती आणि अभंगवाणी ऐकली. आणि त्यांना तुकोबांचा ध्यासच लागला. वयाच्या १९ व्या वर्षी त्यांना तुकोबांचा साक्षात्कार झाला. पुढे त्यांनी आपल्या पतीचेही मनपरिवर्तन घडवून आणले.

बहिणाबाईंना सुरुवातीला जे सुख दुःखाचे चटके भोगावे लागले त्याचे वर्णन आपल्या आत्मचरित्रातील सुमारे ७४ अभंगातून केले आहे. त्यांच्या अभंगगाथेत सुमारे ७४० अभंग आहेत.

संत बहिणाबाईंच्या अभंगात पांढरी, विठ्ठल, सद्गुरू,उपदेश ...... इत्यादी विविध विषयावर अभंग आहेत. त्यांची विठ्ठलभक्तीही अलौकिक स्वरूपाचीच आहे.

उदा.

"तू माझी माउली मी तुझे बालक । करीतसे कौतुक नामी ।
तू माझी माउली मी तुझे वासरू । करीतसे हुंकार नामी तुझे ॥....."

अशाप्रकारे तुकोबांप्रमाणेच बहिणाबाईंनीही विठ्ठलास आपली माता, माउली मानून भक्ती केलेली दिसते.

ज्या अभंगामुळे संत बहिणाबाईचे नाव वारकरी संप्रदायामध्ये आदराने घेतले जाते तो अभंग म्हणजे,

"संत कृपा झाली । इमारत फळा आली ।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारले देवालया ।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार ॥
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ॥

तुका झालासे कळस ।भजन करा सावकाश ।।

बहिणी म्हणे फडकती ध्वजा ।निरूपण केले विना ।।

या अभंगातून संत बहिणाबाईंना संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकारामांपर्यंत सांप्रदायिक इतिहासच कथन केले आहे. तसेच वारकरी संप्रदायातील प्रत्येक संतांचे कार्याचा दाखलाही दिला आहे. या अभंगाचे श्रेष्ठत्व सांगताना डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात ते किती सार्थ आहे याची प्रचिती येते. ते म्हणतात,

एवढा एकच अभंग लिहूनही त्यांची कीर्ती (बहिणाबाईंची) अमर व्हावी इतके त्यांचे मोल आहे."

### ३ब.३.४.२ संत निळोबा:

संत तुकोबांच्या नंतर वारकरी सांप्रदायिक धुरा वाहणारे संत म्हणजे संत निळोबा होय. त्यांच्या जन्मकाळासंबंधी माहिती उपलब्ध नाही. त्यांनी शके १६७५ मध्ये समाधी घेतल्याचे सांगितले जाते.

संत निळोबांना तुकारामांच्या अभंगवाणीतूनच काव्यप्रेरणा मिळाली. संत तुकोबांच्या गौरवात त्यांनी ३३३ अभंगाची रचना त्यांचे १३०० सांप्रदायिक अभंग आहेत. चांगदेव, ज्ञानेश्वर चरित्रपर ७०८ ओव्या आहेत.

संत निळोबांच्या अभंगातही विविध विषय आलेले आहेत. भक्ती, ज्ञान, वैराग्य यांचा सुंदर संगमही त्यांच्या अभंगात दिसून येतो. संत निळोबांनी श्रीकृष्णभक्तीवर गौळणी, विरहिणी इत्यादी रचनाही केल्या आहेत.

पंढरपूर आणि विठ्ठलभक्तीची महती सांगणारा अभंगही फारच सुंदर आहे.

"देवभक्ताचा सोहळा । वाची गती वेळोवेळा ।।१।।

म्हणती धान्य पंढरपूर ।पुंडलिक मुनीवर ।।२।।

चंद्रभागा परमतीर्थ ।वेणू नाही जनकृतार्थ ।।३।।

निळा म्हणे पांडुरंगा । भेटी तापमय भंग ।।४।।

(**संदर्भ:** प्राचीन मराठी वाडगमय वैभव डॉ. बी. एन. पाटील पृ. ३४४)

या संदर्भात डॉ. बी. एन.पाटील म्हणतात ते योग्यच वाटते ते म्हणतात, "वारकरी संप्रदायरूपी मंदिराच्या कळसांचे स्थान संत तुकारामांना लाभले त्या मंदिराचे संरक्षण देखभालीचे सरकारी, महत्कार्य संत निळोबांच्या वाट्याला आले. वारकरी संप्रदायाच्या आकाशगंगेत अनेक तेजस्वी तारे आहेत. त्यांच्यासह स्वतेजाने अढळस्थान प्राप्त करणाऱ्या लहान-लहान तर्कही आहेत. त्यांच्यामुळेच वारकरी संप्रदायाच्या नभोमंडळाला तेजस्विता लाभलेली आहे.

## ३ब.४ समारोप

अशाप्रकारे प्राचीन मराठी वांङमयात वारकरी पंथीयांचे वांङमय आहे. जोपर्यंत मराठी भाषा आहे, माणूस आहे तोपर्यंत वारकरी संप्रदायाचे कार्य , त्यांचे वांङमय अनेकांना प्रेरणादायी असेच आहे. म्हणूनच संतांच्या काव्यलेखनाला 'अभंग' म्हणतात. त्याचे कारणच हे की त्याचे कार्य आणि कर्तृत्व कधीही भंग पावणार नाही.

## ३ब.५ प्रश्नावली

१) बहामनी राजवटीची माहिती देऊन एकनाथकालीन महाराष्ट्राचे वर्णन करा.

२) संत एकनाथांच्या वांङमयाचा परिचय करून द्या.

३) एकनाथ पंथकांच्या वांङमयाचे स्वरूप स्पष्ट करा.

४) शिवकालीन महाराष्ट्राचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

५) संत तुकारायांच्या अभंगाचे स्वरूप स्पष्ट करा.

## ३ब.६ संदर्भग्रंथ

१) प्राचीन मराठी वांङमयाचा इतिहास - अ. ना. देशपांडे

२) प्राचीन मराठी वांङमयाचा इतिहास - ल. रा. नसिराबादकर

३) प्राचीन मराठी वांङमयाचे स्वरूप - ह. श्री. शेणोलीकर

*****

munotes.in

# ४अ

## पंडिती काव्य
## पंडिती काव्याची स्वरूपवैशिष्ट्ये

**घटक रचना**

४अ.अ उद्देश
४अ.२ प्रस्तावना
४अ.३ पंडिती काव्याचे स्वरूप
४अ.४ पंडिती काव्याच्या प्रेरणा
४अ.५ पंडिती काव्याची वैशिष्ट्ये
४अ.६ पंडिती काव्यातील दोषांची चर्चा
४अ.७ समारोप
४अ.८ स्वाध्याय
४अ.९ संदर्भग्रंथ
४अ.१० पुरक ग्रंथ

## ४अ.१ उद्देश

अ) पंडिती काव्याचे स्वरूप स्पष्ट करणे.

२) पंडिती काव्याच्या वैशिष्ट्यांची चर्चा करणे.

३) पंडिती काव्याच्या प्रेरणांचा विचार करणे.

४) पंडिती काव्यातील गुणदोषांची चर्चा करणे.

५) पंडित कवी आणि त्यांच्या ग्रंथरचनेचा परिचय करून देणे.

## ४अ.२ प्रस्तावना

प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात विविध प्रकारचे साहित्य आढळते. सर्वसामान्य लोकांच्या धर्मभावनेला उच्च विचारांचे अधिष्ठान मिळवून देण्याच्या प्रेरणेनेच मराठी वाङ्मय त्या त्या काळी निर्माण झालेले दिसते. त्यामुळे त्या काळातील बहुतेक साहित्य हे मुख्यतः अध्यात्मिक स्वरूपाचे असून ते नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, समर्थ इ. धर्मपंथीयांकडून लिहिले गेले आहे.

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाकडे दृष्टिक्षेप टाकला असता प्रमुख तीन प्रवाह पाहावयास मिळतात. मध्ययुगीन मराठी काव्याचे स्थूलमानाने तीन प्रकार पडतात. संतकाव्य, पंडिती काव्य, शाहिरी काव्य असे हे तीन प्रकार आहेत. संतकाव्य व शाहिरी काव्य या दोन्ही



munotes.in

प्रकारांहून पंडिती काव्य वेगळे असलेले दिसते. परमार्थाची भक्ती, ज्ञान, वैराग्य यांची शिकवण देणारे संतकाव्य आहे. यामागे अकराव्या-बाराव्या शतकात महाराष्ट्रात रूढ असलेल्या काही संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि आचार यांची देखील पार्श्वभूमी आहे. तर पंडित कवींची भूमिका मात्र यापेक्षा निराळी होती. त्यांच्या डोळ्यासमोर विद्वान संस्कृतज्ञ, काव्यमर्मज्ञ असा वाचक वर्ग होता. त्याच्यासाठी निवडक प्रसंग घेऊन ते कलाकुसरीने व पांडित्याने नटवून मांडण्याकरिता रचना केल्या गेल्या.

पंडिती काव्याची परंपरा तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंतची आहे. पंडिती साहित्य खऱ्या अर्थाने विकसित झाले ते सतराव्या शतकात. महानुभाव कवी नरेंद्र व भास्करभट्ट बोरीकर यांनी प्रथम अशा स्वरूपाची रचना केली. पुढे सतराव्या शतकात अनेक कवींनी हा प्रवाह वाढीस लावला. मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, विठ्ठल बिडकर, सामराज, नागेश, श्रीधर, आनंदतनय, निरंजनमाधव या कवींनी पंडिती काव्यात मोलाची भर टाकली. पंडित कवींनी संस्कृतमधील विविध साहित्यप्रकार, विविध वृत्त, अलंकार काव्यात योजिले. तसेच संकेत, भाषासरणी या बाबतीतही संस्कृतचे अनुकरण केले आहे.

अभिजात संस्कृतच्या धर्तीवर काव्यरचना करण्याची प्रेरणा पंडित कवींना झाली त्याला तत्कालीन वातावरणही अप्रत्यक्षरीत्या कारणीभूत ठरलेले दिसते. देवगिरीच्या यादवांच्या साम्राज्याचा नाश झाल्यानंतर महाराष्ट्र पारतंत्र्यात गेला. त्यानंतर मध्यंतरीची शतके संक्रमणावस्थेत गेली. सतराव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळापर्यंत महाराष्ट्रात मुसलमानी अंमल चालू होता. स्वत्व आणि स्वधर्म टिकवण्याची चिंता होती. शिवकाळात ही परिस्थिती बदलली. कवींना राजाश्रय, संपन्नता व स्वास्थ मिळाले. प्रदीर्घ रचनेसाठी आवश्यक पोषक वातावरण लाभले. राजदरबारी संस्कृतला आश्रय मिळाला. संस्कृतला मिळणारी मान्यता पाहून त्याच धर्तीवर रचना करण्याची स्फूर्ती मराठी कवींना झाली. कवींची प्रवृत्ती भाष्य वा टीका ग्रंथांची चाकोरी सोडून आख्यान रचनेकडे झुकू लागली. ते कला विलासाकडे वळले. शिवाय पंडित कवी कोणत्याही संप्रदायाचे अनुयायी नसल्याने विशिष्ट सांप्रदायिक तत्त्वज्ञानांचा पुरस्कार करण्याचे बंधन त्यांच्यावर नव्हते. त्यामुळेच खऱ्या अर्थाने त्यांच्या कवित्वाला बहर आला.

## ४अ.३ पंडिती काव्याचे स्वरूप

पंडिती काव्याचे स्वरूप विवरणात्मक नाही. म्हणजेच संस्कृत कथांचे मराठीत केलेले विवरण नाही तर संस्कृत साहित्य साहाय्याने निवडक आख्यानावर केलेली विदग्ध रचना आहे. मराठीतून मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, नागेश, विठ्ठल, सामराज इ. कवींनी विदग्धतेची प्रक्रिया अवलंबलेली दिसते. म्हणून या पंडित कवींच्या काव्यात अभिजात संस्कृत वाङ्मयाचे पुनरुज्जीवन झाले. पंडिती काव्यात नवरसांचा आविष्कार, अलंकार व वृत्ते यांच्या रचनांना महत्त्व आहे. ते ओवी, अभंग यासारख्या छंदाकडून विविध अक्षरगण वृत्ताकडे वळले. सोप्या भाषेकडून डौलदार, पल्लेदार भाषेकडे पंडिती काव्य वळले. संतकवींनी काव्याला लावलेले अध्यात्मक व मराठीपण पंडित कवींनी सोडले. मराठीला संस्कृत साहित्य आणि साहित्यशास्त्र यांच्या वळणावर परत काव्याला नेले. महानुभाव कवी नरेंद्र व भास्करभट्ट यांच्या काव्यात पांडित्याच्या खुणा आढळतात. त्यांच्यानंतर एकनाथांनी आख्यान रचना केली आहे. परंतु जाणीवपूर्वक या रचना करण्याचे कर्तृत्व

मुक्तेश्वराला देता येते. मुक्तेश्वरापासून पंडिती काव्याच्या परंपरेची सुरुवात झाली, नंतर शिवकाळात त्याचा विस्तार झाला. अनेक पंडित कवींनी रचना प्रकारांची विविधता साधून मराठीत निरनिराळ्या स्वरुपाची रचना केली.

पंडिती काव्य हे अभिजात संस्कृत साहित्यरचनेचे पुनरुज्जीवन आहे. संस्कृतमधील वाङ्मय प्रकार, आदर्शवाद, भाषेची घडण, वृत्त, अलंकार या सर्वच बाबतीत हे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न पंडित कवींनी केला. महाकाव्य, खंडकाव्य, लघुकाव्य, चंपूकाव्य प्रकार त्यांच्या वैशिष्ट्यांसह पंडित कवींनी उचलले. 'रघुवंश', 'कुमारसंभव', 'शिशुपालवध', 'शाकुंतल', 'उत्तररामचरित' या ग्रंथांचा मोठ्या प्रमाणावर आधार घेतला. रामायण, महाभारत, भागवत यातून निवडक आख्याने घेऊन प्रसंगनिर्मिती, कल्पनाविलास, वर्णनपद्धती, भाषासरणी याबाबतीत संस्कृत नाटके व पंचमहाकाव्ये यांचा आधार घेऊन पंडित कवींनी आपल्या काव्याची सजावट केली.

अभिजात संस्कृत वाङ्मयातील ठळक प्रवृत्ती म्हणजे आदर्शवाद, परिपूर्णतावाद. आदर्शवाद व संकेतांचे अनुकरण पंडित कवींनी केले. रूपवर्णन, नगरी वर्णन, राजवटीचे वर्णन, वने-उपवने यांचे वर्णन अशा अनेक संदर्भात आदर्शवादाचा अवलंब केलेला दिसतो.

आख्यान हे नाव 'ख्या' या धातूपासून सिद्ध झाले. 'ख्या' म्हणजे गोष्ट वा कथा. आख्यान म्हणजे सांगणे, निवेदन करणे, कथन करणे असा त्याचा अर्थ होतो. हा व्युत्पत्तीने येणारा अर्थ आहे. घडून गेलेल्या घटनेचे कथन असा अर्थ नंतर रूढ झाला. त्यातही ऐतिहासिक घटनेपेक्षा कल्पित कथा, पौराणिक कथा यांनाच आख्यान म्हणण्याकडे कल दिसून येतो. 'आख्यानकाव्य', 'पंडितीकाव्य', 'विदग्धकाव्य', 'कलाकाव्य' इ. नावातच आख्यान वाङ्मयाचा ठळक विशेष व्यक्त होतो. मात्र 'पंडिती काव्य' ही संज्ञा अधिक रूढ आहे.

आख्यान म्हणजे रसाळपणे सांगितलेल्या कथा असतात. या कथांच्या निमित्ताने वेगळे काहीतरी सांगण्याचा उद्देश कीर्तनकार व आख्यानकार यांचा असतो. मराठी आख्यान कविता, अध्यात्म, आणि कथनात्मकता यांनी विणलेली आहे. महाभारत, रामायण, भागवत, पुराणे, हरिवंश इत्यादी ग्रंथ हे अख्यानपरंपरेचे उगमस्थान आहेत, आधार आहेत. संत, पंडित, पुराणिक, कीर्तनकार हे प्राचीन मराठी आख्यान कवितेचे लेखक आणि निवेदक होते.

संस्कृतमध्ये रामायण, महाभारत या सामग्रीवर आपल्या काळाची संस्कृती, कलात्मकता, पांडित्य यांचे संस्कार करून कालिदास, माघ, भारवी आणि श्रीहर्ष या महाकवींनी जी काव्यरचना केली तिला 'अभिजात संस्कृत साहित्य' म्हणतात. या संस्कृत साहित्याचा पंडिती साहित्यात सजावटीसाठी भरपूर वापर केला गेला. त्यामुळे पंडिती काव्य हे पुनरुज्जीवित अभिजात संस्कृत साहित्य होय. मुक्तेश्वर, रघुनाथपंडित, वामन पंडित, श्रीधर, सामराज, विठ्ठल, नागेश, निरंजन माधव, मोरोपंत या पंडित कवींनी पांडित्यपूर्ण रचना करून मध्ययुगीन मराठी साहित्यात मोलाची भर घातली.

## ४अ.४ पंडिती काव्याच्या प्रेरणा

आख्यान कवींच्या डोळ्यासमोर व्युत्पन्न वाचकवर्ग आणि संस्कृत साहित्याचा व साहित्यशास्त्राचा आदर्श असल्यामुळे कवित्वाबरोबरच पांडित्याचाही आविष्कार करणे अशी प्रेरणा त्यांच्याबाबत प्रधान ठरली आहे.

नवरसांचा जाणीवपूर्वक आविष्कार करण्याची आणि रसिकांना त्याचा आस्वाद घडविण्याची पंडित कवींची मुख्य प्रेरणा होती. त्यावेळी समाजात अस्तित्वात असणारा उच्च किंवा संपन्न वर्ग संस्कृतप्रेमी होता. संस्कृत साहित्यातील रसालंकारांची आणि कलाकृतींची त्यांना जाण असल्यामुळे त्यांना पंडिती काव्याचे आकर्षण होते. या श्रोत्यांची अभिरुची, त्यांची धार्मिकता, बौद्धिक कुवत ध्यानात घेऊनच पंडित कवींनी आपले काव्य लिहिले. त्यामुळे ते त्यांच्यापर्यंत पोहोचले.

संस्कृतची श्रीमंती मराठीला प्राप्त करून देण्याच्या प्रेरणेने पंडित कवींनी रचना केली होती. पंडिती काव्याचा रूपाने अभिजात संस्कृत साहित्याचे पुनरुज्जीवन झाले. या साहित्याच्या अनुकरणाने पंडिती काव्य निर्माण झाले.

काव्यनिर्मिती करणे, रसाचा आविष्कार करणे, साध्यासुध्या मराठीला अलंकार, गुण, व्याकरण यांचा साज चढविणे आणि तिला विदग्धजनांची मान्यता मिळविणे या आख्यान काव्याच्या प्रेरणा आहेत.

अध्यात्माशी सरस काव्यनिर्मिती, रसनिष्पत्ती, पांडित्य प्रदर्शन करणे, संस्कृतची प्रौढी मराठीला मिळवून देणे या प्रेरणा पंडित कवींमध्ये प्रभावी असल्याच्या दिसतात. म्हणजेच कवित्व आणि पांडित्य यांचा विलास प्रकट करणे ही आख्यान कवींची महत्त्वाची प्रेरणा सांगता येईल.

थोडक्यात, पंडिती काव्यात संस्कृतमधील पुराण ग्रंथांच्या आधाराने आपल्या विद्वत्तेच्या प्रसिद्धीसाठी, विषयनिष्ठ, कथात्मक काव्ये लिहावयाची प्रेरणा दिसते. त्यामुळेच पंडिती काव्याचा प्रवाह अन्य साहित्य प्रवाहांपेक्षा वेगळा ठरतो.

## ४अ.५ पंडिती काव्याची वैशिष्ट्ये

संस्कृत प्रचुर समास घटित भाषा हे पंडित कवींचे वैशिष्ट्य आहे. मराठी भाषेला संस्कृतची गोडी व डौल आणण्याचा पंडित कवींचा उद्देश होता. त्यामुळे त्यांनी देशी व तद्भव शब्द कमी करून तत्सम शब्द व प्रदीर्घ सामासिक पदे यांची योजना अधिक प्रमाणात केली. या भाषेला प्रौढ संस्कृत प्रचुर रूप प्राप्त झाले आहे.

उत्कट वर्णने, रसोत्कटता आणि कल्पनाविलास, प्रसंगनिर्मिती, डौलदार भाषाशैली ही पंडिती काव्याची खास वैशिष्ट्ये आहेत. पंडित कवींनी मराठीला प्रौढ रूप मिळवून दिले आणि तिच्यावर अलंकाराचा साज चढवला.

संस्कृतमधील विविध वृत्ते आणि अलंकार यांचा वारसा पंडित कवींनी जाणीवपूर्वक जतन केलेला दिसून येतो. पंडित कवींनी आपल्या काव्यात निरनिराळी वृत्ते वापरली.

संस्कृतमधील विविध अलंकाराचे वैभव मराठीला प्राप्त करून दिले. यमक, अनुप्रास हे शब्दालंकार, उपमा, रुपक, व्यतिरेक अर्थालंकार आणि श्लेषसारखा उभयालंकार या सर्वांची उदाहरणे पंडिती काव्यात पदोपदी येताना दिसतात.

संस्कृतमधील श्रेष्ठ साहित्यिकांच्या ग्रंथातील वाङ्मयीन गुण मराठीत आले. स्थलवर्णने, निसर्गवर्णन, ऋतुवर्णने, राजघराण्यातील चित्रणे, देवादिकांच्या कथा, स्वयंवरवर्णने हे सारे कलात्मकतेने मराठीत अवतरले.

नवरसांचा जाणीवपूर्वक वापर पंडितांनी केला. रसालंकाराची वाणी आपण प्रकट करीत आहोत हे पंडित कवी आग्रहाने मांडतात. या संदर्भात वामनपंडित म्हणतात –

शृंगार वीर करूणाहि नवा रसांची ।

लीला जगद्गुरुचिया पद् सारसाच ॥

मध्ययुगीन मराठी वाङ्मय प्रवाहात जाणीवपूर्वक पांडित्यपूर्ण रचनेचा खरा पायंडा मुक्तेश्वरांनीच पाडला. पंडिती काव्याचा या स्वतंत्र प्रवाहाच्या काही खुणा महानुभाव कवी नरेंद्र आणि भास्करभट्ट यांच्या काव्यात यापूर्वीच आल्या होत्या. तरी मराठी आख्यान कवितेचे ते एक वळण होते. त्यालाच मुक्तेश्वरांनी पंडिती वळण प्राप्त करून दिले. मुक्तेश्वरादी पंडित कवींची दृष्टी रसिक कलावंताची आणि विद्वान कवीची होती. आपल्या कवित्वशक्तीचा आणि पांडित्याचा विलास प्रदर्शित करण्याची जबरदस्त प्रेरणा पंडिती काव्याचा मुळाशी आहे.

पंडित कवींनी ऐहिकता, प्रवृत्तीपरता आणि काव्यरचना कौशल्य व रसिकत्व यांना प्राधान्य दिले. पंडित कवींनी हा नवा मार्ग चोखाळला म्हणूनच त्यांनी प्रतिभावंत कलाकवी म्हणून नावलौकिक मिळवला.

## ४अ.६ पंडिती काव्यातील दोषांची चर्चा

पंडित कवींची ध्येयदर्शी भूमिका जाणवलेली नाही. पंडित कवींनी ज्या संस्कृत कवींचे अनुकरण केले त्या महाकवींसारखे प्रगल्भ मन आणि त्यांची प्रतिभा पंडित कवींकडे नव्हती. पंडिती काव्यातील ध्येयवादात भोवतालच्या काव्याचे चिंतन दिसत नाही.

पंडित कवींची कविता तपासून पाहता रामायण, महाभारत, भागवत यातील कथानकांचे मराठीत रूपांतर करण्यापलीकडे त्यांनी काही वेगळे केले नाही. ही रूपांतरे उत्कृष्ट असली तरीही त्यात तत्कालिक जीवनाचे प्रतिबिंब जाणवत नाही. सामाजिक स्थितीचे दर्शन किंवा भोवताली घडत असलेल्या पराक्रमाचे अधिक संदर्भही त्यात नाहीत.

स्वतःच्या पांडित्याच्या अवाजवी प्रदर्शनातून, सर्वसामान्यांच्या भावजीवनापासून आणि बोलीभाषेपासून पंडिती काव्य वेगळेच राहिले. त्यांनी जनरूची संवाद आणि समाजाशी जवळीक साधली नाही. पंडिती काव्यांतून बहुजनांशी, सर्वसामान्य जनतेशी संपर्क नव्हता तर उच्च वर्गासाठी ही रचना केलेली होती. त्यामुळे पंडिती काव्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलेच नाही.

जुन्या कथेचा नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्नही दिसून येत नाही. संस्कृत महाकाव्याचा आत्मा त्यांना गवसलेला नाही. निर्मिती शिलतेपेक्षा कामगिरी तंत्राला महत्त्व दिलेले दिसते.

थोडक्यात संस्कृत अभिजात साहित्याचे मराठीतील पुनरुज्जीवन सदोष आहे, अनेक मर्यादा असलेले आहे. म्हणून रा. रं. वाळिंबे यांनी पंडिती काव्यावर आधुनिक दृष्टीतून टीका करत काव्यातील या अभिजातवादाला बेगडी अभिजातवाद असे संबोधले. तर के. ना. वाटवे यांनी संपूर्ण पंडिती काव्यावर सरसकटपणे कृत्रिम बेगडी असा शेरा मारणे अन्यायकारक ठरेल अशी भूमिका मांडली.

## ४अ.७ समारोप

अशाप्रकारे पंडिती काव्य म्हणजे अभिजात संस्कृत साहित्याचे मराठीतील पुनरुज्जीवन होय. पांडित्याचे प्रदर्शन, व्यासंग व विद्वत्ता दाखविण्यासाठी पंडिती साहित्याचा प्रवाह निर्माण झाला. संस्कृत भाषेतील शब्दकळा, विविध संकेत, वृत्ते, अलंकार, रसपरिपोष यांनीच तो भरलेला आणि वेढलेला आहे. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात पंडिती काव्याला एक महत्त्वाचे स्थान आहे. पंडित कवींनी संस्कृतमधील काव्य यमुनेचा ओघ येथे आणून त्यात विहार करण्याची संधी मराठी रसिकांना उपलब्ध करून दिली.

## ४अ.८ स्वाध्याय

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

अ) पंडिती काव्याचे स्वरूप सांगून पंडिती काव्यातील मर्यादांची चर्चा करा.

२) पंडिती काव्याच्या प्रेरणा आणि पंडिती काव्याचे स्वरूपवैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) पंडिती काव्याचे मराठी वाङ्मय परंपरेतील महत्त्व विशद करा.

**ब) टीपा.**

अ) पंडिती काव्याच्या प्रेरणा

२) पंडिती काव्यातील गुणदोष

३) पंडिती काव्याचे स्वरूप

४) पंडिती काव्याची वैशिष्ट्ये

**क)**

अ) मराठीला कोणत्या भाषेची श्रीमंती प्राप्त करून देण्याच्या प्रेरणेने पंडित कवींनी रचना केली होती.

२. पंडित कवींची मुख्य प्रेरणा कोणती होती.

३. कोणते महानुभाव कवी यांच्या काव्यात पांडित्याच्या खुणा आढळतात ?



munotes.in

४. पंडिती काव्य कोणत्या साहित्य रचनेचे पुनरूज्जीवन आहे. ?

५. मध्ययुगीन मराठी वांड्:मय प्रवाहात पांडित्यपूर्ण रचनेचा खरा पायंडा कोणी पाडला.

## ४अ.९ संदर्भग्रंथ


- ह. श्री. शेणोलिकर - प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, अ९७अ.
- संपा. सं. गं. मालशे व इतर – मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, अ९७३.
- संपा. सं. गं. मालशे - मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड दुसरा, भाग अ व भाग २), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, अ९८२.
- के. ना. वाटवे - संस्कृत काव्याचे पंचप्राण, पुणे, मनोहर ग्रंथमाला.
- रा. श्री. जोग - मराठी वाङ्मया भिरूचीचे विहंगमावलोकन.


## ४अ.१० पुरक ग्रंथ


- संपा. के. ना. वाटवे, कुसुम कुलकर्णी - पंडिती काव्य, व्हिनस प्रकाशन, पुणे.
- गं. ब. ग्रामोपाध्ये - मराठी आख्यान कविता : एक अभ्यास, मौज प्रकाशन, मुंबई.
- ना. गो. नांदापूरकर - मराठी महाभारताचे स्वातंत्र्य.


*****

munotes.in

# ४ब

## पंडित कवी

**घटक रचना**

४ब.१ उद्देश
४ब.२ प्रस्तावना
४ब.३ मुक्तेश्वर
४ब.४ वामन पंडित
४ब.५ रघुनाथ पंडित
४ब.६ निरंजन माधव
४ब.७ सामराज
४ब.८ नागेश
४ब.९ विठ्ठल
४ब.१० मोरोपंत
४ब.११ समारोप
४ब.१२ स्वाध्याय
४ब.१३ संदर्भग्रंथ

### ४ब.१ उद्देश

१) प्रमुख पंडित कवींचा परिचय करून देणे.

२) पंडित कवींनी लिहिलेल्या महत्वाच्या ग्रंथ रचनांची नोंद करणे.

३) पंडित कवींच्या काव्यरचनांच्या वैशिष्ट्यांची चर्चा करणे.

४) पंडित कवींचे व्यक्तित्त्व आणि कर्तृत्व यांची माहिती सांगणे.

### ४ब.२ प्रस्तावना

पंडिती काव्य हे अभिजात संस्कृत साहित्यरचनेचे पुनरुज्जीवन आहे. संस्कृतमधील वाङ्मय प्रकार, आदर्शवाद, भाषेची घडण, वृत्त, अलंकार या सर्वच बाबतीत हे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न पंडित कवींनी केला. संस्कृतातील विविध साहित्यप्रकार, विविध वृत्त, अलंकार काव्यात योजिले. तसेच संकेत, भाषासरणी या बाबतीतही संस्कृतचे अनुकरण केले आहे.

पंडिती साहित्य म्हणजे मुक्तेश्वर, मोरोपंत, रघुनाथपंडित, सामराज, निरंजन माधव, वामन पंडित, नागेश, श्रीधर, विठ्ठल इत्यादी कवींनी निर्माण केलेले पांडित्यपूर्ण रचना होय.

मुक्तेश्वरापासून पंडिती काव्याच्या परंपरेची सुरुवात झाली, नंतर शिवकाळात त्याचा विस्तार झाला. अनेक पंडित कवींनी रचनाप्रकारांची विविधता साधून मराठीत निरनिराळ्या स्वरुपाची रचना केली.

नवरसांचा जाणीवपूर्वक आविष्कार करण्याची आणि रसिकांना त्याचा आस्वाद घडविण्याची पंडित कवींची मुख्य प्रेरणा होती.

ओवी ज्ञानेशाची, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।

सुश्लोक वामनाचा तशीच आर्या मयूरपंतांची ॥

ज्ञानेश्वरांची ओवी आणि तुकारामांची अभंगवाणी जशी संत साहित्यात सुप्रसिद्ध आहे तशीच पंडित साहित्यात वामन पंडितांची श्लोकरचना आणि मोरोपंतांची आर्या प्रसिद्ध आहे.

पंडित कवींनी महाकाव्य, खंडकाव्य, चंपूकाव्य, कथाकाव्य, लघुकाव्य, स्तोत्रे, चरित्रे अशा विविध प्रकारच्या काव्यप्रकारातून रचना केली. यामुळे मराठी साहित्य रचनादृष्ट्या आणि आशयदृष्ट्या संपन्न झाले. मराठी कवितेला संपन्न करण्यात मुक्तेश्वर, मोरोपंत, रघुनाथपंडित, सामराज, निरंजन माधव, वामन पंडित, नागेश, श्रीधर, विठ्ठल इ. पंडित कवींचा मोलाचा वाटा आहे.

## ४ब.३. मुक्तेश्वर

मुक्तेश्वर यांचा जन्म इ. स. १६०९ मध्ये पैठण येथे झाला. त्यांचे वास्तव्यस्थान पैठण असून ते संत एकनाथ यांचे नातू होते. मुक्तेश्वरांनी काशी यात्रेच्या निमित्ताने भारतभर भ्रमंती केली. बराच काळ पैठण येथे घालविल्यानंतर ते काशीक्षेत्रला गेले. तेथे काही काळ वास्तव्य केल्यावर त्यांनी बरेच देशाटन केले. त्यामुळे निरनिराळ्या प्रकारचे लोक, निरनिराळ्या प्रांतातील चालीरीती व वैशिष्ट्ये यांची मार्मिक उदाहरणे त्यांच्या ग्रंथातून दिसून येतात. विविध ग्रंथांचे अध्ययन व अवलोकन त्यांच्या ग्रंथात स्पष्ट दिसते. त्यांना वेद, व्याकरण, पुराणे, संस्कृत काव्ये इत्यादींचा उत्तम परिचय होता हे त्यांच्या ग्रंथांवरून स्पष्ट होते.

**मुक्तेश्वरांची ग्रंथसंपदा:**

मुक्तेश्वर यांनी संक्षेप रामायण, महाभारताची आदिसभा, वन, विराट, सौप्तिक अशी पाच पर्वे, हनुमंताख्यान, हरिश्चंद्राख्यान, शुकरंभा संवाद, गरुडगर्व परिहार, सुलोचना गहिवर, अहिमहिरावणाख्यान, शुकरंभासंवाद, एकनाथ चरित्र, मुर्खांची लक्षणे इ. स्फुट रचना, काही आरत्या, भूपाळी, फुगडी व पदे इ. ग्रंथरचना केली.

१) संक्षेप रामायण

२) मुक्तेश्वरी महाभारत

३) स्फुट रचना

४) इतर रचना



munotes.in

**१) संक्षेप रामायण:**

'संक्षेप रामायण' या ग्रंथावर संत एकनाथांच्या रचनांचा प्रभाव दिसतो. ही मुक्तेश्वरांची प्रारंभीची रचना आहे. याची श्लोकसंख्या ६६१ आहे. विविध छंदामध्ये रामायण लिहिण्याचा पहिला मान मुक्तेश्वराला मिळाला. संस्कृत ग्रंथातील श्लोकांचे भाषांतर या ग्रंथात केलेले आहे.

'संक्षेप रामायण' या ग्रंथात मुक्तेश्वराने वाल्मिकी रामायणातील उत्कट प्रसंग जसेच्या तसे घेतले आहेत. अध्यात्म रामायणातील उत्कट प्रसंग घेतले आहेत. तसेच भक्तीच्या काही कल्पनाही घेतल्या आहेत. मुक्तेश्वरांच्या रामायणातील राम अवतारी आहे. तो सीतेसाठी शोक करतो. सुग्रीवावर चिडतो त्यामुळे तो मानवी वाटतो व अधिक भावतो. संक्षेप रामायणातील बालकांड रावणवध, दैत्याशी युद्ध, कैकयीचे साहाय्य, इंद्रब्रहस्पतीचा संतोष हा कथाभाग अत्यंत वेगाने आला आहे. अयोध्याकांडात राम, दशरथ, भारत यांना महत्त्व दिले आहे. रामाचे आदर्श, कठोर धिरोदात्त व कोमल, सत्वशील, कर्तृत्ववान असे व्यक्तिमत्व रेखाटले आहे. उदात्त, करूण व भक्ती हे तीन रस या कांडात प्रामुख्याने दिसतात. तर अरण्यकांडात वीररस पाहायला मिळतो. अनेक युद्धप्रसंगांचे चित्रण यात आले आहे. या कांडात सीतेचा शोध, जटायू वध, रामविलाप हे प्रसंग चित्रित झाले आहेत.

किष्किंधाकांडात राम – हनुमान प्रसंग, वाली – सुग्रीव युद्ध आले आहे. भावार्थ रामायणाचा प्रभाव यावर दिसतो. सुंदरकांडात मारुती लंकेत आल्यानंतर तेथे घडविलेल्या घटना मांडल्या आहेत. हनुमानाचे व्यक्तीचित्रण रेखाटले आहे. युद्धकांडात राक्षस- वानर युद्ध, वानर- रावण युद्ध व शेवटी रावण – राम युद्ध आले आहे. त्यामुळे या कांडात वीररस सर्वत्र दिसून येतो. उत्तरकांडात राज्याभिषेक, जानकीचे डोहाळे, लवकुश युद्ध, रामाचे वैकुंठगमन हे प्रसंग आले आहेत. यामध्ये उदात्त विषण्ण वातावरण तयार केलेले आहे.

या ग्रंथाची भाषा संस्कृतप्रचुर आहे. मुक्तेश्वरी महाभारताच्या मानाने हा ग्रंथ अगदीच सामान्य आहे.

**२) मुक्तेश्वरी महाभारत:**

मुक्तेश्वर यांनी महाभारताची आदि, सभा, वन, विराट, सौप्तिक अशी पाच पर्वे लिहिली. या पाच पर्वाची ओवी संख्या १४०७९ इतकी आहे. ओवीवृत्तावर मुक्तेश्वरांचे असामान्य प्रभुत्त्व दिसून येते. मुक्तेश्वर हे स्वतंत्र प्रतिभेचे काव्य कलोपासक होते. महाभारत रचनेमुळे मुक्तेश्वरांना प्रचंड लोकप्रियता लाभली. अनेक कवी त्याला आदराने वंदन करतात. तसेच मुक्तेश्वरांनी आपल्या महाभारतात व्यास आणि ज्ञानेश्वरांना वंदन केले आहे. उपमा, उत्प्रेक्षा व रूपक या अलंकारांचा अधिक वापर या ग्रंथात केलेला आहे.

मुक्तेश्वरांनी मूळ भारताचा यात विस्तार केला आहे व आपल्या अभिरुचीप्रमाणे मूळ भारतातील आख्याने निवडली आहेत. त्यांनी आपल्या महाभारतात काही ठिकाणी संक्षेप केला आहे तर काही विस्तार केला आहे. आदिपर्व खूप विस्ताराने लिहिले आहे. व्यासाच्या गंगेपेक्षा मुक्तेश्वरांची गंगा वेगळी आहे. तसेच माद्री व कुंती यांच्याशी पंडूचा विवाह वेगळ्या पद्धतीने चित्रित केला आहे. मुक्तेश्वर यांच्या महाभारतात तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब दिसते. त्यांनी मूळ महाभारतात अनेक ठिकाणी बदल केला आहे.

'मुक्तेश्वरी महाभारत' ही स्वतंत्र वाङ्मयीन कृती आहे. मुक्तेश्वर आदिपर्वात अधिक रंगलेले दिसतात. आदिपर्वात अनेक दुय्यम कथा आलेल्या आहेत. सत्यवती- पराशर, गंगा- शंतनू, सत्यवती- शंतनू या प्रेमकथा वेगवेगळ्या पद्धतीने सांगितल्या आहेत. यामधील व्यक्तिचित्रणे ठसठशीत आहेत. सभापर्व आदिपर्वाच्या मानाने आटोपशीर आहे. आदिपर्वात पंडूची स्वर्गप्राप्ती, जरासंधवध, शिशुपालवध, पांडवांचा संन्यास इ. कथा आल्या आहेत. वनपर्वात अनेक दुय्यम कथा आल्या आहेत. तर विराटपर्व घटनाप्रधान आहे.

व्यास आणि ज्ञानेश्वरांना वंदन करणाऱ्या मुक्तेश्वरांना मराठी भाषेचा अभिमान होता. मराठीची स्तुती करताना ते म्हणतात –

> महाराष्ट्र भाषा रंभापर्णी ।
>
> वाढीले तरी भूकाळू जनि न सेविजे किमर्थ ।

मुक्तेश्वर आपले सर्वस्व गुरु चरणी अर्पण करण्यात धन्यता मानतात. आपल्या गुरुबद्दल आदरभाव व्यक्त करताना मुक्तेश्वर म्हणतात –

> लीला विश्वंभर जलधर । वर्षता सात्विक सरोवर ।
>
> भरती तेथे मुक्तेश्वर । चातकप्राय निवतसे ।

गुरूप्रेमाची चातकाप्रमाणे वाट पाहणारा मुक्तेश्वर येथे दिसतो.

### ३) मुक्तेश्वरांची स्फुट रचना:

मुक्तेश्वरांनी भक्ती हा धागा व्यक्त करण्यासाठी आख्यान काव्याची निवड केली. भक्तीबरोबरच वीर रस व शृंगार रस यांनाही स्पर्श केले. धर्मतत्त्वज्ञानही त्यांच्या आख्यानकाव्यांमधे दिसते.

#### हनुमंताख्यान:

'हनुमंताख्यान' हे ६२ ओव्यांचे आख्यान आहे. हनुमंतासाठी कृष्ण रामरूप धारण करतो. त्यांच्या भेटीचे वर्णन येथे साररूपाने आलेले आहे. त्यामुळे कथानक आखीव-रेखीव व आटोपशीर आहे. पूर्वपरंपरेला नवे रूप दिलेले आहे. रामकृष्ण हे एकत्व या आख्यानात पाहायला मिळते.

#### शतमुखरावणाख्यान:

'शतमुखरावणाख्यान' हे आख्यान 'भावार्थ रामायण' आणि 'आनंद रामायणा'तील आख्यान काव्यांचा मूलाधार घेऊन लिहीले आहे. १३३ ओव्यांचा हे आख्यान आहे. याचा विषय प्रामुख्याने देव आणि असूर यांच्यातील द्वंद्व हा आहे. तसेच सनातन संघर्ष यात आलेला आहे.

**हरिश्चंद्राख्यान:**

सत्वशील राजा हरिश्चंद्राची कथा हा विषय या आख्यानाचा आहे. खंडकाव्याचे रूप याला मिळाले आहे. अलंकार प्रचुरता हे या आख्यानकाव्याचे वैशिष्ट्य आहे. उत्तम निवेदनशैली, उत्तम कल्पनाविलास यात पाहायला मिळतो.

**शुकरंभासंवाद:**

'शुकरंभासंवाद' यामध्ये इंद्राच्या आज्ञेवरून शुकाला मोहित करू पाहणारी रंभा आणि शुक ऋषीमुनी यांच्यातील संवाद येथे आहे. रंभा ही जी अप्सरा आहे तिच्याशी शुक कसा अविचल राहिला या गोष्टीचा कथाभाग यात आलेला आहे. शृंगाराची रचना अधिक आहे. शृंगार आणि वैराग्य या रसांचे उत्कट चित्रण अधिकतेने यात दिसते. प्रपंच आणि परमार्थ या दोन गोष्टींची सांगड घालणे हा एकनाथांचा संस्कार मुक्तेश्वर यांच्या संदर्भात येथे दिसतो.

**मूर्खांची लक्षणे:**

'मूर्खांची लक्षणे' हे स्फुट प्रकरण ११३ ओव्यांचे आहे. यात वेगवेगळे विषय मुक्तेश्वर यांनी हाताळले आहेत. धार्मिक उपदेश लोकांपर्यंत पोहचवणे हा प्रमुख उद्देश यात आहे. समकालीन वास्तव, लोकांची वागणूक, वरिष्ठ, आदरणीय लोकांसोबत कसे वागणे यावर भाष्य केलेले आहे. माणसांच्या अंगी असलेले वेगवेगळे अवगुण, क्रोध, आसक्ती या गोष्टींचा निषेध या प्रकरणात झालेला आहे. नाक, कान, डोळे यांची स्वच्छता न ठेवणाऱ्या अस्वच्छ लोकांवर हल्ला चढवला आहे. यात माणसातील दोषांचे परिणाम दाखवून दिले आहेत. या दोषांचा त्याग करावा आणि चांगले गुण स्वीकारावे असा उपदेश या प्रकरणात आहे.

**एकनाथ चरित्र:**

मुक्तेश्वरांनी आपले आजोबा संत एकनाथ यांचे चरित्र यात मांडले आहे. एकनाथांचे व्यक्तिमत्व व व्यक्तीजीवन यांचा एकात्मक प्रत्यय यात येतो. एकनाथांचे चरित्र यात आख्यानरूपाने मांडले आहे. यामध्ये भक्तीरस सर्वत्र पाहावयास मिळतो. एकनाथांचा भक्तिविजय आला आहे. लोककथांची मौखिक परंपरा जपण्याचा प्रयत्न यात केलेला आहे. तसेच चमत्कार बंधाचा वापर केलेला आहे.

**४) इतर रचना:**

**आरती:**

मराठीत ज्ञानेश्वरांपासून आरती हा रचनाप्रकार दिसतो. मुक्तेश्वर यांनी गणपतीची, तुकाई, महालक्ष्मीची, तुळशीची, एकनाथांची आरती इत्यादी वेगवेगळ्या प्रकारच्या आरत्या लिहिल्या. त्यांनी आध्यात्मिक विचार स्वीकारला आहे. आरतींमधून लहान लहान तपशील मांडलेला आहे.

**भूपाळी:**

'उठी रे गोपाळा' ही आध्यात्मिक अनुभव देणारी भूपाळी मुक्तेश्वर यांनी लिहिली. मुक्तेश्वर हे कलाकवी संस्कृतचे अभ्यासक. त्यामुळे संत साहित्यातील कवीसंकेत, निसर्गसंकेत या भूपाळीत पाहायला मिळतात.

**मुक्तेश्वरांच्या काव्याची वैशिष्ट्ये:**

मुक्तेश्वरांपासून अभिजात लेखनाची एक परंपरा बडोद्यात निर्माण झाली. पहिली अभिजात कविता बडोद्यात निर्माण झाली. जाणीवपूर्वक अशी पंडिती थाटाची रचना करण्याचे कर्तुत्व मुक्तेश्वरांकडे जाते. प्राचीन मराठी वाङ्मयात पंडिती काव्याचे स्वतंत्र दालन सुरू करण्याचा मान मुक्तेश्वर यांच्याकडे जातो. मुक्तेश्वर हे पंडित कवींमध्ये अग्रगण्य ठरले. ते जसे कालदृष्ट्या पहिले तसेच काव्यगुणांच्या दृष्टीनेही पहिलेच आहेत. त्यांची दृष्टी रसिक कलावंताची होती. आपल्या कवितेत जबरदस्त विलास दाखविण्याची प्रेरणा मुक्तेश्वरांच्या काव्यामागे आहे.

## ४ब.४ वामन पंडित

वामन पंडित यांचा कालखंड इ.स. १६०८ ते १६९५ असा आहे. रामदासांच्या चरित्रकारांनी वामन पंडित यांना रामदासांचे शिष्य ठरविले असले तरी त्यांच्या ग्रंथरचनेवर रामदासी छाप दिसून येत नाही. एकीकडे आध्यात्मपर अशी रचना तर दुसरीकडे शृंगारप्रधान रचना अशा परस्परविरोधी स्वरूपाच्या ग्रंथरचना वामनाने केल्या आहेत. एकनाथांचे टीकात्मक व आख्यानपर लेखनाची परंपरा चालविणारे शिवकालातील अग्रेसर कवी म्हणजे वामन पंडित. 'यमक्या वामन' अशी त्यांची ओळख आहे.

वामन पंडित हे पंडित कवींचे प्रातिनिधिक कवी आहेत. त्यांचे काव्य विविध व विपुलतेने नटलेले आहे. पांडित्य आणि कवित्व यांचा संयोग त्यांच्या रचनेत पाहावयास मिळतो. त्यांची स्तुती करताना मोरोपंतांनी 'भक्ती-ज्ञान-रस-भरित यत्वकन' असे म्हटले आहे.

**वामन पंडिताची ग्रंथसंपदा:**

१) निगमसार

२) समश्लोकी टीका

३) यथार्थदीपिका

४) द्वारकाविजय

५) आख्यानकाव्ये

६) अध्यात्मिक प्रकरणे

**निगमसार:**

‘निगमसार' हा ग्रंथ वेदांताचे थोडक्यात सार सांगणारा आहे. या ग्रंथातील मांडणी अल्पाक्षरी सुबोध असल्याने वामन पंडितांच्या आध्यात्मिक ग्रंथात हा ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहे. या ग्रंथात त्यांनी आपल्या गुरुपदेशाची हकीकत सांगितली आहे. आत्मज्ञानाच्या तळमळीने गुरूचा शोध करीत ते दक्षिणेकडे चालले असता मलय पर्वतावर त्यांना सच्चिदानंदयती यांनी भार्गवी वारूणी विद्या शिकविली. तेव्हा अद्वैतबोध होऊन भक्तीचे खरे रहस्य वामनाला उमगले. पुढे त्यांनी वारणातीरी शिगाव कोरेगाव येथे राहून आपली बहुतेक सारी ग्रंथरचना केली.

**समश्लोकी टीका:**

वामन पंडिताने श्रीकृष्णाने संस्कृतात सांगितलेली गीता सर्वसामान्यांनाही प्राप्त व्हावी या हेतूने गीता लोकभाषेत लिहिली. या गीतेला वामनाने ‘समश्लोकी गीता' असे नाव दिले. अनुष्टुभ छंदात ही गीता लिहिली आहे. तसेच ग्रंथाच्या शेवटी फलश्रुती त्याने सांगितलेली आहे.

**यथार्थदीपिका:**

आतापर्यंत गीतेवर अनेक भाष्ये झालीत परंतु ती सर्व विपरीत आहेत म्हणून मी गीताटीका लिहीत आहे असे वामन म्हणतो. 'यथार्थदीपिका’ यात वामनाने गीतेच्या अर्थाचे तर्कशुद्ध विवरण केले आहे. हे विवरण अधिक विस्ताराने केले आहे. तसेच 'भावार्थदीपिके'च्या पार्श्वभूमीवर आपल्या या टीकेला 'यथार्थदीपिका’ असे नाव त्याने दिले. मराठीतून गीतार्थ सांगणे हे प्रयोजन या ग्रंथामागे होते. त्यामुळे हा ग्रंथ सुबोध झाला आहे. परखड विचार, भाषाप्रभुत्व हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे.

'यथार्थदीपिका’ ही बावीस हजार ओव्यांची गीताटीका आहे. हा त्यांचा सर्वात महत्त्वाचा ग्रंथ आहे. अद्वैत व भक्ती सांगणारा हा ग्रंथ असला तरी त्याचे रूप निराळे आहे. साधार विवेचन, सुसंगत तत्त्वज्ञान आणि तर्कशुद्ध प्रतिपादन हे या ग्रंथाचे विशेष आहेत.

**आख्यानकाव्ये:**

‘सुश्लोक वामनाचा' ही कीर्ती वामनाला त्याच्या आख्यानकाव्यांमुळे मिळाली आहे. श्लोकाबद्दल त्याचे विशेष नाव आहे. वामन आपल्या आख्यानकाव्यांतून प्रसंग वर्णन सुरेख करतात. तसेच शब्दचित्रे रेखीव व मोहक काढतात. त्यांची आख्यान काव्ये प्रसंग काव्याप्रमाणे आहेत.

रामजन्म, सीतास्वयंवर, अहिलोद्धार, भरतभाव, लोपामुद्रासंवाद, कृष्णजन्म, बालक्रीडा, वनसुधा, वेणुसुधा, कंसवध, राधाविलास, वामनचरित्र अशी आख्याने लिहिली आहेत. नाट्यपूर्णता, रूपकात्मकता, आकर्षकता, कल्पकता, शब्दारेखाटन ही वैशिष्ट्ये या आख्यानांची दिसतात. वामनाच्या पांडित्यपूर्ण, रसिक व्यक्तिमत्वाची ओळख या आख्यानांतून होते. आख्यानांच्या आरंभी मंगलाचरण आहे. अनुप्रास, यमक, स्वभावोक्ती हे त्याचे आवडते अलंकार आहेत.

**वामन पंडितांच्या काव्याची वैशिष्ट्ये:**

- त्यांच्या काव्यात रसानुकूल वृत्तयोजना दिसते.
- कथेच्या गाभ्याला थेट हात घातलेला दिसतो.
- काव्यात मार्मिकतेचे व विद्वत्तेचे दर्शन असते.
- अनुप्रास, यमक या अलंकारांचा उपयोग करून त्याद्वारे शब्द चमत्कृती घडविलेली असते.
- शुद्ध, अचूक, समर्पक अर्थवाही शब्दयोजना करून प्रसंग खुलविणे हे त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य आहे.

## ४ब.५ रघुनाथ पंडित

रघुनाथ पंडित हा एक श्रेष्ठ पंडित कवी म्हणून ओळखला जातो. तो समर्थभक्त होता. रघुनाथ पंडित याचा निश्चित काल उपलब्ध नसला तरी हा कवी शिवकालीन असावा असे अ. का. प्रियोळकर व द. सी. पंगु यांचे मत आहे.

**रघुनाथ पंडिताची ग्रंथरचना:**

१) रामदास वर्णन

२) गजेंद्रमोक्ष

३) दमयंती स्वयंवर

**रामदास वर्णन व गजेंद्रमोक्ष:**

रघुनाथ पंडित यांच्या पहिल्या 'रामदास वर्णन' या काव्यात वसंततिलका वृत्तातील एकूण ११ श्लोक आहेत. हे स्तोत्र काव्यदृष्ट्या अत्यंत सामान्य आहे.

'गजेंद्रमोक्ष' हे भागवतातील आख्यानावर आधारित आहे. त्याची रचना विविध वृत्तात आहे. यात एकूण ५८ श्लोक रचले आहेत.

**दमयंती स्वयंवर:**

'दमयंती स्वयंवर' हे नितांत रमणीय असे काव्य आहे. ते इतके लोकप्रिय झाले की रघुनाथ पंडितांना फार मोठे यश देऊन गेले. काव्यगुणांच्या दृष्टीने हे प्राचीन मराठीतील सर्वश्रेष्ठ काव्य म्हणता येईल.

नलदमयंतीचे मूळ आख्यान महाभारताच्या वन पर्वातील आहे. पण रघुनाथ पंडिताने व्यासांचा आधार न घेता श्रीहर्षाचे 'नैषधीयचरित्र' याचा आधार घेतला. हे २५४ श्लोकांचे लहान खंडकाव्य आहे. त्याच्याजवळ चांगल्या प्रकारची कवित्वशक्ती असल्याने त्याचे हे

munotes.in

खंडकाव्य सुरस झाले आहे. प्रमाणबद्ध व आकृती सौंदर्ययुक्त असे हे काव्य झाले आहे. रसिकांचे मन आकर्षून घेणारे हे खंडकाव्य आहे.

शृंगाराचा मोठा वावर यात दिसतो. या काव्यातील भीमक, नल, दमयंती यांची व्यक्तिचित्रे तसेच राजहंसाचे चित्र उठावदार आहे. दूर पळणारा हंस आणि त्याला धरू पाहणारी दमयंती ही वर्णने सुमधुर आहेत. दमयंती ही अत्यंत सुंदर, मानी, अल्लड व सुंदर रेखाटली आहे.

ते शीतलोपचारी जागी झाली हळूच मग बोले।

औषध नलगे मजला, परिसुनि जननी बरे म्हणुनी डोले॥

श्लेष अलंकाराचा वापर येथे केलेला दिसतो. या काव्यातील प्रसंग निर्मितीतून रघुनाथ पंडितांच्या उत्तुंग कल्पनाशक्तीचे दर्शन घडते. हंस– नल यांची पहिली भेट, हंस- दमयंती संवाद, नल- दमयंती भेट इत्यादी प्रसंग नयनरम्य झाले आहेत. व्यक्तीच्या मनोभावाचे कलात्मक दर्शन आपल्याला घडते. दमयंती आणि नलाच्या विरहाचे वर्णन कवीने मार्मिकतेने केले आहे.

“भृंगे विराजित नवी अरविंद पत्रे

पाहुनि मानुनि तिचिच विशाल नेत्रे।”

रघुनाथ पंडिताचे मनुष्य स्वभावाचे किती सूक्ष्म निरीक्षण आहे ते येथे दिसते. आटोपशीर निवेदनामुळे या काव्याला आकारसौंदर्य प्राप्त झाले आहे. त्यांनी शुद्ध कल्पनाविलासाचे ध्येय नजरेसमोर ठेवून हे आख्यान काव्य रचले आहे. महाकाव्याचा आदर्श पुढे ठेवून रचलेले एक स्वतंत्र काव्य म्हणून ‘दमयंती स्वयंवर' हे आख्यान पंडिती काव्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरते.

## ४.ब.६ निरंजन माधव

निरंजन माधव हे पेशवाईतील राजकारण कुशल कवी होते. त्यांनी ठाणे तंजावरला पेशव्यांची वकिलीही केली होती. पण राजकारणी, मुत्सद्दी असूनही तो परमार्थ जाणणारा आणि जगणारा रसिक पंडित होता. भक्ती आणि रसिकता यांचा समन्वय साधून कलाकौशल्यपूर्ण काव्यनिर्मिती त्यांनी केली. सर्व तत्वज्ञान शाखांचा संग्रह करणाऱ्या निरंजन संप्रदायातील तो कवी होता. ‘सांप्रदाय परिमळ' हा त्यांचा आत्मचरित्रपर ग्रंथ मराठी वाङ्मयात अपूर्व आहे. ‘कृष्णानंदसिंधू’ हा त्यांचा पहिला ग्रंथ. १८ व्या शतकामध्ये अध्यात्म रामायणाच्या ७ कांडावर टीका असलेले ‘चित्तबोधरामायण' त्याने लिहिले. 'वृत्तवनमाला' हा छंदशास्त्रावरील आपला दुसरा ग्रंथ लिहिला.

**निरंजन माधवाची ग्रंथरचना:**

१) ज्ञानेश्वरविजय

२) सुभद्राचंपु

३) स्फुटकाव्ये व स्तोत्रे

४) बालकांड

५) मंत्ररामचरित्र

**ज्ञानेश्वरविजय:**

संतांच्या अभंगांच्या व चरित्रांच्या आधारे त्याने 'ज्ञानेश्वरविजय' हा ग्रंथ लिहिला. यात एकूण १७ अध्याय आहेत. संत नामदेवांच्या आदी आणि समाधीचे अभंग यांच्या आधारे हे रचले आहे. त्यात कथा आहे परंतु महाकाव्य त्याला म्हणता येणार नाही.

**बालकांड:**

निरंजन माधवाच्या संकल्पित 'चिद्बोध रामायण' या रामकथेवरील महाकाव्यातील केवळ बालकांड आज उपलब्ध आहे. यात रामायणातील मूळ प्रसंग खुलवण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय हनुमन्नाटक, रघुवंश, राम - परशराम युद्ध यासारखे प्रसंग आवडीने योजले आहेत. याची रचना महाकाव्याच्या थाटामाटाची आहे. त्यांनी महाकाव्य समोर ठेवूनच आपली रचना केली.

**सुभद्राचंपू:**

१८ व्या शतकामध्ये लिहिलेला 'सुभद्राचंपू' हा त्यांचा मराठी एकमेव चंपू ग्रंथ आहे. 'सुभद्राचंपू' महाकाव्याच्या निर्मितीतून निरंजन माधवांची पांडित्यपूर्ण कवित्वशक्ती सिद्ध होते. मराठी साहित्यात चंपू निर्मितीचा पहिला आणि एकमेव मान निरंजन माधव यांनाच जातो. अनन्वय अलंकारासारखी ही एकमेव रचना मराठीत आढळते. यातील भावपूर्णता आणि कृष्णा, बलरामाच्या चित्रणातून नाट्यपूर्णता प्रकट करण्यात ते यशस्वी झाले आहेत. सुभद्राचंपू हे काव्य महाकाव्यसदृश्य असूनही ते स्वतंत्र नाट्य आणि काव्य सौंदर्याचे दर्शन घडविते. निसर्ग, प्रसंग, स्वभाव या सर्वच वर्णनात कवीचा प्रतिभाविलास या काव्यात आढळतो. अर्जुनाचे सुभद्राप्रेम, कृष्णभक्ती, बलरामाचा सरळ साधा स्वभाव, कृष्णनिती यांचे उठावदार चित्रण निरंजन माधवाने केलेले आहे. संस्कृत साहित्याच्या व्यासंगाला स्वतःच्या कल्पकतेचा साज चढवून उत्तम पंडिती काव्य निरंजनमाधवांनी निर्माण केले आहे.

**स्फुट काव्ये व स्तोत्रे:**

यतिनृपतीसंवाद, वसिष्ठ सुशर्मा संवाद, भार्गवजन्माख्यान, अद्वैतबोध अशी स्फुट प्रकरणे निरंजन माधव याने रचली आहेत.

पंडिती काव्याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून निरंजन माधव यांनी लिहिलेल्या स्तोत्रांचा विचार केला जातो. ही स्तोत्रे रचताना त्याच्यासमोर पंचमहाकाव्यांचा आदर्श होता. उत्कट भक्तीची भावना आणि काव्यसौंदर्य या महाकाव्यातील स्तोत्रांच्या गुणांचा आविष्कार निरंजन माधवने केलेला आहे. 'रामकर्णामृत' या स्तोत्रात त्यांनी विविध अलंकारांचा वापर आणि संस्कृत अभिजात कल्पनाविलासाचा अवलंब केला आहे. 'रामकर्णामृत' हे सर्वात मोठे स्तोत्र १११ श्लोकांचे आहे. या स्तोत्रात रामनामाचा मंत्र साधला आहे.

**निरंजन माधवाच्या काव्याची वैशिष्ट्ये:**

- भक्ती आणि रसिकता यांचा समन्वय साधून कलाकौशल्यपूर्ण काव्यनिर्मिती त्यांनी केली.
- एकाच वेळी परमेश्वराची भक्ती आणि काव्याचा विलास साधण्याची प्रेरणा त्यांच्या काव्यनिर्मिती मागे होती.
- पंडिती काळातील एक आदर्श उदाहरण म्हणून निरंजन माधवाचा निर्देश करावा लागतो.

## ४.ब.७ सामराज

सामराज हा शिवकालीन कवी होता. त्याने छत्रपती शिवाजी, संभाजी, राजाराम या तिघांच्या कारकिर्दी पाहिल्या. त्याला राजदरबारातील रितीरिवाजांचा, लोकव्यवहारांचा चांगला परिचय असल्याचे दिसते.

**सामराजाची ग्रंथरचना:**

१) मुद्गलाख्यान

२) रुक्मिणीहरण

**मुद्गलाख्यान:**

कुलदैवताविषयीच्या लेखनाने काव्यनिर्मितीस सुरुवात करावी असे सामराजला वाटत होते म्हणून त्याने 'मुद्गलाख्यान' लिहिले. 'मुद्गलाख्यान' याची श्लोकसंख्या २६१ इतकी आहे. मुद्गल हे त्यांचे कुलदैवत. त्याने या ग्रंथात वर्णाश्रम धर्माचा पुरस्कार केला आहे. मुद्गल नावाच्या एका दानशूर पुरुषाचे चरित्र यात आले आहे.

**रुक्मिणीहरण**

'रुक्मिणीहरण' या महाकाव्याची श्लोकसंख्या ११४० इतकी आहे. त्याची विभागणी ८ सर्गात झालेली असून त्याची लांबीही भरघोस आहे. यातील कथाभाग भागवताच्या दशमस्कंध अध्याय ५२-५३ मधील आहे. हा कथाभाग आधाराला घेऊन रघुवंश, कुमारसंभव, शिशुपालवध व नैषधीयचरित या महाकाव्यांचा सजावटीसाठी उपयोग सामराजने केला. संस्कृत वाङ्मयाबरोबर एकनाथांच्या रुक्मिणी स्वयंवरातील कल्पना आणि रामदास, तुकाराम यांच्या काव्यातील शब्दसंपत्ती यांचा सामराजने सढळ हस्ते वापर केला आहे. महाकवींचे ऋण सामराजने मोठ्या प्रमाणात घेतले असले तरी त्याची प्रतिभा ही वरच्या दर्जाची आहे. त्याने रुक्मिणीच्या सौंदर्याचे वर्णन पुढीलपैकी केले आहे:

> तदुपरी उगवे हा चंद्रमा पौर्णिमेचा ।
> अनभिलषित अर्थी होय ये उत्तमेचा ॥
> द्विजपति विसरेना सर्वथा स्वीय दीक्षा ।
> कर पसरून मागे वक्त्वलावण्यभिक्षा ॥

येथे सामराजने रुक्मिणीच्या सौंदर्याचे वर्णन करताना व्यतिरेक अलंकाराचा वापर केला आहे.

संस्कृत महाकाव्याच्या तंत्राचे अनुसरण आणि त्यात स्वतःच्या प्रतिभेने घातलेली भर यामुळे या महाकाव्याचे स्थान आख्यानकवितेत वरचे ठरते. या काव्यात भक्ती व शृंगार हे रस प्रमुख असून वीर, वात्सल्य व हास्य हे रसही प्रसंगानुरूप आले आहेत.

**सामराजाच्या काव्याची वैशिष्ट्ये:**

- स्थल, काल, प्रसंग यांचे समयोचित वर्णन करण्याची हातोटी.
- सामराजांचा अधिक आवडीचा अलंकार म्हणजे स्वभावोक्ती.
- उपमा, रूपक, उत्प्रेक्षा, दृष्टांत, व्यतिरेक या अलंकारांना प्राधान्य.
- सामराज यांच्या काव्याचा प्रमुख गुण म्हणजे प्रसादपूर्ण रचना.

## ४ब.८ नागेश

साम राजानंतरचा हा कवी आहे. नागेश यांचा संस्कृत पंचमहाकाव्य, नाटके, अलंकार शास्त्र, छंद शास्त्र यांचा सखोल अभ्यास होता. त्यांनी सीतास्वयंवर, रुक्मिणीस्वयंवर, रसमंजिरीचे भाषांतर, चंद्रावळीवर्णन इ. काव्ये लिहिलेली आहेत. पण ती पूर्णतः उपलब्ध नाहीत.

**नागेश यांची ग्रंथरचना:**

१) सीतास्वयंवर

२) चंद्रावळीवर्णन

३) रुक्मिणीस्वयंवर

**चंद्रावळीवर्णन:**

'चंद्रावळीवर्णन' हे काव्य अग्निपुराणाच्या आधारे लिहिलेले आहे. या काव्यात सर्वत्र शृंगार रस दिसून येतो. चंद्रावळ नावाच्या गोपिकेशी श्रीकृष्णाने तिच्या बहिणीचे रूप घेऊन एकांतात भेट घेतली त्याचे वर्णन यात आले आहे.

**सीतास्वयंवर:**

'सीतास्वयंवर' या काव्यात नागेश यांनी हनुमन्नाटक, रघुवंश आणि रामायण यांचा अर्थानुवाद केला आहे. हे काव्य पूर्णपणे शृंगार रसाने रंगलेले आहे. श्रीराम आणि सीता यांची व्यक्तीचित्रणे उठावदारपणे रेखाटली आहेत. श्रीरामाच्या विवाहाच्या मिरवणुकीतील स्त्रियांची वर्णने करताना चित्रिणी, शंखिनी, पद्मिनी अशी नावे दिली आहेत. यातून एकप्रकारे कामशास्त्र मांडलेले दिसते.

munotes.in

## ४ब.९ विठ्ठल बीडकर

विठ्ठल बीडकर हे सामराज आणि नागेश यांचे समकालीन कवी आहेत. ते वर्षानुवर्ष पंढरीची वारी करणारे निष्ठावंत कवी होते. तसेच ते विठ्ठलभक्त, व्युत्पन्न संस्कृतज्ञ असून चित्रबंधात्मक काव्यरचनेचा पुरस्कर्ता ठरले. म्हणूनच ते खरे पंडिती काव्याचा प्रातिनिधिक कवी ठरतात. अभिजात संस्कृत साहित्याचे आणि साहित्यशास्त्राचे ठळक विशेष विठ्ठल यांच्या काव्यात प्रकट झाले आहेत. त्यांचा संस्कृतातील छंद शास्त्र, कोष, काव्य, नाटके, व्याकरण याचा सखोल अभ्यास होता. ते स्वतःला 'कविराज' म्हणवित आणि आपले काव्य व्युत्पन्नांसाठीच आहे असे सांगत. पंडिती काव्याची सारी वैशिष्ट्ये त्यांच्या काव्यात आढळतात. ते आपल्या कुटात्मक रचनेमुळे विख्यात होते.

**विठ्ठलांची ग्रंथरचना:**

१) पांचालीस्तवन

२) द्रौपदीवस्त्रहरण

३) रुक्मिणीस्वयंवर

४) सीतास्वयंवर

५) रसमंजिरी

६) बिल्हणचरित्र

७) विद्वजीवन

**पांचालीस्तवन:**

विठ्ठल यांची 'पांचालीस्तवन' ही पहिली कथा आहे. याची श्लोकसंख्या २३ आहे. द्रौपदीचा धावा या काव्यात केला आहे.

**रुक्मिणीस्वयंवर:**

पंडिती काव्याची सारी वैशिष्ट्ये त्याच्या 'रुक्मिणीस्वयंवर' काव्यात आढळतात. हा ग्रंथ महाकाव्याचा धर्तीवर लिहिला आहे. त्यातील प्रकरणास सर्गीची नावे दिली आहेत. ओवी, अभंग, दिंडी या वृत्तांना स्पर्श न करता त्यांनी संस्कृतातील अनेक वृत्तांचा उपयोग केला. 'रुक्मिणीस्वयंवर' यात छात्र, चामर, व्यजन, वृक्ष, चक्र, सर्प इ. रचनाप्रकार योजिले आहेत. वेगवेगळ्या अक्षरगण वृत्तात रचना केली आहे.

**सीतास्वयंवर:**

'सीतास्वयंवर' या काव्यात ७ सर्ग आहेत. याची रचना विविध वृत्तात केलेली आहे. या काव्याची श्लोकसंख्या ३६३ आहे. सीतेच्या पूर्वावतारापासून ते तिच्या विवाहापर्यंतची कथा यात आली आहे.

**बिल्हणचरित्र:**

'बिल्हणचरित्र' ही रचना पांडित्याचा हव्यास न बाळगल्याने रसाळ झाली आहे. ही एक प्रेमकथा आहे. या ग्रंथात राजकन्या शशिकला आणि तिचा गुरू बिल्हणपंडित यांच्यातील प्रणयाचे वर्णन आले आहे. राजा प्रथम त्याला वधाची शिक्षा देतो नंतर विवाह लावून देतो. प्रणयाच्या विविध अवस्था चित्रित करताना कवीने बरेच कौशल्य दाखवले आहे.

**विठ्ठलाच्या काव्याची वैशिष्ट्ये:**

- त्यांनी साहित्यशास्त्राचे ज्ञान, छंद शास्त्रनैपुण्य, चित्रकाव्यरचना, कौशल्याचा आविष्कार यातच काव्याचे सार्थक मानले आहे.
- विठ्ठल बिडकर यांची काव्ये अलंकारांनी नटलेली आहेत.
- मराठीत नसलेली अनेक वृत्ते त्यांनी मराठीत आणली.

## ४ब.१० मोरोपंत

मोरोपंत हे शेवटचे पंडित कवी मानले जातात. इ.स. १७२९ ते १७९४ हा त्यांचा कालखंड आहे. अथांग सागराप्रमाणे त्यांचे काव्य आहे. त्यांनी सुमारे ४०- ४२ वर्ष विपुल लेखन केले. मोरोपंतांचा जन्म पन्हाळगडावर झाला. मोरोपंत पराडकर बारामतीच्या बाबूजी नाईकाचे आश्रित पुराणिक होते. त्यामुळे पुराणिकाच्या भूमिकेचा प्रभाव मोरोपंतांच्या काव्यरचनेवर पडला. कुटुंबवत्सलांसाठी, सामान्यजनांसाठी केलेली सद्भाव पोषक रचना असे मोरोपंतांच्या काव्यरचनेचे स्वरूप आहे. मोरोपंतांची एकूण काव्ये पाऊण लाखाच्या घरात आहेत. मराठी साहित्यात विपुल रचना करून मोरोपंतांनी मराठीला संस्कृत वाङ्मयात तोडीचे स्थान प्राप्त करून दिले. त्यांनी ७५ हजाराच्यावर कविता लिहिल्या. त्यांनी सुमारे ६० हजार आर्या, श्लोकबध्द स्तोत्रे, आख्याने व ओवीबद्ध स्त्रीगीते लिहिली.

**मोरोपंतांची ग्रंथरचना:**

१) कुशलवोपाख्यान

२) आर्याभारत

३) हरिवंश

४) संकीर्णरामायण

५) मंत्ररामायणे

६) मंत्रभागवत

७) श्रीकृष्णविजय

८) संशयरत्नमाला

munotes.in

९) श्लोक केकावली

१०) ब्रम्होत्तर खंड

११) स्फुट प्रकरणे

**आर्याभारत:**

मोरोपंतांचे 'आर्याभारत' हे उत्कृष्ट आख्यान काव्य ठरले. समग्र महाभारत त्यांनी आर्या वृत्तात लिहिले. आर्या वृत्तातील हे महाभारत अधिक लोकप्रिय ठरले. कथा कीर्तनातून या आर्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. स्वभावरेखाटन, वर्णनकौशल्य, रसपरिपोष, ओघवती रचना, कथानकाची सुंदर गुंफण, विस्तार कौशल्य, संवाद हे आख्यान काव्याचे सर्व गुण आर्याभारतात एकवटले आहेत.

कर्ण, भीष्म, द्रोणाचार्य, श्रीकृष्ण, दुर्योधन, कुंती, अश्वत्थामा इ. पात्रे त्यांच्या व्यक्तीमत्वासह उभी केली आहेत. त्यांची आर्याभारतातील सर्वच आख्याने मनमोहक झाली आहेत. महाभारतातील कित्येक काव्यचरणांना सुभाषितांचे स्वरूप प्राप्त झाले आहे व आजही ही सुभाषिते सर्वसामान्य रसिकांच्या तोंडी ऐकू येतात.

**मंत्ररामायण:**

मोरोपंतांनी मंत्ररामायणात 'श्रीराम जयराम जय जय राम' हा मंत्र गुंफला. हे काव्य १८८० आर्यांचे आहे. १४६ मंत्रांतून ते साकार झाले आहे. मोरोपंतांचे कुलदैवत रामप्रभू होते. त्यांच्यावर त्यांची एकनिष्ठ भक्ती होती. म्हणूनच त्यांनी १०८ रामायणे लिहिली असे बोलले जाते. त्यांनी रामकथा एकशे आठ प्रकारे एकशे आठ रामायणातून सांगितली आहे. एकच रामकथा त्यांनी निरनिराळ्या पात्रांच्या द्वारे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

**मंत्रभागवत:**

मोरोपंतांनी मंत्ररामायणाप्रमाणे मंत्रभागवताचीही आर्याबद्ध रचना केली. त्यांनी 'ॐ नम भगवते वासुदेवाय' हा मंत्र साधून ३६०० आर्यात सारे भागवत काव्यबद्ध केले आहे. श्रीकृष्णाचे हे यशोगान अत्यंत रसाळ शब्दात आहे. त्यात भक्ती रसाला प्राधान्य प्राप्त झाले आहे. भगवंताने आपला उद्धार करावा, कृपाप्रसादाचा वर्षाव करावा अशी भावना येथे आहे. महाभारत, रामायण व भागवतावरील आर्याबद्ध रचना फारच गाजली व लोकप्रिय ठरली.

**श्लोक केकावली:**

स्वतःच्या उद्धारासाठी मयूर (मोर) याने जो करूण टाहो फोडला त्या केका. मयुराच्या केकांच्या पंक्तींचा संग्रह म्हणजे केकावली. अत्यंत कारुण्यपूर्ण असे हे काव्य आहे. दीर्घ समासात्मक रचना केलेली आहे. आत्मिक उन्नती करणे हा या काव्याचा हेतू आहे. अत्यंत प्रेमळ अशी ही रचना झाली आहे.

सुसंगती सदा घडो। सुजन वाक्य कानी पडो।

कलंक मातीचा झडो। विषय सर्वथा नावडो।

असा व्यापक विचार येथे मांडला आहे. माणसाने नेहमी सुसंगत लोकांच्या संगती राहावे, चांगले विचार बाळगावेत आणि त्यानुसार वागावे. खोटा अभिमान बाळगू नये, मोहाला बळी पडू नये तसेच आपल्या मनातून वाईट विचार दूर करावे, सत्कर्म करून भक्तिमार्गाचा अवलंब करावा असा उपदेश मोरोपंतांनी या काव्यपंक्तीत केला आहे.

मोरोपंतांच्या 'श्लोक केकावली' मध्ये भावपूर्ण भक्ती आणि अलंकारपूर्ण काव्य या दोन्हींचा समन्वय दिसतो. त्यांनी उतारवयात ही रचना केली असल्याने त्यात कमालीची आर्तता आलेली आहे. भाव सौंदर्याला पोषक असा कल्पनाविलास या काव्यात आहे. येथे कवीने केलेली परमेश्वराची स्तुती पौराणिक थाटाची नसून तिच्यात अभिजात संस्कृतचे रूप दिसते.

**स्फुट आख्याने व स्तोत्रे:**

भागवत पुराणाच्या आधाराने मोरोपंतांनी अमृतमंथन, ध्रुवचरित्र, सुदामचरित्र इ. आख्याने रचली. ही आख्याने रचताना त्यांनी आर्या, श्लोक, ओव्या, दिंडी या वृत्ताचा वापर केला. त्यांची स्फुट कविताही अधिक रसाळ व आकर्षक आहे. अंबाबाई, तुळजापूरची भवानी, जेजुरीचा खंडोबा, वेंकटेशगिरी इ. देवतांची स्तोत्रे त्यांनी रचली. तसेच गंगास्तुती, संतस्तुती, गीतास्तुती, श्लोककेकावली असे विविध स्तोत्रे व प्रार्थना इ. रचना मोरोपंतांनी केली. पंतांनी भाविक मनाची जोपासना केली व भारतीय संस्कृतीचा ठेवा घरोघरी पोहोचवला.

**मोरोपंतांच्या काव्याची वैशिष्ट्ये:**

- त्यांच्या काव्यात प्रसन्नता, माधुर्य आणि वाणीचा सहज ओघ दिसून येतो.
- सुसंगत कथांची परिणामकारक गुंफण त्यांच्या काव्यात केलेली असते.
- संवादात ते रमतात त्यामुळे त्यांच्या काव्यातील संवाद जिवंत वाटतात.
- मोरोपंतांच्या काव्यांनी मराठीचे अलंकार वैभव वाढविले.

## ४ब.११ समारोप

पंडिती काव्य हे पुनरुज्जीवित अभिजात संस्कृत साहित्य आहे. संस्कृतमधील वाङ्मय प्रकार, आदर्शवाद, भाषेची घडण, वृत्त, अलंकार या सर्वच बाबतीत हे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न पंडित कवींनी केला. मुक्तेश्वर, रघुनाथपंडित, वामन पंडित, सामराज, विठ्ठल, नागेश, निरंजन माधव, मोरोपंत या पंडित कवींनी पांडित्यपूर्ण रचना करून मध्ययुगीन मराठी साहित्यात मोलाची भर घातली.

## ४ब.१२ स्वाध्याय

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) एक कलाकवी या दृष्टीने मुक्तेश्वर यांची काव्य रचना उलगडून दाखवा.

२) मोरोपंतांचे वाङ्मयीन कर्तुत्व मांडून त्यांची भक्तिभावना विस्ताराने स्पष्ट करा.

३) पंडित कवींचे मराठी वाङ्मय परंपरेतील महत्त्व विशद करा.

**ब) टीपा**

१) मुक्तेश्वरी महाभारत

२) मुक्तेश्वरांची स्फुटरचना

३) रुक्मिणीहरण

४) दमयंती स्वयंवर

५) सुभद्राचंपू

६) श्लोक केकावली

७) विठ्ठल

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. 'मुर्खांची लक्षणे' ही स्फुट रचना कोणत्या पंडित कवीची रचना आहे?

२. 'सीतास्वयंवर', 'चंद्रावळीवर्णन', 'रूक्मिणी स्वयंवर' ही ग्रंथरचना कोणत्या पंडित कवीची आहे लिहिला?

३. 'गजेंद्रमोक्ष' ही ग्रंथरचना कोणाची आहे?

४. संतांच्या अभंगाच्या व चरित्रांच्या आधारे निरंजन माधव यांनी कोणता ग्रंथ लिहिला?

५. 'निगमसार' हा ग्रंथ कोणत्या पंडित कवीचा आहे?

## ४ब.१३ संदर्भग्रंथ


- संपा. सं. गं. मालशे व इतर – मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.
- संपा. सं. गं. मालशे - मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड दुसरा, भाग १ व भाग २), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.
- अ. ना. देशपांडे - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, (भाग १ : पूर्वार्ध)

- के. ना. वाटवे - संस्कृत काव्याचे पंचप्राण, मनोहर ग्रंथमाला, पुणे.
- संपा. के. ना. वाटवे - पंडित काव्य
- संपा. श्री. ना. बनहट्टी - नलदमयंती स्वयंवराख्यान
- गं. ब. ग्रामोपाध्ये - मराठी आख्यान कविता : एक अभ्यास, मौज प्रकाशन, मुंबई.
- अ. का. प्रियोळकर – मुक्तेश्वराचा शोध, आदिपर्व, खंड १, मुंबई.


*****

munotes.in

# Turnitin Originality Report

Processed on: 12-Aug-2022 14:22 IST
ID: 1881693549
Word Count: 48001
Submitted: 1

मध्ययुगीन मराठी वाड्मयचा इतिहास
By Idol Ba Sem V

| Similarity Index | Similarity by Source | |
|---|---|---|
| 0% | Internet Sources: | 0% |
| | Publications: | 0% |
| | Student Papers: | 0% |

१अ मर ठा भी षाचे उातप्तत् की ला व क रो वी लखे चाां े महतत्व् १ऄ.१ ईदद्शे १ऄ.२ पर्सत् वान ा १ऄ.३ मर ठा सीसंक्ृत ची ाईदयक ळा १ऄ.४ मर ठा भी षा ईतप्तत् की ला १ऄ.५ पर् चा नी मर ठा ीक रो वी लखे ता ली मर ठा ीव काग्रचन ाव शबद्रपु े १ऄ.६ मकुंदर जा अणण तय् चां णाववकेणसधं ृ १ऄ.७ सम रा पो १ऄ.८ पर्शन्सचं १ऄ.९ सदंभभ १ऄ.१ उदद्शे १. मधय्यगु नी क लाखडं ता ली मर ठा भी षाचे े सव्रपु समजनू घते ायइेल. २. मर ठा ीभ षा णानणमभत ची े मह नाभु वा सपंर्द या चा े क याभ कततृभव् समजनू घते ायइेल. ३. मह नाभु वा सपंर्द या चाय् ाव ङाम्य पर्क राच ीओळख ह इोल. ४. मर ठा चीय् ाअदय् गर्थं णावषय ीज णानू घते याइेल. ५. मह नाभु वा पथं चा े ततव्जञ् ना, ट की गार्थं अणण वय् कारण गर्थं य चां पाररचय ह इोल. १अ.२ पर्सत् वान ा मर ठा ी भ षाचे ी वय् पात् ी पर् राभंक ळा ी मह रा षाट्र पारुत ी मयभा णदत ह तो .ी मर ठा ी भ षाचेय् ा ईतप्तत् बीर बोरच कष्तेर् वय् पात् ी ह ी महतत्व् चा ी अह.े मह रा षाट्र ह े दशेव चाक न वा. मह रा षाट्र चा ा पणहल ा महतत्व् चा ा ईलल्खे शकनपृतत् ी शर् धीर वमभा य चांय् ा तय् चांय् ा आ.स. ३६५ चय् ा एरण यथे ली सत्भं लाखे ता स पाडत .ो (मधय्पर्दशे ता ली स गार णजलह्य ता ली) तय् ता तय् चा साने पात ी सतम्न गा सव्त लः ा 'मह रा षाट्र' मह्णज े मह रा षाट्र यी मह्णवत .ो ह ा लखे एरण यथे े ध रा ता थी ी मरण प वालचेय् ा न गा सणैनक चांय् ा सम्रण थाभ ईभ राल ा अह.े मह रा षाट्र ता पर् चा नी क ळा ी हट ी णकंव ाह टा ल को चां ीवसत ीऄसलय् माळ्ेु तय् चांय् ाय ादषे ला ाहटट्दशे न वा पडल े व 'मरहटट्' य ा शबद् ता ली 'हटट्' य ाघटक पद ना े वर ली हटट् ील को सणूचत ह तो. य ाड .ॉर .ा ब .ा ज शो य चांय् ा मत चां े खडंन एरण लखे ता ली वर ली ईलल्खे ना े ह ो . तय् ता ली सने पात ीसतम्न गा व य् चांय् ा सम्रण थाभ तय् ना े ह ा सत्भंलखे ईभ राल ा त े न गा सणैनक य चांय् ा ईलल्खे चाय् ा अध रा े पर् चा नी मह रा षाट्र ता वसत ीह टा चां ीनवह्,े तर न गा चां ीह तो .ी ह े ड .ॉणमर शा य नां ीसमपभकपण े द खावनू णदल े अह.े मह रा षाट्र चा ा दसुर ा ईलल्खे पलुकेश चय् ा आ. स. ६३४ चय् ा ऐह ळो-लखे ता णमळत .ो तय् ता पलुकेश च े कततृभव् वणणभत ना ा त ो 'मह रा षाट्र चाय् ा ऄणधपत ी झ ला ,ा ऄस े मह्टल े अह.े ऐह ळो लखे ता ली ह ी णतर्ध ा मह रा षाट्र चा ी कलप्न ा ऐणतह णासक द ृ न े महतत्व् चा ी ऄसनू णत पढ्ु े स ळो वाय् ा शतक ता 'त नी भ गा म ट' य ा शबद् ता गजुभर शवब सा य ा मह नाभु वा गर्थंक रा ना े म डांल ीअह.े मह रा षाट्र तय् चांय् ान वा पार्म णाचे लह ना लह ना र ा च े (खडंमडंळ चा े णमळनू झ लाले े ऄस वा.े) य ा ड .ॉप .ाव .ा क णा े य नां ी म डांललेय् ा ईपपतत् ली ा तरे वाय् ा शतक ता ली 'अच रापधद्त 'ी य ा न वा चाय् ा एक ा मह नाभु वा गर्थं ता अध रा स पाडत .ो ईद .ा 'दशे भ ज े खडंमडंळ: जसै े फलठे णा पा सा णौन द णाकष्णणेस: म ट ीभ ा जतेलु ाठ आा ं व तते ु एक मडंळ: तयणस ईतत्र े ब लाघे टा चा ासवेट: ऐस े एक खडंमडंळ: मग ईभ े (ईभय) गगं ता री णह एक खडंमडंळ: अणण तय पा सा णौन ईभ े मघेकंरघ टा (महेकर, णज. अक लो )ा त ें एक खडंमडंळ: तय पा सा णौन अवघ ें वर डा त ें एक खडंमडंळ: परर अवघ ीणमळ णौन मह रा ा च े ब णोलज:े णकंणचतं ् णकंणचत ् भ षाचे ा प लाट: भण णौन खडंमडंळे भण वा .ीं" पर् .ा र. य. भसु रा ीय नां ीय दावक ला नी क रो वी लखे चांय् ा अध रा े मह रा ा च ाकष्तेर् णावसत् रा ऄजम वाणय् चा ापर्यतन् केल .ा णवदभभ दशे अणण क कोण ह े मह रा ा च े त नी णवभ गा य दावक ला व च लाकुय्क ळा ता दखे ली एक चा र ा त सम णावषट् ह तो.े ऄस णनषट्क्षभ क ढाल ा अह.े (प.ृ४६, मर ठा ी व ङाम्य चा ा आणतह सा, खडं १, सपं .ा ड .ॉष.ंग .ो तळुपळु)े १५ वय् ाशतक ता ली मह नाभु वा गर्थंक रा कव ीणडभं कृषट्णम्नु ीय ना े मह रा ा च ाकष्तेर् णवसत् रा पढ्ु लीपर्म णा े स णांगतल ाअह.े

munotes.in